REGISTERED N. No. 4

वर्षाची आगाऊ ५ डाशील ०१२
सहामाही „ ३ „ ०८
साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास ........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........०१ ०१
दुसरे खेपेस .... .......०१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Annual in advance 5 Postage 13 as
Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly.........3 ............... 8 as
Single copy ........................... 4 as

Advertisement
Below 10 lines...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line.. 3 as

VOL XXXVI | AKOLA MONDAY 7 JULY 1902 | NO 26

वर्ष ३६ | आकोला सोमवार तारीख ७ माहे जुलै सन १९०२ इ० | अंक २६

## मुंबई बॅंकची ठेव ठवण्याचा बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवाने देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षात एक हजार रुपयापर्यंत ठेव ठेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## खरेदी करा !

## रास्कोपचीं थेट व खरीं पेटंट वाचेस

## नकली मालास भुलून पैसे खर्चु नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचुक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्याच्या गुणांची प्रचीती तीच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व या बद्दलची जोखीम

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या पोख्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस.......................४०
१९ „ हंटिंग.......................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्षं ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेकंद कांट्यासह............२०
१९ „ मध्यभागी सेकंद काटा असलेलें ................२२
१९ „ हाफ हंटिंगचें...............२०
१९ „ हंटिंगचें ...................२०
१४ „ रिस्ट वॉच .................२०

### इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ „ हंटिंग.......................२०
१४ „ रिस्टवॉच.......................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग.......................३५
१८ व १९ „ ओपनफेस............३०
१९ „ सेकंद कांट्यासह ............३२
१९ „ मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें.....३५
१९ „ हंटिंग ...................... ४९

लेडीज वॉचेस १४, १८, क्यारटगोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

## सी. हॉनीगर आणि कंपनी,

ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.

## नोटीस

वेशमी सोनाजी वल्लद हरी गिरे माळी राहणार व्याळ, ता. व पोस्ट बाळापूर यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, माझी मुलगी नामें गुणो ही तुमची लग्नाची बायको आहे. पण चार पाच वर्षांपूर्वी तुह्मी तिला विनाकारण मारहाण करून आमच्या घरीं घाडली तेव्हां पासून तुह्मी तिला घरीं नेऊन नांदवीत नाहीं. मध्यंतरी दोन तीन वेळा पंचाईती केल्या पण तुह्मी ताळ्यावर याल असा रंग दिसत नाहीं. आह्मी वाट पाहून थकलों ह्मणून ही नोटीस देणें भाग पडलें. आतां ही नोटीस पोचल्या पासून आठ दिवसांचे आंत आमचे घरीं स्वतां येऊन आपल्या बायकोस घेऊन जावें. आणि या पुढें तुह्मी तिजबरोबर जनरीती प्रमाणें संसार कराल व तिच्या जीवाभावास कांहीं दखल होऊं देणार नाहीं अशी, तिला घरीं नांदविण्यास घेऊन जाण्या पूर्वीं, चार संभावित लोकांची खात्री करून द्यावी. असें करणें पसंत नसल्यास तावडतोब लेखी फारकती द्यावी. ह्मणजे तिचा पुढील मार्ग मोकळा होईल. असें वरील मुदतींत न केल्यास हीच नोटीस फारकती समजून तिचा दुसरा गंधर्व लावून देऊं मग तुमचा तिजवर नवरेपणाचा वगैरे कसलाहि हक्क चालणार नाहीं. शिवाय पांच वर्षांच्या पोटगीबद्दल तुमच्यावर फिर्याद करून सर्व पैसे अखेर निकाला पर्यंतच्या खर्चासुद्धां भरून घेतले जातील. ह्मणून अगाऊ ह्या जाहीर नोटिशीनें सुचविलें आहे. या उपर जें करणें असेल तें करावें. कळावें तारीख ३० माहे जून सन १९०२ इ.

सहीची निशाणी
सोनाजी वल्लद महादाजी राखोंडे
राहणार ताजनापेठ आकोला
यांच्या हातची रेघ.

## लिंबाचा उपयोग

लिंबू हें फळ अगदीं नित्याच्या आहारांतलें व अत्यंत उपयोगी आहे. ह्मणून या संबंधाची थोडीशी माहिती फार संग्राह्य आहे ती आह्मी देतों:—

लिंबू व त्याचें लोणचें आपण दररोज जेवणाचे वेळीं खातों व त्याचें सरबत पितों. तें फार औषधिक व गुणकारी आहे. लिंबू डोळ्यांत पिळल्या पासून डोळे चांगले पाणीदार होतात व सर्व नेत्रविकार दूर होतात. प्रातःकाळीं कढत पाण्यांत लिंबाचा

त्याच्या रसानें तृषा हरते, व थंडोसा वाटतो. पेलाभर चहांत वा काफींत दोन पळा लिंबाचा रस घालून सेवन केल्यास डोकें दुखणें बंद होतें लिंबाचा रस पाण्यांत घालून त्यानें तोंड धुतलें तर दांत, व तोंड स्वच्छ होतात, श्वासाची दुर्गंधी नाहींशी होते, आणि हिरड्यांतून रक्त येत असल्यास बंद होतें. हजारों टूथ पावडरि (दंतमंजन) पेक्षां एकट्या लिंबाच्या रसानें कार्य होणार आहे. लिंबाच्या वा बाभळीच्या झाडाच्या काड्या तोंड धुण्यास मुद्दाम घेत असतात हें पुष्कळांच्या पाहण्यात असेलच. तसेंच लिंबानें सर्वांग स्वच्छ होतें ह्मणून आपण स्नानाचे वेळीं लिंबू लावून स्नान पुष्कळदां करितो. कंडूचे रोग जसे खरूज, नायटे हेहि ह्या रसानें बरे होतात. संधिवातावर हें रामबाण आहे असें पुष्कळ वैद्यांचें ह्मणणें आहे. ज्याला ही विकृती जडली असेल त्यानें दररोज चढत्या प्रमाणावर लिंबाचें सेवन करीत जावें ह्मणजे त्यास आराम पडेल. चिच लिंबूनें भाडीं घासल्यास फार लखलखीत निघतात हें तर मशहूर आहेच.

लिंबाच्या अंगीं घाण नाहींशी करून स्वच्छ करण्याचा अप्रतीम गुण आहे. कपड्यास पडलेले मळके डाग मीठ व लिंबाचा रस लाविल्यानें जातात. व कपडा खराब होत नाहीं. फारच जुना डाग असल्यास दोन तीन वेळां लिंबाच्या रसांत धुतावें ह्मणजे झालें. याच प्रमाणें लिंबाच्या रसानें पाणी शुद्ध व निरोगी होतें. एका लिंबाचा रस अच्छेर पाण्यांत घालून तें पाणी थोडा वेळ राहूं दिल्यास त्यांतील जीवजंतु मरतात व पाणी पिण्याजोगें होतें. ह्या गोष्टीचा अनुभव आपणांस फार फायदेशीर व आरोग्यकारक होणारा आहे.

लिंबू हें औषधिक आहे व तें औषधांच्या अनुपानामध्यें एक प्रधान अनुपानच होय. लिंबाच्या व आल्याच्या रसांत हजारों गुटिका व औषधी नित्य देण्यांत येतात. लिंबाचे अंगीं जो क्षार आहे त्यामुळेंच ह्याची इतकी मातबरी आहे. लिंबाचा केव्हां उपयोग होईल याचा नेम नाहीं. तें नेहमीं आपल्या घरांत ठेवण्यास चुकूं नये. नित्याच्या व्यवहारांत लिंबाचा उपयोग जितका करवेल तितका करावा. त्या पासून अपाय होण्याची भीति नाहीं. पण लिंबें हीं बाजारांत अती महाग मिळतात. पूर्वीं तीं फारच स्वस्त होतीं पण तो स्वस्ताईचा काळ आतां उरला नाहीं, व आपणांस हा यःकश्चित पण उपयुक्त पदार्थ मिळण्यास कठीण जावें हें आपलें दुर्दैव होय.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध २ शके १८२४

## पाऊस पाणी

आमच्या वऱ्हाड प्रांतांत आर्द्रा नक्षत्राच्या चतुर्थ चरणांत पाऊस चांगला पडला व पुनर्वसु नक्षत्राचा प्रारंभही मोठा आल्हाद कारक झाला आहे. सर्व प्रांतभर पावसानें आनंदाची वृष्टी केली आहे ह्मटलें तरी चालेल. जुनी ह्मण अशी आहे कीं, आर्द्रा नक्षत्राचा पाऊस पडला तर आर्द्रांचौक ह्मणजे आर्द्रा पासून मघा पर्यंत चार नक्षत्रें पाऊस चांगला होत असतो. आर्द्राचा जसा चौक आहे तशी मघा पंचकाची गोष्ट आहे. हा साधारण ठोकताळा आहे आणि तो अनुभवानेंही पुष्कळदां खरा ठरतो. या आठवड्यांत जो पाऊस पडला तो सर्वत्र सारखा पडला नाहीं; कोठें दोन इंच, कोठें तीन इंच व कोठें एक इंच असा प्रकार आढळतो. कित्येक स्थळीं तर असे चमत्कार घडले कीं पाव मैलाच्या अंतरावर पावसाचा लघुगुरुपणा दिसून येत असे. एका प्रकारची खंड वृष्टी होत आहे तथापि गोळाबेरजेनें ही गोष्ट खरी कीं पेरणीच्या कार्याला पुरेसा पाऊस सर्वत्र झाला आहे. वार्षिक पावसाळ्याला प्रारंभ यंदा एक महिन्याच्या अवधीनें होत आहे असा रंग दिसतो. कोलंबोपासून पुढें मलबार किनारा, कारवारचा भाग व तसाच काठेवाडाचा किनारा या भागांकडे पाऊस आतां चांगल्या जोरानें वळला आहे आणि असें अनुमान आहे कीं, या पुढें लवकरच चांगला पर्जन्य होईल.

पंजाब– अमृतसरच्या भागाला पाऊस कमी आहे. खरीपाचे पेरे तहकूब आहेत. हिस्सारच्या भागांत पेरण्या साधल्या आहेत पण पाऊस पाहिजे. मूलतानकडे या पेक्षां विशेष समाधानकारक स्थिती आहे. दिल्लीकडे झालेल्या पेरणीला पाऊस फार जरूर व लवकर पाहिजे.

वायव्य प्रांत– आग्र्याच्या भागांत कापसाची पेरणीच अजून नाहीं. कानपुराकडे पावसाचीं चिन्हें आहेत पण पर्जन्य अजून नीटसा झालेला नाहीं.

मुंबई इलाखा– अमदाबाद व काठेवाड या दोन्ही भागाला पावसा विषयीं मोठी ओरड आहे. प्रत्यही लोक आकाशाकडे डोळे लाऊन उभे आहेत. दुष्काळाचीं किरकोळ कामेंही सुरूं करण्याचे हुकूम सुटले आहेत. भडोचच्या भागाला अशीच हाकाटी आहे. खानदेश व धारवाड या भागाला पेरण्या साधल्या आहेत तरी पाऊस पाहिजे. सोलापूर, अहमदनगर वगैरे भागांला पावसाची रडकथाच आहे. कोंकणांतली पिकें पाऊस नसल्यामुळें करपून चाललीं आहेत.

मद्रास— या प्रांतांत पावसाची रमारमी आहे. साधारणपणें शेतकीच्या कामाला प्रारंभ नीट झालेला आहे. या पुढें पाऊस मात्र वरचेवर पाहिजे.

यंदा पर्जन्याला प्रारंभ उशिरानें झाला आहे तेव्हां मोठीशी काळजी करण्याचें कारण दिसत नाहीं. पर्जन्या विषयींचें सरकारी माहित चांगलें नाहीं व त्याच्यावरून पुष्कळशा शुभ गोष्टी निघत नाहींत. तथापि दुष्काळा सारख्या अशुभ गोष्टी त्या भाविष्य कथनांत वर्तविलेल्या नाहींत हें विसरतां कामा नये. नुकतेंच एक भविष्य असें प्रसिद्ध झालें आहे कीं, हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या भागांत १९ जुलैच्या सुमाराला अतोनात जलवृष्टी होऊन महापूर येणार आहेत. सध्यां ईश्वरी प्रसादाचीं चिन्हें दिसत आहेत आणि पुढेंही त्याच्याच कृपेनें हा देश धनधान्यानें समृद्धि पावेल!

## पश्चिम आकाश

गेल्या आठ दहा दिवसापूर्वी रोज सायंकाळीं पश्चिम आकाशाचा देखावा मोठा रमणीय दिसत होता. त्या वेळचा आरक्तपणा पाहून असा भास होई कीं, पश्चिमेच्या क्षितिजानवळचे ढग ह्मणजे तप्त लोहाचे पत्रेच चलन वलन करित आहेत कीं काय! मेघ इतके दर्शनीय क्वचित्‌च दृष्टीस पडतात. नित्याचा पांढुरका सुवर्णपणा जाऊन विलक्षण रक्तिमा दृष्टीस पडत असे. हा चमत्कार पुष्कळजण एकमेकाला दाखवीत असत व आश्चर्य करीत विसरूनही जात असत. आमच्या प्रांतांत दिसणाऱ्या पश्चिम आकाशाचा देखावा मुंबईच्या समुद्राच्या कांठीं फारच विलक्षण दिसत होता असें आतां मुंबईच्या पत्रावरून समजतें. सायंकाळचा संधिप्रकाशही या आरक्त मेघा मुळें अधीक वेळ टिकला आहे असा भास होत असे. कित्येक लोक या आरक्त मेघदर्शनाचा संबंध दुष्काळाशीं जोडत असत. मुंबईच्या कांहीं शास्त्रज्ञांनीं असें अनुमान बांधलें आहे कीं, वेस्ट इंडिज बेटांतील ज्वालामुखी पर्वतांनीं जो नुकतांच प्रळय केला त्या प्रळयांतील अग्निरस वातावरणांत विस्तृत होऊन फार उंचवर गेला; उंच वातावरणांत वायूचा वेग दर तासाला १२० मैलापेक्षांही अधीक असतो; तेव्हां या वायूच्या वेगानें हा अग्निरस फारच उंच गेला. तितक्या उंचीवर सायंकाळीं त्या अग्निरसाच्या प्रवाहावर सूर्याचे किरण पडत असत व ते परावृत्त होऊन क्षितिजा जवळील ढगाना आरक्त करून संधिप्रकाशाचा कालही वाढवीत असत. अशा प्रकारचे नाना तर्क चालूं आहेत. अलिकडे शास्त्रें फार वाढलीं व जो तो सिद्धान्त इंग्रजींत असल्यामुळें व सर्वच विद्या अगम्य वाटूं लागल्यामुळें पुष्कळ लोक आकाशांतील चमत्कार पाहण्यांत वेळ घालवीत नाहींत. पण ही मोठी चूक होत आहे. निरीक्षणानें सृष्टीचें सौंदर्य आपलेंसें होतें आणि निरीक्षणाचा अभ्यास ठेविला ह्मणजे एका प्रकारची अगाध व अमूल्य आनंदाची खाणच सांपडल्या सारखें होतें. अलिकडील शास्त्रीय शोध तर असें सांगतात कीं खगोल विद्येचा भूगोल विद्येशीं निकट संबंध आहे इतकेंच नाहीं तर खगोलानें भूगोलावर एका प्रकारची आकर्षणशक्ति सोडली आहे आणि तिच्या योगानेंच पृथ्वीचे सर्व व्यापार चालले आहेत. पावसा संबंधानें अनुमान पक्कें काढण्याला आकाशाची रचना पुष्कळशी आधारभूत होईल. साधारण सिद्धान्त भूतकालीन खगोलाच्या व भूगोलाच्या दर्शनांतील साम्यावर बसविलेले आहेत. प्रत्यकानें सृष्टीचें निरीक्षण करण्याचा अभ्यास ठेवावा ह्मणजे त्याला सृष्टीच आपले चमत्कार समजावून देईल.

## कामशास्त्र

कामशास्त्र फार जुनें आहे. जगाच्या उत्पत्ती बरोबरच या शास्त्राचा पहिला दगड बसविण्यांत आला. काम किंवा प्रेम ही जगाची एक शृंखला आहे आणि तिच्याच आकर्षण शक्तीनें जगाची विलक्षण राहटी चालूं आहे. उपलब्ध कामशास्त्रांत स्त्री पुरुषांचे निरनिराळे वर्ग केले आहेत आणि कोणत्या वर्गांतील पुरुषाचा संगम कोणत्या वर्गांतील स्त्रीशीं सुखकर होतो इत्यादि माहिती पुष्कळ दिलेली असते. किंत्येक कामशास्त्रांत मनुष्याच्या शरिरांत खेळणाऱ्या विद्युत्प्रवाहावर मीमांसा केलेली आहे. धनविद्युत् व ऋणविद्युत् या दोन प्रकारावर सर्व विचार बसविलेले आहेत. अनुभवही असें सांगतो कीं, मनुष्याची विद्युच्छक्ति त्याच्या मुखाच्या ठायीं संकलित झालेली आहे आणि नेत्राच्या द्वारानें या विजेचें उत्सारण किंवा आकर्षण शक्ति क्षणोक्षणीं व्यक्त होत असते. एका माणसाची मुखचर्या आपोआप लोभ उत्पन्न करिते व त्याच्या उलट एखादी मुखचर्या तिरस्कार उत्पन्न करिते. एकीचें आकर्षण व दुसरीचें उत्सारण अशा दोन्ही गोष्टी अगदीं स्वाभाविक दिसतात व सामान्य दृष्टीला तर त्या निर्हेतुकच दिसतात. यावरून काम शास्त्राचा विषय इतर शास्त्रा इतकाच गहन आहे; व त्याची चतुःसीमा अजून कोणी रेखिलेली नाहीं.

काम हा आपण मनोविकार समजतों आणि ही मनाची स्फुर्ती नाहीं असें कोणीही ह्मणणार नाहीं. परंतु अलिकडे मनाचा व शरीराचा परस्पर संबंध अती निकट व सूक्ष्म आहे असें कळल्या पासून शरीरधर्मा ला मनोधर्म परिपोषक आहेत व त्यांचा व्युत्क्रमही तसाच खरा आहे असें ठरलें आहे. अगदीं नवीन शोधानें तर कामाच्या विकाराला शरीर धर्मांत आणून बसविलें आहे. प्रोफेसर फेरी व फ्लेअरी या दोन शास्त्रज्ञांनीं असें ठरविलें आहे कीं, कामाचा एक सूक्ष्म कृमि आहे आणि तो मनुष्याच्या किंवा इतर प्राण्याच्या शरीरांत इतर रोगा प्रमाणें कामाच्या मनःस्फूर्ती उत्पन्न करितो. कामाचा कृमि नवा वाटेल पण तो खरा आहे असें त्या प्रोफेसरांचें ह्मणणें आहे. या नव्या शोधाचा दुसरा सिद्धान्त असा आहे कीं, या कामाचा कृमि मोठा विषारी आहे. पण या कृमीचें विष अफिमीच्या द्रव्या प्रमाणें सुखकारक किंवा अपाय कारक करितां येतें. अफूच्या अर्का प्रमाणें कामाचें विष आहे. तें घातुक आहे व सुखकरही आहे. त्याला जसा योजक मिळेल त्या प्रमाणें नाना प्रकार बरे वाईट घडतील. अफू प्रमाणें हें विष मोठें मादक आहे. मोठमोठे खून या कामकृमीनें दररोज घडत असतात. या काम विषानें कुटुंबें ऱ्हासास पोचलीं आहेत किंबहुना त्याचे परिणाम राष्ट्रावरही अनेक वेळा घडले आहेत. कामाला कवी अमृत ह्मणतात, मधु ह्मणतात व असेच गोड दृष्टांत देतात पण वरील प्रोफेसर कामाला विष ह्मणतात. तें विष सजीव असून अमृता प्रमाणें किंवा मधू प्रमाणें निर्जीव नाहीं. आमच्या कामरूपी देवाला देह नाहीं ह्मणून अनंग ह्मणतात पण विसाव्या शतकांत त्याला कृमीच्या सूक्ष्म देहधारी वर्गांत आणून बसविलें आहे. कामाचें विष हळूं हळूं भिनतें, गात्रावर एका प्रकारची भूल घालते व या विषानें प्राण्याचें मन खुनशी व मत्सरी होतें. या विषाचा शरीरांत प्रवेश झाला ह्मणजे याचे परिणाम फार विचित्र होतात. ते अगदीं अगम्य आहेत अफूच्या सेवनानें जसा प्रकार घडतो तसा या विषाचा प्रादुर्भाव झाला ह्मणजे होतो. आपल्या इच्छेची कर्तुम् शक्ति नाहींशी होते. विचार शक्तीला दूर फेंकण्यांत येतें. आपलीं कर्तव्यें आपण विसरतों व आपली भावी कार्यमाला व तदन्तर्गत परम इष्ट हेतु निष्फळ होतात. किंबहुना या विषानें आह्मी अगदीं परवश होतो आणि त्या नंतर आपण वाटेल त्या अतिरेकाच्या गोष्टीला प्रवृत्त होतो. या कामकृमीच्या तडाख्यांत जो सांपडतो त्याची स्थिती चटकन ओळखतां येते या रोगाची बाधा जडते तेव्हां एक माणूस दुसऱ्याला कसा मतिभ्रष्ट करितो, त्याच्या हातून कशा नाना चेष्टा करवितो, गायनामुळें स्त्रिया गवयाला कशा वश होतात, शिकलेल्या व गुणी स्त्रिया धिप्पाड व कसरती पुरुषाला कां भुलतात, कांहीं विद्वान्, अब्रूदार व कुलीन पुरुष रंगभूमीवर नाचणाऱ्या स्त्रियांच्या नादीं कसे लागतात इत्यादि गोष्टींचा उलगडा या प्रेमकृमीच्या विषानेंच होण्या सारखा आहे. कामाचा हा स्वाभाविक परिणाम झाला पण जर हें विष आपण मोठ्या युक्ति प्रयुक्तीनें नीटपणें घेतलें तर या विषाचा परिणाम शरीरावर फार उत्कृष्ठ होतो व सर्व आनंद आल्हाद व कैवल्यसुख याचें अधिष्ठान आपण हा देह करूं शकतो.

## आनंदवृद्धि

( बादशहाची आरोग्य संपदा )

बादशहा एडवर्ड सरकार एकाएकीं आजारी झाले व राज्याभिषेकाचा सुमुहूर्त लांबणीवर पडला याबरोबर कोट्यावधी प्रजाजनांनीं मनोभावानें परमेश्वराचा धांवा केला आणि त्यांच्या प्रार्थनेला स्थळ मिळून ईश्वर कृपेनें बादशहाची प्रकृती सुधरूं लागली. हरवडी व हरदिवस त्यांच्या प्रकृतीला उत्कृष्ठ आराम पडत चालला आहे आणि उत्तरोत्तर बादशहा एडवर्ड महाराज यांस पूर्ववत् शक्ति येऊं लागली आहे ही आनंदाची गोष्ट होय. दररोजच्या तारेंतील बातम्या हा आनंद वृद्धिंगत करीत आहेत आणि आह्मी देवापाशीं प्रार्थना करितों कीं बादशहाला लवकर आरोग्य संपदा प्राप्त होवो व ते सिंहासनावर अभिषिक्त होऊन चिरकाल सुखानें राज्य करोत! ही प्रार्थना सफळ

करण्या इतकीं प्रसादचिन्हें परमेश्वरानें पूर्वीच पुढें धाडलीं आहेत; आणि तींच आपल्या भावी सौख्यराशींचें आश्वासन होत.

# The Berar Samachar

MONDAY JULY 7 1902

A volume has been lately published on the material and moral progress of India in the year 1900—01. It is an annual publication and is the 37th volume in the series. It is reviewed in the columns of the last issue of India. The volume repeats the self—same story of progress though it has to deal with figures connected with the exports and imports of India in one of the most trying periods of vicissitudes through which India has passed with the loss of her millions of people. The effects of drought and famine do not seem to viciate the truth of the material progress of India. We fail to see how one can conjure up facts and figures to prove that the Indian empire is progressing well in spite of the draw—back of the last famine. It would be a matter for congratulation if the volume be really true to facts that we have to face in our daily life. The poverty of India is abnormal and we do not know how its tremendous growth can be checked if the country has to make up its fortune solely on the agricultural produce. We do not represent a nation that makes a real progress in material advancement. We are almost dead as a commercial and industrial nation. We have lost all our industries and there are no prospects of reviving them unless the whole policy goes through a radical change. The main cause of our poverty is the absence of scope wherein millions of our people can work for bread. Agriculture is overcrowded and cannot afford to maintain a nation of idlers. Ours is the famine of wages: and it means the famine of money.

It is also painful to see how we are further losing our little control over the small industries that are yet *Native* in their character. The other day there was a question in the parliament about the probable loss of the silk industry in Kashmir. A foreign syndicate of English capitalists is carrying out negotiations with the Kashmir Durbar in order to obtain a transfer of this indigenous industry to themselves. It is well that the Durbar is deadly against such a proposal. What is true of this silk industry is true of a number of local industries which have been usurped by the foreigners most of whom represent the interests of the ruling people. Native industries are at a dead stand. This is the worst result which the principles of Free Trade have brought home to India. The vast Indian empire illustrates in a painful manner what a foreign policy of free—trade can do to kill the native industries and what a great mass of wealth it can take away to the aggrandisement of the ruling nation. We cannot continue to remain blind to the disastrous effects of a free—trade policy on India. We have not the slightest hesitation to condemn this policy as it has proved to be the curse of our country. We come forward to advocate *protection*. It is this measure which all governments in the civilized West have adopted when they had to foster and develop an industry of their own in face of the stirring competition of other nations. We shall not be at all sorry if our imports be discontinued to-morrow. We do not think that we shall have to starve ourselves even for a day. What we advocate is a policy of protection. It is required to give an impetus to our old industries which once supplied us with our necessaries as well as things of our comfort and luxury. Our old kings, nobles and grandees were not less themselves than the great people of the present day who roll in wealth and luxury. A policy of Protection can alone save us from the downfall of our industry and commerce. Events of the past teach this lesson and we hope that our Government will come forward to minimize the absorbing and conflicting interests of the Britishers at home and will at least rule over India for India's sake. This policy of Protection is needed until India becomes powerful in her own market and hopes to give a fierce competition to the nations of the West in foreign markets also. We wish to arrest the course of present events and wish to try our luck once more in the arena of industry and commerce. Before the government grant our request let us begin to respect ourselves and to restrict our wants to the things that we can hope to produce in our own country. In this spirit of self-denial there lie our great hopes of the future. Our proposals may not be the best but they are worth the experiment. Action even though mistaken is thousand times better than the philosophy of in—action. It will clear up our wrong notions and throw more light on our path in the future.

## वऱ्हाड

हवामान— आर्द्रा नक्षत्रानें बहार केली जमिनींत आर्द्रता येऊन पेरणीचीं कामें चांगलीं सुरू झालीं. मनस्वी उकाडा होतो, अतिशय गुदमरतें. पावसाचा जोर विशेष आहे असें दिसतें. रोगराई कांहीं नाहीं. एकंदर पाऊस ३ इंचा पर्यंत झाला आहे.

कुमार श्री हरभामजी रजवाजी डिपुटी कमिशनर हे काठेवाडांतून काल रोजीं परत येऊन आपल्या कामावर रुजूं झाले. त्यांची प्रकृति आतां चांगली दुरुस्त झाली असल्या मुळें ते अधीक हुरूपानें व उल्हासानें आपल्या जिल्ह्याची आबादानी कायम ठेवितील.

रा. रा. हरीहर काशीनाथ पाटील यांची फर्लो रजा संपल्यामुळें त्यांनीं ज्युडिशिअल कमिशनरच्या क्लार्क आफ कोर्टाच्या जागेचा चार्ज घेतला.

आणि या मुळें रा. रा. मारुती हरी हे इलिचपूरच्या डिपुटी कमिशनरचे क्लार्क ऑफ् कोर्ट झाले व तेथील आक्टिंग क्लार्क ऑफ् कोर्ट रा. रा. माधवराव गणेश यांस बडनेरा स्मालकाज कोर्टावर बदलण्यांत आलें.

रा. रा. कृष्णराव पुरुषोत्तम भट बी. ए. एल. एल. बी. तहशिलदार, मलकापूर यांचा हात गाडी उलथल्यामुळें नायबंद झाला व ते दोन अडीच महिन्यांच्या रजेवर गेले आहेत.

यांच्या रजेंत चांदूरचे नायब तहशिलदार रा. रा. उत्तमराव यशवंतराव यांस नेमल्या प्रमाणें ते या तहशिलीवर जाऊन रुजूं झाले.

कुमार श्री हरभामजी साहेब रजेवरून परत आल्यामुळें रा. रा लक्ष्मण गोपाळ देशपांडे आक्टिंग एक्स्ट्रा असि. कमिशनर व माजिस्ट्रेट वर्ग १ यांस मोर्शीस तहशिलदार नेमण्यांत आलें.

मोर्शीचे तहशिलदार मि. मीर आलम यांच्यावर अन्न नुकसानी बद्दल उमरावतीस फिर्याद चालूं असून ते सध्यां रजेवर आहेत.

रस्तेलूट— पारस-बाळापूरच्या रस्त्यावर गेल्या १० दिवसापूर्वीं सात आठ बदमाषांनीं पांच सहा लोकांस बेदम मारलें व कांहीं माल चोरून नेला. या रहदारीच्या रस्त्यावर पोलिसचा बंदोबस्त असाच कच्चा राहिला तर मोठ्या दहशतीची गोष्ट होय.

आकोल्याचे रस्ते अगदीं नम्रतेला पोंचले आहेत. रस्त्यावर ठिकठिकाणीं खड्डे पडले असून मोठमोठे दगड टेंगळा सारखे वर उभे राहिल्यामुळें यांच्या अणकूची पायाला फार बोंचतात. आतां पाऊस पडूं लागला आहे तर मुनसिपालिटीनें रस्त्यांची सुधारणा तावडतोब करून लोकांस सुखी करावें.

मेजर हेग साहेब, वऱ्हाडचे सेक्रेटरी यांस पोलिटिकल एजंट वर्ग ३ ची बढती मिळाली आहे.

मोर्शी तालुक्यांतील वरूड व शेंदूरजन या दोन गांवासाठीं ३ रे वर्ग माजिस्ट्रेटांचें बेंच नेमण्यांत आलें असून या बेंचामध्यें खालील गृहस्थ माजिस्ट्रेट म्हणून राहतील:-

रा० रा० तुकाराम मल्हारराव, स्पेशल माजिस्ट्रेट, शेंदुरजन.

रा. रा. आनंदराव तुकाराम देशमुख, व आण्णाजी ऊर्फ वासुदेव लक्ष्मण, वरुड.

मलकापूर व खामगांव येथील प्लेगाचा आजार बंद झाल्यामुळें प्लेगानें दूषित असलेल्या प्रांताच्या यादींतून वऱ्हाड प्रांत काढण्यांत आहे. आला ही आनंदाची गोष्ट होय.

वाशिमचे सिव्हिल सर्जन आनररी लेफ्टेनंट मांटगोमरी यांची बदली यवतमाळास होऊन यवतमाळचे सिव्हिल सर्जन डा० जोन्स यांस वाशिमास बदलण्यांत आलें.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००। |
| सोनें | २४॥ |
| चांदी | ६७ |
| जवस | १४५ |
| ज्वारी | ९६–९८ |
| गहू | १२० |
| चणे | ७५ |
| मीठ | ३॥– रु. मण |
| बाजरी | ३। रु. मण |
| तूप | ७॥ रु. मण |
| तेल | ६॥।– रु. मण |

आकोला ता. ६।७।०२

'प्रेक्षक' लिहितात कीं कालच्या शारदा नाटकाच्या प्रयोगांत कोदंडानें आपला भाग उत्कृष्ठ केला. शारदेचा आवाज गोड होता पण तिचें काम पुष्कळच बिनसलें. भटजी मंडळींनीं हास्य रस उत्पन्न केला खरा पण त्यांच्या भूमिका आपल्या मर्यादेबाहेर गेल्या सांभाचा सीन चांगला होता. एकंदरीनें खेळ बरा झाला. मित्रसमाजाला नाटक मंडळीचें यथायोग्य स्वरूप येण्याला पुष्कळ अभ्यास पाहिजे आहे. तमासगीर मंडळी फार उच्छृंखलपणा करितात हें नित्य होय!

### नोटीस

वेशमी दत्त वा। देवाजी पाटील वस्ती धावंड तालुके मंगरुळपीर यांस.

या नोटिशीनें खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं आमचे नांवें असलेलें शेत गोंडेगांव तालुके मंगरुळपीर जिल्हा वाशीम येथील शेत सर्वे नंबर २० एकर २१ गुंठे १३ आकार रुपये १२॥।= सदर्हू शेत आपले कडेस स्वामित्वानें दिलें होतें त्याची मुदत चालूं सालीं संपल्यामुळें ते शेत कृष्णाजी वा। खडूजी राहणार दिगरस याचे ताब्यांत देण्या विषयीं तुम्हास पूर्वी दोन वेळा लिहिलें असोन अद्याप ताब्यांत दिलें नाहीं व पेरणीचे दिवस फार नजीक आले आहेत करितां ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचें आंत वर लिहिलेले शेत कृष्णाजी वा। खडूजी यांचे ताब्यांत द्यावें. सदर्हू मुदतींत शेत ताब्यांत न दिल्यास चालूं सालचे पिकाचे नुकसानी बद्दल रुपये ३०० सहीत, व नोटिसीचे खर्चा सहीत तसेच मागचे येणें असलेलें स्वामित्वाचे रुपया सहीत शेत ताब्यांत मिळण्या विषयीं कोर्टात दावा केला जाईल. कळावें तारीख ६।७।०२ इ.

सही

वामन संतो इजारदार मौजे राहटी मुक्काम आकोला.

### नोटीस

बापु निचेकर कोमटी वस्ती दिगरस यांसः-

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, आमचे नांवें असलेले मौजे गोंडेगांव तालुके मंगरुळपीर जिल्हे वाशीम येथील शेत सर्वे नंबर १६ एकर १९ गुंठे ३० आकार रुपये १२॥।= सदर्हू शेत आपले कडेस स्वामित्वानें दिले होते त्याची मुदत चालूं सालीं संपल्यामुळें ते शेत कृष्णाजी वल्लद खडूजी राहणार दिगरस याचे ताब्यांत देण्याविषयीं तुम्हास पूर्वी दोन वेळां लिहिलें असोन अद्याप ताब्यांत दिले नाहीं व पेरणीचे दिवस फार नजीक आले आहेत करितां ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत वर लिहिलेले शेत कृष्णाजी वल्लद खडुजी याचे ताब्यांत द्यावें. सदर्हू मुदतींत शेत ताब्यांत न दिल्यास चालू सालचे पिकाची नुकसानी रुपये ३०० सहीत व नोटीस वगैरे खर्चा सहीत व मागचे येणें असलेले स्वामित्वाचे रुपया सहीत शेत ताब्यांत मिळण्या विषयीं कोर्टात दावा केला जाईल. कळावें. तारीख ६।७।०२ इ.

सही

वामन संतो इजारदार मौजे राहटी हल्ली मुक्काम आकोला.

## वर्तमानसार

उंदीर व घुशी यांचा पाऊस— आलजिरिया प्रांतांमध्यें एके ठिकाणीं एकदम मोठें वादळ उठलें व १५–२० मिनिटें उंदीर व घुशी यांचा पाऊस पडला व त्यामुळें सर्व शेतें आच्छादून गेलीं वरून पावसांतून उंदीर घुशी वगैरे प्राणी कोठून कसे येतात हा मोठा चमत्कार आहे. याचा शास्त्रीय तऱ्हेनें काय उलगडा आहे याचा शोध झाला पाहिजे.

विचारमापक यंत्र— या नांवाचें एक यंत्र प्रो. मासो नांवाच्या एका इटालियन प्राणी शास्त्रज्ञानें तयार केलें आहे. जसें उष्णता मोजण्यास पारा साधनीभूत होतो तद्वत् रक्ताच्या चलनानें विचाराचें वजन काढतां येतें. यंत्र फारच नाजूक कांटेकोर आहे. याच्या योगानें दोन निरनिराळ्या भाषा वाचण्यास किती श्रम पडतात हें सुद्धां कळतें. कल्पना अपूर्व आहे खरी!

फार योग्य हुकूम— ईस्ट बंगाल रेलवे कंपनीनें एक सरक्युलर काढून आपल्या हातांखालील नोकरांना असें सक्तीनें बजाविल्याचें समजतें कीं या पुढें तिसऱ्या वर्गाचे डब्यांत जितके उतारू बसावेत असा नियम आहे त्या पेक्षां जास्त उतारू त्यांत बसविल्याचें नजरेस येईल तर तसें करणाऱ्या नोकरांस नालायक ठरवून एकदम कामावरून काढण्यांत येईल. ज्या स्टेशनावरून गाडी सुटेल व ज्या स्टेशनापासून असे जास्त उतारू प्रवास करीत आहेत असें आढळेल त्या सर्व स्टेशनचे स्टेशन मास्तर, टिकिट कलेक्टर व गाडीबरोबर असणारा गार्ड यांस जबाबदार धरलें जाईल. यांनीं जास्त उतारू न बसतील अशाबद्दल योग्य बंदोबस्त ठेविला नाहीं म्हणून त्यांना शिक्षा केली जाईल. ट्राफिक इन्स्पेक्टरांनीं वारंवार या गोष्टीकडे लक्ष पुरविलें पाहिजे व यांचे नजरेला जास्त उतारू गाडींत बसले आहेत असें येतांच त्यांनीं डिस्ट्रिक्ट ट्राफिक सुपिंटेंडंटाकडे रिपोर्ट केला पाहिजे. लहानसान रेलवे कंपन्यांनीं लोकांची दाद घेऊन व्यवस्था करावी व जी. आय. पी. रेलवे वगैरे सारख्या मोठमोठ्या कंपन्यांनीं असल्या कामीं मुग्धता स्वीकारावी हें लांछनास्पद नाहीं काय? दे० से०

विदुषी राणी— गोंडल संस्थानच्या राणीसाहेबांनीं आपल्या युरोपांतील प्रवासांत तिकडील लोक व त्यांच्या चालीरीती या विषयावर ७०० पानांचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. राणीसाहेब मोठ्या हुषार विदुषी दिसतात.

विजेच्या दिव्याचीं बटनें— पारिस येथें पोलिसचे कोटावर विजेच्या दिव्याचीं बटणें लावलेलीं असतात व त्यांतील एक बटन दाबल्या बरोबर उजेड पडतो. बदमाष लोकांना रात्रीं पकडण्यास ह्या दिव्यांचा मोठा उपयोग होतो.

सूचना— सरकार पक्षाचें म्हणणें जाहीर करण्यासाठीं मोठ्या खर्चाचे छापखान्याचे कारखाने न काढतां देशी पत्रें जीं ज्या ठिकाणीं निघत असतील त्याच पत्रांत निरनिराळे प्रश्नावर सरकारची दुसरी बाजू प्रसिद्ध करण्याकरितां पाठवून द्यावी. म्हणजे दोन्ही बाजू एकदम उमटून पडतील.

ज्यानें त्यानें आपल्या नशिबानें घ्यावें— [illegible]

बपण्यास चांगलीं घरें बांधण्यासाठीं डाक्याच्या नबाबांनीं १५००० रुपये दिले आहेत मनुष्यें अस्वलें झालीं नाहींत, हें त्यांचे दुर्दैवच म्हणावयाचें.

नवीन शोध— दुधांतलें पाणी साफ काढून तें दूध पिठाप्रमाणें (कंडेन्स मिल्क सारखें) विकण्याची तजवीज स्वीडन येथील लोकांनीं केली आहे.

हुंडा न घेण्याचा कट— बंगाल्यांतील तरुण सुशिक्षित मुलांनीं मुलीचे बापापासून हुंडा न घेण्याचा कट केला आहे.

धार संस्थानिकाची सहानभूति— विलायतेंत होणाऱ्या राज्यारोहणानिमित्त येथील अधिकाऱ्यांनीं शेतकऱ्याकडे थकलेला ८ लक्ष रुपये शेतसारा माफ केला. धन्य आहे!

चमत्कार— रामपूर येथें एक पिंपळ मुळासकट वादळानें उपटून पडला होता. म्हणून त्याच्या फांद्या लोकांनीं तोडून नेल्या. पुढें तें खोड आपोआप उभें राहिलें. स्थानिक व परकीय लोक या चमत्काराचें आश्चर्य करीत आहेत.

परोपकाराय पुण्याय— सुरतेचे स्वर्गवासी श्रीमंत गृहस्थ मि. यूसफ महमद सुलेमान बोटा यांनीं आपल्या मालमत्तेपैकीं वीस लक्ष रुपयांची रकम धर्मादयाकडे खर्चावी असें मृत्युपत्रांत लिहून ठेवलें आहे.

गमतीचा निकाल— कोणी खुदाबक्ष नांवाचा मुसलमान दररोज मशिदींत जाऊन लोकांच्या निमाजाचे वेळीं 'आमीन' म्हणून मोठ्यानें ओरडत असे व त्यामुळें लोकांचीं मनें व्यग्र होऊन ईश्वर प्रार्थनेचा विरस होई. म्हणून त्याजवर खटला चालला होता. व त्यास असें न करण्याबद्दल ताकीद मिळाली होती. त्यावर त्यानें अपील केलें व लाहोर हायकोर्टानें ठरविलें की, तो स्वतां प्रार्थना करीत असतो व त्याचा हेतु दुसऱ्यास त्रास द्यावा हा मुळींच नाहीं. अशी ईशप्रार्थना करण्यास त्यास मोकळीक आहे व त्यामुळें दुसऱ्यास त्रास होत असल्यास उपाय नाहीं.

भक्तांचा मेळा— ता. ३० रोजीं देहू व आळंदीहून पुण्यास पालख्या आल्या. त्या बरोबर पांच हजार भक्त मंडळी ज्ञानबा तुकारामाचा जयघोष करीत येत होती. ईश्वरावरील श्रद्धा फार विलक्षण होय!

आफ्रिकेंतील विलक्षण चाल— वक्ता बोलायला उभा राहिला म्हणजे त्यानें एका पायावर उभें राहून भाषण केलें पाहिजे. त्यास जेवढा वेळ एका पायावर उभें राहून भाषण करितां येतें तितकाच वेळ त्यास भाषण करण्याची परवानगी असतें. खरा वक्ता बोलण्यासाठीं नेहमींच एका पायावर उभा असतो.

औदार्य— मुंबई शहरांत गुराचे सोईसाठीं हौद वगैरे बांधण्याकरितां मि० रुस्तमजी पिरोजशहा गांधी यांनीं बाबे सोसायटीकडे ९००० रु० दिले आहेत.

प्रकाश चिकित्सा— मेणबत्तीचा प्रकाश भरपूर असतां पाहणाराचे डोळे एका मिनिटांत ६.८ वेळां मिटतात. धुराच्या दिव्यानें २.८ वेळां मिटतात. सूर्यप्रकानें २.२ वेळां मिटतात. विद्युत् तेजानें हा प्रकार १.८ वेळीं होतो यावरून दीपप्रकाशवेत्यांनीं विद्युत्प्र[illegible]काश सर्वांत चांगला अशी शिफारस केली आहे.

चांगला कायदा— मद्रासचे जमीनदारांच्या मोठाल्या मालमत्ता वाटल्या किंवा विकल्या जाऊं नयेत असा कायदा नुकताच मद्रास सरकारनें केला आहे.

सशास्त्र निर्णय:— प्रो. म्यूनियर नांवाच्या फ्रेंच भूगर्भशास्त्रवेत्त्यानें मार्टिनिक येथें झालेल्या ज्वालामुखीचे उत्पाताचा पूर्णपणें विचार करून "जमिनीला कोठेंतरी भेग पडून ज्वालामुखीचें खालीं पुष्कळ पाणी गेलें व ज्वालामुखीच्या पोटांतील उष्णतेनें याची वाफ होऊन तिच्या जोरानें सदरहू ज्वालामुखीचा स्फोट झाला" असा सशास्त्र निर्णय केला आहे.

मुत्सद्दी काटकसर— हैदराबादचे दिवाण महाराज किसनप्रसाद यांनीं हैदराबाद दरबारीं काटकसर सुरू केली आहे. पण योग्य जागीं योग्य मनुष्य नाहीं अशा तक्रारीस जागा ठेविली नाहीं. शिवाय सर्व लोक खुष आहेत. एखादी जागा रिकामी झाली कीं, त्या जागेचा पगार कमी करावयाचा व दुसऱ्यास बढतीवर तेथें आणावयाचें. ही काटकसरी नांवाजण्या सारखी आहे.

सिगारेट— हिंदुस्थानांत १४ लाख रुपयांचे सिगारेट खपले. पुष्कळ सिगारेट हालंड मधून येतात. देशी विड्या लोकांना आवडत नाहींशा झाल्या आहेत.

ता० २६ रोजीं मुंबईस सर्व गरीब लोकांस जेवण घालण्यांत आलें. प्रत्येक जातीची वेगवेगळी व्यवस्था केली होती. या दिवशीं एकंदर ९० हजार लोकांस अन्नदान होऊन त्यांस जिलबी, लाडू, पुरी वगैरे जिन्नसच १००० मण लागले! राखण करण्यास १०० रामोशी, वाढण्यास २०० वाढपे लागले होते.

काश्मीरसंस्थानच्या दरबारानें आपल्या आश्रयाखालीं रेशमी कापडाचे कारखानें काढले आहेत. ते सर्व आपल्या ताब्यांत देण्याबद्दल एका युरोपियन कंपनीनें दरबारशीं पत्रव्यवहार चालविला होता; परंतु शेवटीं दरबारानें ही विनंति मान्य केली नाहीं.

खरें स्त्रीराज्य— रशियाचे एका भागांत सात खेड्यांचें एक लहानसें संस्थान आहे. त्याचा प्रेसिडेंट एक स्त्री आहे; इतकेंच नव्हे; तर मेयर, डॉक्टर, धर्मोपदेशक, माजिस्ट्रेट, पोलिस, वकील, पोर्टर, खलाशी यांचीं सर्व कामें स्त्रियाच करीत आहेत. अगदीं हलकीं कामें मात्र पुरुषांकडे दिलेलीं आहेत!

कुरूपतेसाठींच— जर्मनींतील हर्शमन शहरांतील अतिशय कुरूप स्त्रियांस दरवर्षी १६ पौंडाच्या देणग्या देण्यासाठीं एका श्रीमान् गृहस्थानें मोठी रक्कम आपल्या मृत्युपत्रांत देऊन ठेविली आहे.

पावसाची आशा— सध्यां जो हवेंत फारबदल झाला आहे त्यावरून पाऊस लवकर पडेल अशी सरकारचे वायु शास्त्रवेत्त्यांनीं आशा प्रदर्शित केली आहे. सिलोन पासून उत्तरेकडे हवेचा दाब कमी कमी होत चालला आणि हिंदी महासागरांतून बरसातीचे वारे हिंदुस्थानाकडे निघाले आहेत, या चिन्हावरून मुंबई इलाखा, वऱ्हाड मध्यप्रांत व मध्यहिंदुस्थान, या प्रांतात लवकरच पाऊस पडेल असें त्यांनीं अनुमान केलें आहे.

## खरी गोड गोष्ट

समाधानांत सुख मानून स्वतःस कोणीही फसवून घेऊं नये. खरें सुख हव्यासांत आहे; खरें सुख प्राप्तींत आहे; खरें सुख कर्तव्यांत आहे. ज्ञानाविषयीं, लौकिकाविषयीं, सुखाविषयीं, संपत्तीविषयीं, स्वातंत्र्याविषयीं, परोपकाराविषयीं, पराकाष्टेचा हव्यास असूं द्या.

शरीराच्या सहाय्यानें तुम्हांला पुष्कळ मोठालीं कामें करावयाचीं आहेत, तर शरीर जितकें धिप्पाड, दांडगें व राकट करितां येईल तितकें करणें जरूर आहे. कितीही श्रमाला व त्रासाला न जुमानण्या इतकी रग अंगांत राहिली पाहिजे.

आर्य भूमीचा व आर्यपूर्वजांचा आमरण अभिमान बाळगा. जीवानें तुम्हाला सांडीपर्यंत या अभिमानानें तुम्हांला टाकूं नये. तिची सेवा करण्याचें आणि त्यांच संस्कृतीनें उद्धार करण्याचें तुमचें तीव्र व्रत असूं द्या. देशाभिमानाला सोडून आपला घात करून घेऊं नका. हिंदुत्वाच्या अभिमानावांचून प्रत्येक हिंदु अमंगल आणि कलाहीन होय. स्वाभिमानाची ऊब ज्याच्या रक्तांत नाहीं तो मेतवत् होय. जो सर्वांचा मित्र होतो त्याचें हातून विशेष हित कोणाचेंच होत नाहीं, आणि जो कोणाचाच मित्र नसतो तो निव्वालस भुईला भारच होतो. तेव्हां ज्याला स्वहित पाहिजे असेल त्यानें आपल्या समाजाच्या आणि आपल्या मातृभूमीच्या हिताविषयीं दृढ अभिमान धरिला पाहिजे. देशाच्या पोटांत व्यक्तीचा समावेश होतो, तेव्हां देशाची दुर्दशा झाल्यावर यांतील व्यक्तीचे हाल कुत्रा देखील खाणार नाहीं. आपले उत्कृष्ट कुलाचार, आपल्या उत्तम संस्था, आपले कुलगुरु आणि आपला देदीप्यमान इतिहास यांचा पूर्ण अभिमान बाळगा. त्यांत काहीं दोष असले तरी त्याचा अव्हेर न करितां त्यात सुधारणा करा. सत्व कायम राखून सुधरा. प्रत्येक हिंदूनें सतत हिंदू राहून इमानानें आपलें कर्तव्य बजावावें अशी आर्यभूमातेची इच्छा आहे.

प्रत्येक व्यक्तीनें उत्तम शरीर बाळगून शिपायीगिरीच्या कामांत प्रावीण्य संपादन केलें पाहिजे. ज्ञानाची आणि सुखाची प्रत्येकांस इच्छा असली पाहिजे, तशीच शौर्याचीही आवड असली पाहिजे. स्वदेशाच्या रक्षणाकरितां प्रत्येक स्त्री, पुरुष, बाल, तरूण आणि वृद्ध, या तीनही अवस्थेंत आपल्या मातृभूमीचा बंदा शिपायी आहेत. स्थिति परत्वें, सभेंत तुम्ही पंडित असावें आणि संकटसमयीं समरप्रसंगीं तुम्हींच शूर शिपायीही बनावें पोटार्थी शिपायी काय काम करील? युद्धकलेचा प्रत्येकानें अभ्यास केला पाहिजे, साहसाचीं कामें करून प्रत्येकानें धाडसी झालें पाहिजे. निर्वाहाचीं साधनें हवीं त्यानें हवीं तीं उचलावीं; आवडीचे विषय रुचतील ते निवडावें; परंतु सारें राष्ट्र नखशिखांत क्षत्रिय झालें पाहिजे. यांतच तुमचें व तुमच्या राज्यकर्त्यांचें खरें हित आहे. देशसेवक.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके याचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ...
किरकोळ अंकास ........................ ६
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०। ०६
दुसरे खेपेस .... ........०।

Single copy ........................ 4 as

Advertisement
Below 10 lines...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 14 JULY 1902 NO 27

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख १४ माहे जुलै सन १९०२ इ० अंक २७

मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपयें ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.


खरेदी करा !

रास्कोपचीं थेट व खरीं पटेंट वाचेस

भकली मालास भुलून पैसे खर्चू नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉन्ट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तीच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेंकंद कांट्यासह............१०
१९ ,, मध्यभागी सेकंद काटा असलेलें ................१२
१९ ,, हाफ हंटिंगचें................२०
१९ ,, हंटिंगचें ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच ....................१०

इनगनूमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ ,, हंटिंग........................२०
१४ ,, रिस्टवॉच....................२०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग........................३५
१८ व १९ ,, ओपनफेस............३०
१९ ,, सेंकंद कांट्यासह............३२
१९ ,, मध्यभागीं सेंकंद कांटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ....................४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हॉनीगर आणि कंपनी,
ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचें सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

नोटीस

बेशमी पन्यान मर्द रावजी वाकोडे हल्ली वस्ती डोंगरगांव ता. बाळापूर, पोष्ट-शेगांव हांसः—

मी खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितों कीं, पांच सहा वर्षां पूर्वी मी रा. रा. कोंडोपंत पांडे यांची जी जागा २५ रुपयांस विकत घेतली त्या बद्दलचा कागद झालेला आहे. त्याच जागेंत तुह्मी, रावजी वाकोडे जिवंत असतांना राहत होता. तुह्मी आपचे सोयरे आहात ह्मणून तुमच्या कडून भाडेचिठ्ठी वगैरे कांहीं न घेतांच तुह्मांस फुकट जागा वापरास दिली होती. पुढें तुमची चित्तवृत्ती आमच्या संबंधानें थोडीशी अस्थिर वाटल्या वरून तुह्मांस ती जागा खालीं करून द्यावी किंवा भाडेचिठ्ठी करून द्यावी असें सांगितलें होतें. ह्मणून तुह्मी ती जागा खाली करून दिलीहि होती. नंतर कोणी तरी तुह्मांस दम दिल्या वरून तुह्मी आपलें कुटार त्या जागीं माझ्या पश्चात आणून टाकलें आहे, तर आतां ही नोटीस पोचल्या पासून चार दिवसांत आपले कुटार काढून घेऊन जावें. अगर भाडेचिठ्ठी दिल्यास मी आपणास ती जागा वापरास देण्यास अझून तयार आहे. असें मुदतींत न केल्यास मी तुमचें कुटार काढून विकून टाकीन. मग मजवर कसलीहि जबाबदारी राहणार नाहीं. जागा माझ्या ताब्यांत आहे मी तिचा उपभोग वाटेल तसा घेईन. कळावें तारीख ९ माहे जुलै सन १९०२ इ.

सहीची निशाणी
मावसिंग वल्द दर्याजी पाटील राहणार डोंगरगांव ता. बाळापूर
याचे हातची रेघ.

नोटीस

बेशमी पिरथम वल्द हनगूजी ठाकरे कुणबी राहणार वाई प्र. मंगरूळपीर ता० मोर्तिजापूर जि. उमरावती, पोस्ट— कारंजा यांसः—

मी खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितो कीं, तुह्मी आमचे कडून ६०० रुपये कर्जाऊ नेले व त्याबद्दल दस्तैवज करून दिला त्यास आजमांस २॥ वर्षे होत आलीं. पैसे पुष्कळ वेळां मागितले पण आज देऊं उद्यां देऊं करितां करितां शेवटीं चार महिन्यापूर्वीं तुह्मी सर्व पैशाची खालील प्रमाणें तडजोड ठरविली. तुह्मी आह्मांस २ बैल व १ ह्मैस देऊन शिवाय मौजे लाहोर येथील शेत सर्व्हे नंबर ३४ एकर २७ गुंठे ३७ आकार रुपये १९ निशाणी विंबीचें, ज्यातें खातें तुमच्या चुलत्याचें नांवें आहे, यांतील तुमच्या मालकीचा आठ आण्याचा हिस्सा देण्याचें ठरविलें. आणि त्या प्रमाणें बैल व ह्मैस ही आमच्या येथें आणून दिलीत, पण वरील शेतातील तुमच्या मालकीचा हिस्सा खरेदी लिहून अद्याप दिला नाहीं. तुमच्या चुलत्यानें आपला अर्धा हिस्सा आह्मांस लिहून दिला आहे त्या अर्थीं तुह्मी आपला हिस्सा देण्यास कांहींच भानगड उरली नाहीं. असें असून तुह्मी देत नाहीं ह्मणून नोटीस देणें भाग पडलें. आतां आठ दिवसांचे आंत खरेदीखत करून द्यावें. असें मुदतींत न झाल्यास शेताचा कबजा सरकार मार्फत ताब्यांत घेण्याची व्यवस्था करूं. व या कामीं जो खर्च लागेल तो सर्व तुमच्या पासून भरून घेतला जाईल. ह्मणून अगाऊ या जाहीर नोटिशीनें कळविलें आहे. कळावें तारीख ७ माहे जुलै सन १९०२ इ.

सही
अमृता वल्द भवानी अज्ञान पालन करणार भवानी वल्द भगाजी.
राहणार शेवती ता० मुर्तजापूर
पोस्ट कारंजा निशाणी खुद.

नोटीस

बेशमी माधो वल्द उदेभान पाटील राहणार बेलूर बुजरूक तालुका बाळापूर.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुह्मी १५।६।०२ तारखेची नोटीस पोस्टानें रजिस्टर करून पाठविली ती मला तारीख ९ जुलै रोजीं पोचली. तुह्मी इतकी लबाडीची नोटीस देण्याला पुढें धजला हें पाहून तुमच्या खोट्या चोरीच्या फिर्यादीची आठवण येते. तुह्माला अशा लंदीफंदीच्या नोटिसा देण्याशिवाय उद्योग दिसत नाहीं. तुमची अब्रू व किंमत पूर्वींच कळून चुकली आहे. बेलूर बुजरूक येथील माझ्या मालकीचें ‘ शिरलेवाल्या ’ नावाचें शेत आहे तें मी तुह्मास विकलें आहे अशा विषयीं तुमच्या नोटिशींत मजकूर आहे. ही नोटीस अगदीं खोटी आहे. तुमच्याशी शेताच्या विक्री संबंधानें मी एक शब्दही बोललों नाहीं. हें शेत विकण्याची गोष्ट माझ्या स्वप्नांतही नाहीं. तुह्मी इसाऱ्याचे ५ रुपये व मागाहून ३०० रुपये दिले असें लिहितां ही निव्वळ लबाडी आहे. मला कधीं काळीं शेत विकणें झाल्यास गांवाच्या महाराला विकीन पण तुमच्या साऱख्या लबाडाला विकणार नाहीं. तुह्मी ही खोटी नोटीस दिल्या बद्दल तुह्मावर मी फौजदारींत फिर्याद करणार आहे. तुमच्या ताब्यांत शेत देण्याचा प्रसंगच आला नाहीं व येणार नाहीं. अशा लबाडीच्या नोटिशीच्या जोरावर तुह्मी माझ्या शेतांत आल्याबद्दल तुह्मावर फौजदारींत अर्ज दिलाच आहे. या नोटिशीनें कळवितों कीं तुह्मी शेतांत पाऊल टाकूं नयें. आणि या मनाईला न जुमानाल तर सरकार तुह्मास योग्य प्रकारें शिक्षा करील. कळावें. तारीख ९ जुलै सन १९०२ इसवी.

सही ( मारवाडींत )
कोनीराम सूरचंद मारवाडी दुकान
तांदळी बुजरूक ता० बाळापूर.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध ९ शके १८२४

## आनंद कला

संगीता सारखी दुसरी आनंदकलाच नाहीं. संगीत ह्मणजे गायन, वादन व नर्तन या तिन्ही गोष्टींचें एकीकरण होय. संगीताची विद्या बहु अमोल आहे; पण तिची खरी किंमत आपणास व्यवहाराच्या खटाटोपांत कळूनच येत नाहीं. इतर विद्या शिकण्यासाठीं आपण जीव कीं प्राण करितो व त्यांच्या योगानें चरितार्थाची सोय करून घेतो पण संगीताच्या विद्येचा आपण व्यासंगच करीत नाहीं, किंबहुना ही विद्या इतर विद्यांच्या अर्जनांत प्रत्यवाय होईल अशा समजुतीवर संगीताला अगदीं दूर फेंकून देतों. जीवनाच्या गरजा मोठ्या असतात आणि त्या संभाळतां संभाळतां आपण अगदीं थकतो व या विद्येशीं आपली ओळखच होऊं देत नाहीं.

संगीताची विद्या खरोखर अशी त्याज्य नाहीं; किंबहुना सर्व विद्यांमध्यें तिला अग्रस्थान दिलें पाहिजे. उपयोगाच्या दृष्टीनें संगीताची मातब्बरी फार मोठी आहे. इतर विद्या संसाराची इमारत बांधतात आणि ही संगीताची विद्या ती इमारत आनंदानें भरून टाकते. इतर विद्या जीं सुखें संचित करितात त्या सुखाला अमृतपणा देणारी संगीताची कला आहे. आपण शरीरयष्टी उत्तम प्रकारें पोसतो व तिच्या सर्व शक्ति प्रचलित करितो, तेव्हां तशा स्थितींत मनाला प्रसन्नता देणारी अशी संगीताची विद्या आहे. आपल्या कार्यमाला आनंददायी करण्याला ही विद्या ह्मणजे मोठें दिव्य साधन होय. आपल्या इंद्रिय वर्गाला ही प्रोत्साहन देते आणि पंचेंद्रियाचा थकवा दूर करिते. निद्रा जशी थकलेल्या इंद्रियवर्गाला विश्रांती देते व त्यांचा शीण घालवून पुन्हां त्यास ताजेतवानें करिते तद्वत् संगीताची गोष्ट आहे. किंबहुना निद्रे पेक्षांही संगीताची योग्यता मोठी आहे. निद्रा इंद्रियवर्गाची पूर्व स्थिति परत आणिते व त्याच्या शक्तीचा ऱ्हास होऊं देत नाहीं. संगीताची गोष्ट याहून निराळी आहे. संगीत कला आपल्या इंद्रियवर्गाच्या कार्य मालेला मोठी मदत करिते. संगीतानें आनंद उत्पन्न होतो, निराळ्या स्फूर्ती उभ्या राहतात व मूळच्या कार्यशक्ती द्विगुणित होतात. मनुष्याच्या आनंदकलेची पेटी संगीत विद्या उघडते. मनुष्य प्राणी संगीतप्रिय आहे आणि त्याची मनोवृत्ती संगीतानें फार खुलते व सुप्रसन्न होते. इतर सर्व विद्यांची उपयुक्तता वाढविणारी संगीत विद्या आहे. इतर विद्यांनीं शारीरिक, व मानसिक सुखाच्या ज्या गोष्टी उपलब्ध होतात त्या गोष्टी मध्यें संगीतकला आनंदरस ओतते असें ह्मटल्यास हरकत नाहीं. आयुष्यांतील सर्व सुखकर गोष्टींचा एक रमणीय बाग जर बनविला तर त्या बागेंतील संगीतकला हें आनंद सरोवर आहे. कवी हे शब्दामृताचे मेघ व कल्पना सृष्टीचे उत्पादक होत पण त्यांच्या काव्याला खुमारी संगीतानेंच येते, व काव्याची खरी गोडी संगीताच्या द्वारानेंच चांगली कळते. संगीतकला मनुष्याला सहृदयता देते. सुस्वर गायन वस्तुनिर्देश करितें, वादन स्वराचे बोल पुनःपुनः प्रतिध्वनित करितें व नर्तन गायनांतील विषयाचें प्रतिबिम्ब मनांत उठवितें. संगीतांत गायनद्वारा प्रस्तुत विषय कळतो, वादनद्वारा स्वरलालित्यानें तोच विषय पुरा ह्रदयांत भरतो आणि नर्तनद्वारा मनामध्यें हुबेहूब तशाच स्फूर्ती उठतात. संगीतांतील हीं तिन्हीं अंगें परस्पराला परिपोषक आहेत. लढाईत रणवाद्यें वाजूं लागलीं, ह्मणजे शूरांस स्फुरण चढतें हें सर्वांस ठाऊक आहे. छनदार मुखचर्या ही मुकी शिफारस आहे. पण शृंगाराच्या समयीं त्या मुखांतून सुस्वर गाणें निघलें, त्या गाण्याचे बोल मंजूळ वाद्यांनीं प्रतिध्वनित केले व अंगविक्षेपानीं त्या गाण्याची परिस्फुटता झाली तर किती बहार उडत असते हें रसिकच जाणतात. अशी आनंददात्री ही संगीत विद्या आहे. मोठ्या वेदान्त्यालाही ब्रह्मप्राप्ती करून घेण्याला ही नौकाच आहे. ही संगीत विद्या मनःसमुद्राला आनंदाच्या लहरी आणिते आणि जे संत ईश्वराचे गुण गाऊं लागतात, हातांतील वाद्यांच्या गोड स्वरानें ज्यांचा लय लागूं लागतो व आनंदानें जे नाचूं बागडूं लागतात तेच ब्रह्मानंदांत सत्वर लय पावतात अशी साक्ष साधु चरित्रें देतात.

अशा उत्कृष्ठ संगीत विद्येचा आपण अव्हेर करितो ही दुःखाची गोष्ट होय. अलिकडे संगीताचा परिचय एखाद्या गाण्याच्या बैठकींत किंवा नाटक गृहांत होतो. व यापेक्षां आह्मी या विद्येची गरज ठेवीत नाहीं ही मोठी चूक होय. प्रत्येक विद्येला ईश्वर दत्त गुण लागतात तसे या विद्येलाही लागतात. या विद्येला सध्यां ऱ्हास काळ आलेला आहे. या विद्येचीं मुळाक्षरें तरी निदान प्रत्येकानें शिकलीं पाहिजेत; ह्मणजे या विद्येची गोडी लागल्यामुळें आपल्याला एका आनंदाच्या कलाभुवनाचा दरवाजा उघडून मिळाल्या सारखें होईल.

## पैशाची उभारणी

आकोला मुनिसिपालिटीला पैशाची मोठी अडचण आहे. घरपट्टी, जनावर पट्टी, गाडी पट्टी इत्यादि पुष्कळ कर आहेत. पण खर्चाच्या मानानें उत्पन्न पुरेसें नाहीं. उत्पन्नाची खर्चाची तोंड मिळवणी करण्यासाठीं नवीन उत्पन्नाच्या बाबी काढल्या शिवाय गत्यंतर नाहीं. जकातीचा कर बसविण्यांत न येईल तितकें बरें असा सर्वांचा अभिप्राय आहे. शिवाय जकातीचा कर वसूल करण्याला खर्च फार येतो. घरपट्टी संबंधानेंही लोकांची ओरड मोठी आहे. गाडीपट्टी व जनावरपट्टी हे दोन्ही कर वसूल करण्याला जितका खर्च लागतो, त्या मानानें कराचें उत्पन्न मोठेंसें नाहीं शिवाय या कराची आकारणी चुकविण्याच्या पळवाटा लोकांस पुष्कळशा माहित आहेत. मुनसिपालिटीचे हात सर्व बाजूंनीं तंग केले आहेत. तिच्या उत्पन्नाच्या बाबी काढून घेण्यांत आल्या आहेत. आणि खर्चाचीं तोंडें मात्र अधीक उघडलीं आहेत. मुनसिपालिटीला अशा प्रकारें पैशाची मोठी अडचण आहे. जरूरीच्या गोष्टी करण्या इतकेंही द्रव्यबळ तिच्या पाशीं नाहीं. नवीन कर कोणते बसवावे अशा विषयीं विचार चालू आहेत. नवीन कर बसविण्या संबंधानें सरकारी सूचना गेल्या हिंवाळ्यांत करण्यांत आली होती. अलिशान रेसिडेंट कर्नल बार साहेब आकोल्यास आले होते तेव्हां त्यांनीं नवीन कर बसविण्या विषयीं प्रत्यक्ष सूचना केली नाहीं, पण असें ध्वनित केलें होतें कीं, आकोल्याचा व्यापार वढला आहे तेव्हां त्या व्यापारावर कर बसविण्याकडे मुनसिपालिटीनें लक्ष्य पुरवावें. आमच्या मतें ही सूचना फार चांगली आहे. गेल्या पंधरा वर्षांत जो मोठा व्यापार वाढत आहे त्याची मुख्य बाब कपाशी होय कपाशीच्या व्यापारावर कर बसविल्यास पुष्कळ रक्कम उभारण्यासारखी आहे. आमच्या मतें जिनिंग मध्यें वठलेल्या कापसाच्या बोजावर व प्रेसांतून दाबून निघालेल्या गठाणीवर माफक कर बसवावा. कर वसूल करण्याला मोठीशी अडचण पडणार नाहीं. त्या शिवाय जुना टाऊन फंड पुन्हा सुरू करण्यांत यावा. टाऊन फंडांतून सरकारी नोकर चुकतात तेव्हां त्यांच्यावर कर बसविण्यासाठीं घरपट्टीही कायम ठेवावी. ज्यानें टाऊन फंड दिला असेल त्याला घरपट्टी द्यावी लागणार नाहीं असा ठराव केला ह्मणजे सरकारी चाकरही मुनसिपलकरास टाळूं शकणार नाहींत. आमची अशीही सूचना आहे कीं, सरकारानें ज्या उत्पन्नाच्या बाबी काढून घेतल्या आहेत व नवीन जे खर्चाचे बोजे बसविले आहेत त्या संबंधानें सरकारास एक विनंतीपत्र पुन्हां लिहून पाठवावें आणि सरकार जर लोकांच्या मागणी विषयीं बहिरेपणा पतकरील तर मुनसिपालिटीचा कारभार सरकारच्या स्वाधीन करावा व सभासदांनीं राजिनामे दाखल करावेत. ज्यांच्या शब्दाला योग्यसा मान मिळत नाहीं त्यांनीं मुनिसिपालिटींतल्या खुर्च्या अडवून लोकप्रतिनिधींच्या कारभाराला कलंक लागूं देऊं नये.

## सर्कस

हल्लीं आकोल्यास वडगांवकर कंपनीचें सर्कस आहे. या कंपनीचे मुख्य प्रोफेसर रा. रा. यशवंतराव मोरे हे आहेत. अहमदनगर जिल्ह्यांतील संगमनेर तालुक्यांत वडगांव ह्मणून एक श्रीमान गांव आहे तेथील हे सुखवस्त गृहस्थ आहेत. प्रस्तुतच्या सर्कसची उभारणी गेल्या आठ दहा वर्षांतली आहे. या सर्कशीचे खेळ पुष्कळ झाले आणि त्यांतील जनावरांचे व माणसाचे जो जो खेळ पाहून येई तो तो या वडगांववाल्या प्रोफेसराचें अभिनंदन करीत असे. ही सर्कस मोठी चांगली आहे आणि बाह्यांगांत कांहीं सुधारणा व भपका केला तर ही सर्कस मोठमोठ्या युरोपियन सर्कशीला मागें सारील असा आमचा अंदाज आहे. या सर्कशींत तीन चार वाघ, एक हत्ती, बारा चौदा घोडे, कुत्रे, अस्वल, माकडें, वानर इत्यादि जनावरें फार उत्कृष्ठ खेळ करितात. तसेंच माणसांच्या कसरतीचे खेळही विशेष प्रेक्षणीय होतात. वाघा मध्यें एक पट्टाईत वाघ आहे. हा मोठा देखणा व तेजस्वी आहे. त्याच्या गळ्याला दोर बांधून उघड्या मैदानांत काढतात तेव्हां विलक्षण आश्चर्य वाटतें कीं, मनुष्य जी जी गोष्ट करील ती थोडीच आहे. वाघ एका पैलवानाशीं कुस्ती करितो, तो कुस्ती करणारा वाघाला जमिनीवर पाडतो, त्याच्या पाठीवर स्वार होतो, त्याच्या जाभाड्यांत सुद्धांच हात घालतो इत्यादि नाना प्रकार करितो. इतरांचा जो वाघ तो सर्कसवाल्याला लाडक्या धिप्पाड खेळकर कुत्र्याप्रमाणें आहे. वाघाला अगदीं माणसाळून टाकला आहे. वाघ एवढा मोठा प्राणी खरा पण तो हत्ती इतका बुद्धिमान मात्र नाहीं. वाघाला नाना खेळ शिकावितां येतील किंवा नाहीं हें सर्कसवालेहि बरोबर सांगू शकत नाहींत. या सर्कसमधील हत्ती फार आज्ञाधारक आहे. तो आपल्या महाताच्या मर्जी प्रमाणें वागतो. एक पायाची लंगडी घालतो, दोन पायांची लंगडी घालतो, फरफरत चालतो, गणपती प्रमाणें एका वाटोळ्या ठोकळ्यावर बसतो, आपल्या अंगाखालीं निजलेल्या मुलावर किंवा घोड्यावर भार पडूं न देतां भुईसरपट बसतो व असेच नाना खेळ करितो. हत्ती हें जनावर फार बुद्धिमान् आहे. त्याचें शरीर अवजड खरें पण तें त्याला अगदीं हलकें आहे. हत्ती अगदीं जवळ येईपर्यंत त्याचें पाऊलच वाजत नाहीं, तो उंच टेकाडावर उत्कृष्ठपणें चढतो, लढाईत मोठमोठ्या मार्‍याच्या तोफखान्याकडे हत्तीचा उपयोग चांगला होतो. हत्तीचें श्रवणेंद्रिय फार तीक्ष्ण असतें. या सरकस मधील हत्तीचा खेळ पाहिला ह्मणजे पक्की खात्री वाटते कीं, हत्तीच्या अंगीं माणसा प्रमाणें करामत आहे आणि त्याच्या बुद्धीचा अंकुर माणसाच्या बुद्धी प्रमाणें योग्य संस्कारानीं वाढण्या सारखा आहे. हत्ती आपल्या अन्नदात्यावर फार प्रेम करितो, व त्याचा बंदा गुलाम होतो. हा मोठा विश्वासूक आहे. त्याचे सद्गुण जवळ जवळ कुत्र्याच्या गुणा प्रमाणेंच आहेत. कोणतीही गोष्ट हत्ती अगदीं लवकर शिकतो. हत्तीच्या खालोखाल घोड्याचे खेळ होतात. घोड्याचे खेळ प्रत्येक सर्कस मध्यें असतात आणि तसेच वडगांवकरांच्या सर्कसींत आहेत. अस्वल ब्यांडच्या सुरावर दोन पाया वर उभें राहून नाचतें तेव्हां मोठी मौज वाटते. वानर, माकड, कोल्हा इत्यादिकांचे खेळ फारसे होत नाहींत.

जनावरास शिकविण्याची विद्या मोठी कठीण आहे. त्यांचे बोल समजावे लागतात. जनावर आपल्या तब्येती प्रमाणेंच शिकतो. गोडीगुलाबीनें जनावर जसें आपलेंसे होतें तसें मारहाणीनें किंवा निव्वळ धाकदराऱ्यानें तें माणसाच्या कहेंत येत नाहीं असें प्रोफेसर यशवंतराव मोरे सांगतात. चवदाव्या रत्नाचा उपयोग फारसा करावा लागत नाहीं. गोडी गुलाबीच्या पेटीं सर्व कार्य चांगलें तडीस

जातें. गोडीगुलाबीच्या सौम्यपणाला मर्यादा घालण्यासाठींच ताय तो चवदाव्या रत्नाचा उपयोग करावा लागतो. जनावर वश करण्यासाठीं त्याला त्याची आवडती वस्तु दाखवावी लागते. आवडीचा पदार्थ खाण्याला मिळाला ह्मणजे वाघ, हत्ती, घोडा कुत्रा इत्यादि जनावर माणसाच्या आधीन होतें. खाण्याच्या लालचीनें जनावर माणसाची आज्ञा पाळूं लागतें, इष्ट पदार्थ मिळाला कीं तें आपली संतुष्टता दर्शवितें आणि लोभालोभानें जनावर आपल्या दावेशाचा गुलाम बनतें. वाघाला मांस, हत्तीला गूळ, घोड्याला हरभरा, कुत्र्याला मांस अशा प्रकारें नाना पदार्थ निरनिराळ्या जनावरास आवडतात. ही आवड प्रथम संभाळली पाहिजे. जनावर आपल्या अन्नदात्या बरोबर फार कृतज्ञतेनें वागतें. कृतज्ञतेचा सद्गुण जनावरामध्यें मोठा आहे. हा गुण मनुष्यामध्यें फार कमी प्रमाणानें आढळतो. जनावराला शिकविण्याचे जे नियम आहेत तेच अगदीं तंतोतंत मनुष्यालाही लागूं पडतात. सर्वांत मुख्य नियम गोडीगुलाबीचा आहे हा धडा या सर्कसाच्या खेळापासून शिकण्या सारखा आहे; आणि हाच मनुष्याला सर्वत्र विजयी करील. प्रपंचाचें खरें सुख गोडीगुलाबींतच आहे.

## स्वामी विवेकानंद

श्रीमत् स्वामी विवेकानंद हे कलकत्त्यास गेल्या ४ तारखेस समाधिस्त झाले हें कळविण्यास मोठें दुःख वाटतें. कलकत्त्यास यांचा स्वतंत्र मठ आहे आणि श्रीमत् परमहंस रामकृष्ण स्वामी यांचे हे पट्टशिष्य होत. यांची मूळ प्रसिद्धि अमेरिकेंत झाली. यांनीं तेथें जाऊन हिंदु धर्मातील ब्रह्मविद्या तेथील लोकांस सांगितली तेव्हां हिंदुधर्माची महती त्या लोकांत फार झाली. आणि पुष्कळ अमेरिकन लोक स्वामी विवेकानंद यांचे शिष्य बनले. यांच्या वयास, पुरी चाळीस वर्षेंहि झालीं नाहींत तोंच असा उत्कृष्ठ तत्वज्ञानी मृत्युंगत झाला ही एक मोठीच हानी होय. हे आपल्या वयाच्या १८ व्या वर्षींच बी. ए. ची परीक्षा पास झाले होते. यांची विशाल बुद्धिमत्ता व अलौकिक वक्तृत्व हीं पाहूनच कांहीं श्रीमान् गृहस्थानीं १८९३ सालच्या चिकागोच्या धर्मपरिषदेला त्यांस मुद्दाम पाठविले होते. तेथें यांच्या तत्वविचारांचा विजय झाला. सर्वत्र लोकांस आमच्या हिंदुधर्मातील अद्वैतवाद फार आवडला आणि पुष्कळ जण हिंदु धर्माचे अनुयायी होऊं लागले. हिंदु धर्माची संग्राहकता या प्रमाणें प्रसृत झाली आणि श्री स्वामी विवेकानंद यांच्या हातून धर्मोन्नति होईल इतकेंच नाहीं तर हिंदु धर्म सर्वत्र प्रसृत होईल असेंहि वाटूं लागलें होतें. मिशनरी लोकांचा जसा ख्रिस्ती धर्माबद्दल उद्योग असतो तसा आमच्या लोकांचा व्यवसाय नाहीं. येशू ख्रिस्ताला भजा पैगंबराला भजा वा रामाला भजा आह्मांस सर्व लोक धर्मदृष्टीनें सारखेच आहेत. सर्व धर्म कल्पना एका ईश्वराला ओळखण्या संबंधानें आहेत. तेव्हां कोणीहि दुसऱ्याच्या धर्म कल्पनेचा उपहास करूं नये असें स्वामी विवेकानंद यांचें मत होतें. स्वामी विवेकानंदासारखे साधु पुरुष आह्मांस अवश्य पाहिजेन आहेत. व आह्मांवर जी एक विलक्षण ग्लानी आली आहे ती दूर करण्याला अशा थोर पुरुषांचाच उपदेश मोठा सहाय्यभूत होतो. चांगले धर्मोपदेशक क्वचित् मिळत असतात आणि स्वामी विवेकानंद हे ब्रह्मचारी आमरण राहिले आणि तशा कडक व्रतानें यांनीं हिंदु धर्माची उत्कृष्ठ सेवा केली हा यांचा आमच्या देशावर मोठा उपकार होय. यांच्या सारखे पुरुष लोक कल्याणार्थ पुनर्जन्म घेतात अशी संतपरंपरा आहे. तेव्हा त्यानीं हिंदु धर्माच्या सोज्वळ तत्वांची केलेली पुष्पमाला लोक नेहमीं आनंदानें घेतीलच पण, स्वामी विवेकानंद हेहि लोकानुग्रहासाठीं पुन्हां अवतरतील अशी आह्मास ईश्वरी योजना दिसते.

# The Berar Samachar

MONDAY JULY

14 1902

We are beginning to lose faith in the usefulness of the Government commissions that are appointed from time to time. Lord Curzon seems to be a great advocate of these commissions. It is usual with him to appoint a body of persons to make a full report on that branch of administration into which he means to introduce new reforms. His prominent idea is to improve the university education on such parallel lines as are laid down by the English Universities. A university education commission was appointed to make a full investigation into the progress that the higher education has made in Indian universities. The report of the commission has not yet seen the light of the day; but we have greater reasons to presume that the whole document will remain a secret. Under these circumstances it would be pre-mature to discuss about the probable re-commendations which the government is inclined to adopt after mature consideration. We learn, however, with regret that the recommendations of the commission are hostile to the spread of the higher education. The interests of the higher education seem to be at stake. Some of the proposals are said to contain revolutionary measures.

The different effects of these measures will be to confine the higher education to the richer classes of the Indian society. Education is already very costly and is not within the reach of ... asses. They will be ... cluded from the bene... ...er education and it will be a ... is-advantage to the country when men of genius will no longer be an ornament to their *alma-mater* but will gradually dwindle into insignificance. The forces which the spread of the western education has brought into existence are however too strong for such an arbitrary restraint. They will break through these artificial barriers and will be a serious cause for apprehension. The Government of India seem to view with distrust the result of the western education. The educated people are not credited with the noblest and purest intention. Their loyalty is minimised in a strange manner. They do not find a fitting reward for the higher aspirations which the English education has raised in their minds. They fail to realize the high hopes they have been taught to entertain about their future callings in life. Disappointment of a bitter sort breeds discontent with the present government. Herein the Government feel a suspicious ground. They are afraid that the spirit of discontent will sow the seed of revolutionary ideas amongst the masses. The Government introduce no measures to remove the grievances of the educated people but they create new barriers for their admissions to the higher posts in the public service. They are precluded from holding a high post in the army as well as the navy. Government do not use correctives for the spread of the present discontent. They do not allow further privileges to the people in the administration of the country. They do not fulfil their high mission of educating the people in the higher branches of technical education. They want to shut the people in a dark room wherein the light of higher education will not find its way. If the Education Commission recommend such revolutionary measures as will debar the poorer classes from the domains of the education, we feel constrained to see that there will be great necessity to raise the people's voice against these impolitic recommendations. Let us hope that the rule of distrust will not begin with the distcontent which the Government view as the direct consequence of the present spread of the higher education. The *Imperialism* of the day seems to run very much in favour of establishing the rule of distrust. We shall do our best to subvert such a hostile policy of the Government. All our work begins and ends with prayers to the Government. Let us hope they will reach the hearts of our righteous English people.

In this connection, the editor of the Bengalee has made some strong and cogent observations. We wish to reproduce them for the information of our readers.—

"The Policy of distrust which Government has thought fit to hug to itself and which is every minute widening the gulf between the rulers and the ruled is to our mind the greatest stumbling—block in the way of progress. It is this policy which is engendering a counter—feeling of distrust for Government in the hearts of the people. Lord Curzon asked his audience at the last Convocation of the University to construe the acts of Government charitably. This charity cannot come into existence if Government is so distrustful of the people. Everything which it has done of late has unmistakeably shown this distrust. In fact, this distrust has come to be the main principle on which the policy of Government towards the people seems to be now based. In the presence of such clear signs of distrust as the Arms Act and other legislation of the same kind, it is useless for Government to ask us to look upon its acts with charity and to construe them liberally. This Universities Commission, therefore, is looked upon by the people at large with grave suspicion. People think that in view of the complications which the spread of education might eventually lead to, Government is determined to circumscribe the limits of education to an extent which will reduce it to nothing. They know that in our Indian Universities there is very considerable room for improvement, but the great majority of the people are, rightly or wrongly, under the impression that the Universities Commission was appointed more for the purpose of devising means to enable the Government to have complete control over the Universities, so that when they are reduced to mere departments under the Government, the latter might proceed more suuccessfully to circumscribe the spread of high education and thus escape from those complications which English Education and the spread of English influences have created."

## वऱ्हाड

हवा मान— पाऊस बराच झाला आहे. एकंदरीनें आज पर्यंत पांच इंचा जवळ जवळ पाऊस झाला. ऊन कडक तापतें, ढग वारंवार जमतात व उकाड्यानें तगमग फार होते. यावरून भावी पर्जन्यकाल जोराचा होईल असा तर्क आहे. सध्यां पेरणीचे कामा इतका पाऊस झालेला आहे. रोगराई विशेष कांहीं नाहीं बाजारभव पूर्वीं प्रमाणें आहे.

रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे तहाशिलदार मोर्शी हे मोर्शीस जाण्यासाठीं काल रोजीं रवाना झाले.

मे. आर. डी. हेअर ज्युडिशियल कमिशनर साहेब यांची स्वारी हैदराबादेकडील कोर्टाची वार्षिक तपासणी करण्या निमित्त तिकडे गेली आहे.

इलिचपूरच्या तहशिलदारीवर मि. अमीमुद्दीन हे परत आल्यामुळें, इलिचपूराहून रा० रा० पांडुरंग सखाराम अग्निहोत्री यांची बदली त्यांच्या पूर्वीच्या ह्मणजे डेपुटी कमिशनर उमरावती यांच्या क्लार्क ऑफ कोर्टीवर करण्यात आली त्यामुळें रा० रा० बाळाजी रामचंद्र देशपांडे हे आकोल्यास स्वालकोजच्या क्लार्क ऑफ कोर्टीच्या जागीं परत येतील. आणि रा० रा० पुरुषोत्तम व्यंकटेश देशमुख यांस औरंगाबादेला पुनः आपल्या शिरस्तेदारीवर जावें लागणार आहे.

### नोटीस

बेशमी इंद्राबाई जवजे मुरलीधर जाहागीरदार मौजे आडगाव जाहागीर यांस.

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तारीख २१ मे सन १९०२ रोजीं तुह्मी व नऱ्हाबाई असें सर्वांच मतानीं दरसालचे वहीवाटी प्रमाणें जाहागिरीचे पैशाबद्दल हिशोब देऊन नऱ्हाबाई हिनें आपली रकम घेऊन पावती लिहून दिली आहे त्या प्रमाणें तुह्मांस तुमचे शतसाऱ्याची आवक्याची रकम वजा जाता बाकीचा पैसा घेऊन पावती लिहून द्यावी असें विषयीं ह्मटलें असतां तुह्मी पैशाबद्दल पावती लिहून आपले मनुष्याबरोबर पाठविली. परंतु त्यानीं आह्मांस न देतां पुन्हा आपले कडेस परत आणिली. पुढें पावती आणून पैसा नेला नाहीं. कारितां कळविण्यांत येते कीं नोटीस पावताच पावती देऊन पैसा न्यावा नाहीं तर कोर्टाचे खर्चाबद्दल जबाबदार नाहीं रकम अनामत सावकाराचे येथें ठेविली जाईल. कळावें. तारीख ११ माहे जुलै सन १९०२ इ०

सही

गदाधर श्रीधर जाहागिरदार

अडगांव दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार

## फार गोड

आमचे रा० ब० महाजनी यांचें परवां पुण्यास उत्कृष्ठ व्याख्यान झालें त्या वेळीं त्या सभेचे अध्यक्ष ना० गोखले हे होते. व त्यांना अध्यक्ष नेमण्याबद्दल ना० टिळकांनीं अगत्याची संमत्ती दिली. अर्थात या सभेला ही विद्वान् दुक्कड तेथें विराजमान होती. हा केवळ कपिलाषष्टीचा योग घडला. ना० गोखले हे आगरकराचे शिष्य आहेत. व आगरकर हे महाजनीचे शिष्य होते. अशी शिष्यपरंपरा आहे. असें असतां आजे-गुरूच्या व्याख्यानाला नातु-शिष्यानें अध्यक्ष व्हावें, व वागणं सोडणाऱ्या विरुद्ध पक्षाच्या नायकानें त्यांस संमत्ति द्यावी व त्यांचा गौरव करावा ही स्मरणांत ठेवण्या सारखी नोंद आहे.

## हें कसें काय झालें ?

औरंगाबाद येथील रा. वामन पांडुरंग वेळकर, गिरणींतील एक मोठ्या प्रतीचे कामदार, हे आज सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी प्रार्थना समाजांत गेले होते. त्यांनीं जानवें काढून टाकिलें व आपल्या मुलांच्या मुंजीही केल्या नाहींत. त्यांना चार मुलगे असून यांचीं वयें अनुक्रमें २१।१९।१७।११ अशीं आहेत. गेल्या दोन वर्षांत वामनरावजीस कृतकर्माचा अत्यंत पश्चात्ताप झाला व त्यांनीं आपणास परिवारासह प्रायश्चित देऊन पवित्र करावें ह्मणून श्रीजगद्गुरु मठ संकेश्वर यांजकडे अर्ज केला. श्रींनीही रा० वामनराव यांस समक्ष बोलावून त्यांजकडून अर्ज खरा करून घेतला. व त्यांनीं आपल्या विशुद्ध आचरणाविषयीं विद्वान् शास्त्री, धर्माधिकारी, अम्मलदार वगैरेंचीं जीं प्रशंसापत्रें दिलीं तीही पुराव्यांत दाखल केलीं. आणि अखेरीस रा. रा. वामनरावजी यांस, त्यांच्या पत्नीस व मुलांस शास्त्रोक्त योग्य प्रायश्चित्तें सांगून शुद्ध करण्याचा ठराव झाला. आज २१ वर्षें प्रार्थना समाजिष्ट असूनहि असा एकाएकी बुद्धींत पालट पडून पश्चात्ताप होण्याचें काय गूढ कारण असेल बरें ! यांची माहिती सर्वांस समजणें अत्यंत जरूरीचें आहे.

बीज उत्पन्न करण्याची युक्ति—कांहीं एक रसायन न घेतां हवेतील बीज करून ती कामास लावण्याची एका सिनारनें युक्ति काढली आहे. व तो लौकरच पेटेंट घेणार आहे.

खरे मारवाडी भाई-कलकत्यास तिवामारवाड्यांनीं एका मेलेल्या मनुष्याचें प्रेत त्यानें देणें असलेले आपले पैसे दिले जातपर्यंत जाळण्यास हरकत केली ह्मणून त्यांना प्रत्येकीं सहा सहा महिन्यांच्या सक्त मजुरीची शिक्षा झाली. मारवाड्या इतके पैशाचे लोभिष्ट क्वचितच आढळतील !

वनस्पतीच्या रसापासून धातू—पूर्वीची किमिया खोटी नसून, पालमकोटा येथील अबदुल रहिमान नांवाचा एक हेड कान्स्टेबल रानांतील वनस्पतींच्या रसानें लोखंडाचें तांबें अथवा शिसें शास्त्रज्ञ लोकांसमोर करून दाखविण्यास तयार आहे, असें 'मद्रास स्टँडर्ड' पत्रांत एक गृहस्थ लिहितो. याची प्रचीति अवश्य घेतली पाहिजे.

नीच कर्माची चीड- बोअर लोकांस फार आहे व ती तशी सर्वांच्या ठायीं असणें जरूर आहे. तह होण्याचे पूर्वीच इंग्रजांस शरण जाऊन आपल्या देशबंधूशीं लढणारे व इंग्रजांच्या हेराचें काम करणारे जे बोअर लोक आहेत त्यांना इतर बोअर लोकांनीं व्यवहार बहिष्कृत केलें आहे. या मुळें शरण आलेल्या बोअर लोकांची संख्या व उत्सुकता पाहून इंग्रजांनीं फारसें हुरळून जाऊं नये.

भयंकर उष्णता— वडवान येथें गेल्याचे मागील रविवारी परमावधीची उष्णता होऊन पारा १४४ अंशांवर गेला व त्यामुळें पारवे, चिमण्या वगैरे पक्षी होरपळून पटापट जमीनीवर मरून पडले. ईश्वरी करणी !

निद्रारोग—पूर्व आफ्रिकेंत युगांडा प्रांतांत निद्रारोग भयंकर वाढत आहे. या रोगानें मनुष्यास झोंप लागते, तींतून तो जागा होतच नाहीं, ज्याला ही काळ झोंप लागली तो पुनः जागा झाला असें अद्यापि एकही उदाहरण डाक्टरांच्या आढळण्यांत आलें नाहीं.

अनिष्ट चिन्ह— बांबूंच्या बेटांस फुलें व बी येणें हें दुष्काळाचें चिन्ह समजतात. हल्लीं बंगाल्यांतील मिदनापूर प्रांतांत बांबूस फुलें धरलीं आहेत.

अपूर्वभक्ति— स्वामी अभयानंदा नांवाची एक अमेरिकन स्त्री कांहीं दिवसांपूर्वी बंगाल्यांतील वैष्णवपंथांत सामील झाली आहे. श्रीकृष्णाविषयींच्या भक्तीनें तिचें अंतःकरण इतकें भरून गेलें आहे कीं, हरिनामाचा सभेंत गजर करतां करतां ब्रह्मानंदानें ती नाचावयास लागते! ही सध्यां बंगाल्यांत व्याख्यानें देत असते; व तिचीं भक्तिरसपूर्ण भाषणें ऐकून आनंदातिशयानें कांहीं लोकांस मूर्च्छाही येते, असें अ. ब. पत्रिकाकार ह्मणतात.

---

### नोटीस

नोटीस बेसमी दिनानाथ वल्लद रामनाथ राहणार पिंपळगांव राजा तालुके मलकापूर जि० बुलढाणे यांस.

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं शेत सर्वे नं १६ यांतील चवथा हिस्सा अलग वाटलेला मिमनाथ दयालनाथ याच्या पूर्ण मालकीचा आहे. यांवर माझा कोणतेच प्रकारचा हक्क संबंध नाहीं. असे असून तुह्मी मजला फंद देऊन तारीख १ जुलई सन १९०२ इ० रोजीं दगेबाजीनें आपमतलबा करितां शंभर रुपयांस जजर गाहाण अर्जवट करून घेऊन मजला एक पैसाही दिला नाहीं. आतां मजला तुमचे कपट व असा फितुर देण्याचें कारण कळून आल्यावरून तुह्मांस कळविण्यांत येते कीं, ही नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत वरील दस्तैवज मजजवळ आणून द्यावा. तो निवळ पोकळ आहे. कारण तुह्मीच कपटानें तो लिहून घेतला आहे. कळावे तारीख ८ जुलई सन १९०२ इसवी.

दस्तूर— मु० महमद अताउल्लाखा.

सही

रावो वल्लद निमनाथ राहणार कसबे पिंपळगांवराजा द. खु.

### नोटीस

रा० रा० अण्णाजी दाजी जोशी राहणार अडगांव तालुके अकोट जिल्हा अकोला यांस:—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मौजे मालपुरे व मौजे कळंमखेड परगणे अडगांव वगैरे ठिकाणची गुलाबखां वल्लद महेबूबखा मुसलमान यांची शेतें अकोले कोर्टा मार्फत तुमचे ताब्यांत आलीं आहेत. त्या शेतापैकीं मौजे कळंमखेड परगणे अडगांव तालुके अकोट येथील शेत सर्वे नंबर २ एकर गुंठे ३२ ४१९ आकार रुपये ६९ यांतील निमे हिस्सा. व मौजे मानपुरा परगणे अडगांव तालुके अकोट येथील शेत सर्वे नंबर २ पैकीं एकर गुंठे ७४८ आकार रुपये १३ ह्यांतील ½ हिस्सा अशीं दोन शेतें तुह्मी व प्रतिवादी गुलाबखां वल्लद महेबूबखा व त्याचा भाऊ इस्मायलखा मुसलमान व ह्या शेताचे पूर्वीचे ह्मणजे तुमचे ताब्यांत यण्याच्या आधीचे बटाईदार महमद रोषन वगैरे ह्याचे संमतीनें सदरहू दोनही शेतांचा निमे हिस्सा सन १३१२ फसली सालचे पिका करितां आह्मांस बटाईनें वहितीस दिला. व तुह्मी आणि गुलाबखां व इस्मायल यांनीं सांगितलें कीं, शेताचा हिस्सा समाईक व्हावा, पूर्वीच बटाईदार ह्यांचा लागवड द्यावा, व शेते वाटून घेतल्यास सरसनीरस सारखी घ्यावी. ह्या प्रमाणें तुह्मी त्रिवर्गांनीं समक्ष सांगितल्यावरून वरील दोन्ही शेतें आह्मी त्रिवर्गांनीं सालीम शेतसारा व निमे माल देण्याच्या करारानें केली. आणि बटाई चिठ्ठी स्टांपावर लिहून देऊन पूर्वीचा बटाईदार महमद रोषन ह्याचे लागवडाचे रुपये चोवीस सर्वां समक्ष ठरले ते आह्मी लागलेच तुमचेपासून घेऊन त्यांस देऊन पावतीही घेतली. पुढें शेत वाटून न देतां समाईक वाहण्याची. आणखी वाहीं करणें करितां गुलाबखां व इस्मायलखां ह्यांनीं आमच्या जोड्या बोलाविल्यावरून आह्मी आणखी जोड्या समाईक हिशात वाहिल्या. नंतर पेरण्याचे दिवशीं इस्मायलखां व गुलाबखां ह्यांनीं कळंमखेड येथील शेत पश्चिमेकडून सुमारे चार ४ टिकणीचे तयार असलेले काळे जमिनीचे तारीख ३।४।७ जुलई सन १९०२ रोजीं पेरून पूर्वेकडील जो निवळ प[illegible] सुमारे ४ टिक[illegible] यांनीं आह्मांस वहि[illegible] णची कंटेबन झालेली २६।६।१९०२ चायल त[illegible] तुह्मी पेरावी असें सांगितल्यावरून सध्यां निरुपायास्तव आह्मी त्यांत कपाशी पेरली आहे.

तसेंच माळपुरा येथील शेताचा एकतृतियांश ⅓ हिस्सा गुलाबखां व इस्माईल हें आह्मांस मुळींच वाहूं देत नाहींत करितां त्याबद्दल जबाबदार आह्मी नाहीं.

तुह्मी, गुलाबखां व इस्माईलखां ह्यांनीं सांगितलें प्रमाणें शेत समाईक वाहण्याचे व सरसनीरस वाटण्याचे गुलाबखां व इस्माईलखां ह्यांनीं नाकारिलें. व आह्मांस निवळ बंजर दिलें. ह्यावरून तुह्मांस कळवीत आहे कीं आह्मी बटाई चिठ्ठींत लिहून दिल्या प्रमाणें सालीम शेतसारा देण्यास कबूल नाहीं. सारा मुळींच न देतां निमे बटाईचा माल देऊं. आणि तशी तुमची खुषी नसेल तर आह्मी पूर्वी महमद रोषन ह्यांस लागवड्याचे रुपये २४ दिले आहेत ते व वाहीच्या जोड्या रुपये अडीचच्या लाविल्या त्या आणि टिकणचे भाडे १२ बारा रुपये व बीज सरकीचे पेरिले त्याचे किमती बद्दल रुपये सात असे एकंदर साडेपंचेचाळीस रुपये आह्मी खर्च केला आहे तो आमचा देऊन आमची पावती घ्यावी व आपला शेताचा हिस्सा ताब्यांत घ्यावा. तसे तुमचे कडून आठ दिवसांचे आंत न झाल्यास शेतसाऱ्याचे रुपयाचे आह्मी जबाबदार होणार नाहीं. व आपणास वायदा यावा लागणार नाहीं असें समजून शेतें आह्मी वाहूं. जर गुलाबखां व इस्मायलखां हे पूर्वी बटाई चिठ्ठी लिहून दिली त्या वेळीं बोलल्या प्रमाणें समाईक अगर सरसनीरस जमिन आह्मांस वाहूं देतील तर मात्र आह्मी लिहून दिल्या प्रमाणें शेतसारा वगैरे देण्यास कबूल आहो. हल्लीं आह्मांस वाटून दिलेले जमिनींत कुंदेघन बंजर असल्यामुळें आमचा लागणारा लागवड मुद्दां खर्च निघणें मुष्कीलीचे आहे. सबब मुद्दाम नोटीसीनें कळविले आहे कळावे तारीख ८-७-०२ इ०

सही

भगु वा। सोनाजी माळी राहणार तळेगांव निशाणी खु.

सेख मोजू वा। सेख आरब मुसलमान निशाणी खुद.

रघु वल्लद जानजी माळी दस्तुर खुद्द.

---

### नोटीस

वेशवी रामशा वल्लद शिवला भोय गोंड राहणार मोहद प्रगणे वाई ता. केळापूर जि० वणी यास:—

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून, आज चार वर्षें झालीं, तुह्मी मला मुलाबाळा सुद्धां बापाचे घरीं टाकून दिले. व मी तुमचे घरीं नांदण्यास खुष असूनही तुह्मी मला नेलें नाहीं. माझे बापानें तुमचे घरी आणून घातल्यावरही तुह्मी मला मारहाण करून काढून दिलें. तेव्हां पासून मी आपल्या बापाचेच घरीं आहे. माझ्या बापास माझ्या व मुलाबाळाच्या निर्वाहा करितां इतक्या मुदतींत ३०० रुपये कर्ज झालें. मी असेंही ऐकितें कीं तुह्मी पाटानें दुसरी बायको केली. तरी ही नोटीस पावल्यादिवसापासून आठ दिवसाचे आंत सदरहू तीनशें रुपये माझे बापास देऊन त्याची पावती घ्यावी. व पंचा समक्ष मला चांगलें नांदविण्याचा करार करून घेऊन जावें, नाहीं तर हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन मग माझे वर तुमचा कोणताही नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. रुपये ची आदाई न केल्यास कायद्या प्रमाणें तजवीज केली जाईल. कळावे ता० ८।७।०२ इसवी.

सही

सहीची बांगडी जणकी मर्द रामशा भोय गोंड राहणार अंतरगांव प्रगणे गळेगांव इचे हातची असे दस्तूर देवीदास गणपतराव देशमुख.

---

पुरवणी पहा.

REGISTERED N. No. 4

सहामाही „ ३ „ ८

साल अखेर „ ७ „ १ ८

किरकोळ अंकास .........................४

नोटिशी बद्दल

१ ओळीचे आंत रु० १

दर ओळीस.........१ ६

दुसरे खेपेस ... ......१

monthly.........3 ................ 8 as

Single copy ................................ 4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per lin e...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOl XXXVI AKOLA MONDAY 21 JULY 1902 NO 28

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख २१ माहे जुलै सन १९०२ इ० अंक २८

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याचा बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासुन तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवाने देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातीत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

---

### खरेदी करा !


### रास्कोपचीं थेट व खरीं पटेंट वाचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चु नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, काँट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्याच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व त्या बद्दलची जोखीम सारी आमचे शिरावर आहे.

---

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस........................४०

१९ „ हंटिंग........................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०

१९ „ हंटिंग, नकशीचे ............२५०

**मेटलचें तीन वर्षं ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८

१९ „ सेकंद कांट्यासह............२०

१९ „ मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................२२

१९ „ हाफ् हंटिंगचें................२०

१९ „ हंटिंगचें ......................२०

१४ „ रिस्ट वॉच ......................२०

**इनॅमल्ड मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ओपन फेस............२०

१९ „ हंटिंग..........................२०

१४ „ रिस्टवॉच........................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०

१४ „ हंटिंग............................३५

१८ व १९ „ ओपनफेस............३०

१९ „ सेकंद कांट्यासह ............३२

१९ „ मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५

१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५

१९ „ हंटिंग ......................४९

लेडिज वॉचेस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

**सी. हीनीगर आणि कंपनी,**

ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचें सोल एजंट.

५ हार्नबी रोड, मुंबई.

---

### नोटीस

वेशमी सोनय्या गुरु हरी अय्या जंगम आकोला यांसः—

मी या लेखानें कळवितो कीं, तुह्मांस आकोला येथील जंगम मठाची व्यवस्था व देखरेख करण्यासाठीं कारभारी नेमिलें होतें. मठाची वहिवाट आह्मी सांगू त्या प्रमाणें चालवूं अशा बद्दल तारीख २७ दिसेंबर सन १८७७ रोजीं तुह्मी करारनामा लिहून दिला आहे पण मठाच्या इनाम जमिनीची तुमच्या मनास येईल तशी विल्हेवाट लावण्याची तुमची कारवाई आमच्या कानावर आली आहे. तुमचा कारभार आतां आमच्या पसंत नाहीं. आज तारखेस पासुन तुमचा कारभाराचा हक्क या लेखानें रद्द केला आहे. तर ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांच्या आंत तुह्मी आमचा मठ सोडून द्यावा. व आज पर्यंतच्या कारभाराचा सर्व हिशोब देऊन मठाचा जमीन जुमला जशाच्या तसाच आमच्या स्वाधीन करावा. यांत अंतर पडेल तर सरकार मार्फत सर्व व्यवस्था करण्यांत येईल, व सर्व खर्च तुमच्या अंगावर पडेल. कळावें तारीख १४ माहे जुलै सन १९०२ इसवी.

सही

पंचाक्षरी अय्या गुरु विरूपाक्ष अय्या जंगम मठाधिपती संस्थान पेठ बाळापूर दस्तुर खुद्द.

---

### नोटीस

मेहेरबान गुलाबखा वा॥ मैबुबखा मुसलमान व इसमाइलखा वा॥ मैबुबखा मुसलमान वस्ती कसबे अडगांव ता. आकोट जिल्हा आकोला या उभयतांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे कळंबखेड व मौजे माळपुरा व गोळी वगैरे ठिकाणची जमीन तुमच संबंधानें तारीख २६।६।१९०२ रोजीं कोर्टमार्फत आमचे ताब्यात आली आहे त्या पैकीं मौजे कळंबखेड येथील शेत सर्वे नंबर २ एकर ३२ गुंठे १२ आकार रुपये ६६ ह्यांतील ½ हिस्सा व मौजे मालपुरा येथिल शेत सर्वे नंबर २ पैकीं एकर ७ गुंठें ८ आकार रुपये १३ ह्या शेतांतील ½ हिस्सा ही दोन शेतें तुमचे संमतीनें तळेगांव येथील रघु वा॥ जानजी मड व भगु वा॥ सोनाजी मड व मौजू वा॥ महमद अरब मुसलमान ह्यास सालीम शेतसारा व निमे माल घेणें करारानें दिली. त्या वेळीं तुह्मी उभयतांनीं त्यांस समक्ष सांगितलें कीं, शेतें समाईक वाहू. वाटून दिल्यास लोक रिती प्रमाणें सरसनिरस वाटून देऊं व आमचे पूर्वीचे बटाईदार महमद रोषन ह्याचा लागलेला लागवड रुपये २४ तुह्मी द्यावा असें आंत सांगितलें वरून तळेगावकर यांनीं महमद रोषनची लागवड चोवीस रुपये तुमच समक्ष देऊन बटाई चिठ्ठीही स्टांपावर तुमचे देखत तुमचे सह्यानें ता० २९।६।१९०२ रोजीं झाली व त्याच वेळेस दुसरे वाही-करितां जोड्या बोलाविल्या त्या प्रमाणें बटाईदारही जोड्या घेऊन वाहीत आले होते. वाही झाल्यावर ता. ३।४ जुलई सन १९०२ रोजी तुह्मी मौजे कळंमखेड येथील शेतांतील सुमारें चार तिफणची तयार असलेली काळी जमीन पश्चिमेकडून पकडून बटाईदार ह्यास पूर्वेकडील बंजर कुरेचन झालेलें सुमार चार तिफणचे वाटून दिलें. तेव्हां त्यांनीं निरुपायास्तव कपाशीची पेरणी केली वगैरे मजकुराची तळगांव बटाईदार रघु, भगु व मौजू ह्यांनीं ता. ८।७।१९०२ इ० रोजीं नोटीस वर्तमान पत्राद्वारें दिली कीं, आह्मास कबूल केलें प्रमाणें शेतें समाईक वाहण्यास गुलाबखा व इस्माइलखा हे देत नाहींत व सरस निरस जमीनही देत नाहींत, बंजर कुरेचन देतात. त्यांत आमचा लागणारा लागवडही निघणें मुष्कीलचे आहे; सबब आह्मी सालीम शेतसारा न देतां निवळ निमे माल देऊं तसें कबूल नसल्यास आठ दिवसाचे आंत आमचाही दिलेला लागवड रुपये २४ चोवीस व आह्मी त्या नंतर लाविलेला लागवड जोड्या रुपये २॥, तिफण रुपये १२ व सरकीचें बी रुपये ७ सात असे ४५॥ रुपये लागवड देऊन शेतें संभाळावीं. मुदतींत तुमचे कडून तसें न झाल्यास शेत सान्याचे आह्मी जबाबदार नसून निवळ निमे माळाचे बटाईदार समजून शेतें वाहूं. शिवाय माळपुरा येथील शेत तुह्मी त्यांस वाहूं देत नाहीं असेंही त्यांनीं नोटिशींत कळविलें आहे. त्या वरून तुह्मास कळविण्यांत येतें कीं, ही नोटीस पावल्या पासून २।४ दिवसाचे आंत तुह्मी वाटेल तो बटाईदार दाटेल त्या शर्तीनें आणण्यास आह्मी सर्व शेतांचे ½ हिस्से त्यास वहिवाटीस देऊं. मात्र तळेगांकर बटाईदार ह्याचा व आह्मी दुसरे लोकास दुसरे शेताचा दिलेला व लागलेला लागवड तुह्मी जो बटाईदार आणाल त्यांनीं दिला पाहिजे व त्या बटाईदारास तुह्मी जामीन राहिलें पाहिजे.

मालपुरे येथील शेताचा ½ हिस्सा त्यांस तुह्मी वाहू देत नाहीं तो वाहू द्यावा तसेंच मौजे गोळी येथील शेतांत ही निमे हिस्सा पडीत आहे त्याचाही कोणी वायदा देऊं शकत नाहीं व पडीत असल्यामुळें कोणी बटाईनेंही करीत नाहीं. सबब तुह्मांस पाहिजे तो बटाईदार वरील शर्ती प्रमाणें आणावा ह्मणजे त्याज पासून बटाई चिठ्ठी करून घेऊं व शेत वाहण्यास देऊं. कळावें. तारीख १८।७।१९०२ इ०

सही

आणाजी दाजी जोशी. राहणार अडगांव ता. आकोट.

**टीप**—तुह्मी तळेगांवकर बटाईदार ह्यास कबूल केले प्रमाणें न चालल्यामुळें या बटाईदारानीं आह्मास नोटीस दिली तिचे खर्चाचें मागणें केलें आहे तो खर्च व ह्या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें. ता. १८।७।१९०२ इ.

(सही) अण्णाजी दाजी जोशी.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती आषाढ वद्य १ शके १८२४

---

## दिवाणी न्याय

दिवाणी न्याय कोर्टाच्या कमागिरीचा १९०१ सालचा वार्षिक रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. जुडिशिअल कमिशनर या नात्यानें मे. हेअर साहेब यांनीं हा पहिलाच रिपोर्ट लिहिलेला आहे. रिपोर्ट फार संक्षिप्त असावा अशा विषयीं हुकूम असल्या कारणानें मे. हेअर साहेबांच्या लेखणीची स्वैर गती बंद झाली तथापि त्यांचा हा रिपोर्ट पाहून अलिशान रेसिडेंट सरकार साहेब ह्मणतात कीं हा रिपोर्ट अगदीं नमुन्या दाखल आहे.

वऱ्हाडांत मूळचीं ४० दिवाणी कोडतें होतीं; परंतु रिपोर्टाच्या वर्षांत नायब तहशिलदारां कडील दिवाणी काम काढून घेतल्यामुळें ५ कोर्टें बंद झालीं, आणि राजा इंद्रकरण, आनररी अव्वाची हे हैदराबादेस परत गेल्यामुळें ६ वें कोर्ट बंद झालें. सध्यां ३४ दिवाणी कोर्टें या प्रांतांत आहेत. गेल्या वर्षीं एकंदर २७६०६ दावे दाखल झाले. ही संख्या गेल्या तीन वर्षा पेक्षां मोठी असून पुष्कळशी वाढलेली आहे. १८९८त दाव्यांची संख्या २८४४१ होती आणि या संख्ये जवळ जवळच गुदस्तांच्या दाव्यांची संख्या आहे. या संबंधानें मे. हेअर साहेब असें अनुमान बांधतात कीं, गेल्या दुष्काळांत लोकांची जी दाणादाण झाली होती व लोकांवर जो दारुण प्रसंग गुदरला होता त्यामुळें दिवाणी कडील काम फार कमी झालें होतें; परंतु जसजशी पीकपाण्यानें अबादानी झाली व लोक पूर्ववत् सुखी झाले तसतसें दिवाणी काम आपल्या पूर्वीच्या स्थितीला येत चाललें आहे.

अलिकडे दिवाणी कोर्टाच्या कामाचें मापन फार बारकाईनें होत असतें. दरमहाच्या दरमहा निकालांत लागलेल्या दाव्यांची संख्या कोर्टवारीनें तपासून पाहण्यांत येते आणि वरिष्ठ कोर्टाचे शेरेदोरे वेळोवेळ कळविण्यांत येतात. न्यायाचें पुष्कळसें काम करावें अशा विषयीं सक्त देखरेख ठेवण्यांत येत आहे. कामाचा बरेवाईटपणा अपील कोर्टाच्या कामा वरून ताडण्यांत येतच असतो. चांगल्या पुष्कळशा कामगिरी बद्दल खालील न्यायमूर्तींचीं नांवें रिपोर्टांत प्रसिद्ध केलीं आहेत:- रा० रा० जठार, मोइनुद्दीन, क्राफर्ड, दांडेकर, कींग, म्याक्स, शेंबेकर, पतकी, व रायसाहेब नारायणसिंग. त्या या जिल्ह्याच्या डिपुटी कमिशनरांकडून या गृहस्थांची शिफारस करण्यांत आली आहे. त्या शिवाय मे. हेअर साहेब यास रा. रा. मुळे व मि. दस्तूर यांचें काम विशेष पसंत पडलें आहे.

१९०१ सालीं एकंदर २९१८९ दावे निकालास लागले. जुनी शिल्लक मिळून ३९१०९ दावे कोर्टाच्या रजिस्टरावर होते; त्या पैकीं निकालास लागलेले दावे वजा करितां चालू सालाकरिता बाकी शिल्लक ९९२४ राहिले. हें काम एकंदरीनें पुष्कळ झालें ह्मणून जुडिशिअल कमिशनर साहेबांनीं संतोष प्रदर्शित केला आहे. गेल्या सालीं छोट्या छोट्या रकमांच्या फिर्यादी पुष्कळ झाल्या आणि तशांत गहाणांच्या फिर्यादीला मोठा ऊत आला होता. दुष्काळांत गहाणा शिवाय कोणी कर्ज देत नव्हतें आणि गहाण मालांच्या किंमती कर्जाच्या रकमेनें होऊन चुकल्या ह्मणून दुष्काळ संपल्या बरोबर गहाणाच्या फिर्यादी फार वाढल्या. गुदस्ताच्या दाव्यांची सरासरी किंमत ९६,६३.५४३ रुपये होती आणि त्या मानानें हलके दावे पुष्कळ दाखल करण्यात आले.

मे. हेअर साहेब लिहितात कीं, न्यायाधिशांनीं केवळ निकालाच्या संख्येकडे नजर ठेवूं नये. जे जे जुने खटले असतील त्यांचें निराळें टिप्पण ठेवावें आणि त्यांचा निकाल अगोदर होईल अशी व्यवस्था करावी. जुने दावे जितके अधीक निकालांत निघतील तितके अवश्य पाहिजे आहेत. तसेंच साक्षीदारांस पुष्कळ वेळां कोर्टांत न आणण्या विषयीं मुख्यतः खबरदारी घेतली पाहिजे. एकंदर १०६८६ साक्षीदार कोर्टांत हजर होते. त्या पैकीं फक्त १७६०९ तपासण्यांत आले. कांहीं साक्षिदारांची जबानीच घ्यावी लागली नाहीं व कांहीं जणांस पुनः पुनः बोलवावें लागलें आहे. जुडिशियल कमिशनर साहेबांच्या असें नजरेस आलें आहे कीं, जन्म कटकटीच्या दाव्यामध्यें पुष्कळदां न्यायाधीश पुढली तारीख देतात आणि कोणत्या तरी सबबीवर कामाची लोटालोटी करितात. ही गोष्ट बरोबर नाहीं इतकेंच नाहीं तर साक्षिदारांस अशा लांबणीनें विनाकारण फार त्रास सोसावा लागतो.

हप्तेबंदीनें हुकूमनाम्याच्या रकमेची फेड करावी अशा सवलती १९०१ सालीं पुष्कळशा कोर्टांनीं दिल्या. एकंदर १०९२ दाव्यांत कोर्टाकडून हप्तेबंदी बांधून देण्यांत आली. हप्तेबंदीची सवलत देणें दुष्काळामुळें जरूर झालें होतें परंतु दुष्काळ संपून दोन पिकें चांगलीं आल्या नंतर ही सवलत इतकी देण्याची गरज दिसत नाहीं.

उत्पन्नाच्या दृष्टीनें १९०१ सालीं सरकारचा फायदा मोठा झाला. कोर्ट फीचें उत्पन्न फार वाढलें आहे. दिवाणीच्या कोर्ट फीचें उत्पन्न ४३८१७८ रुपये असून त्यांत फौजदारी कडील उत्पन्न मिळविलें ह्मणजे एकंदर उत्पन्न ४४६४३३ रुपये येतें. कोर्टाचीं समन्सें, वारंटें, जप्त्या वगैरे हुकूम बजावण्याच्या कामाचा खर्च गुदस्ता ६३६४९ रुपये आला. हा खर्च उत्तरोत्तर कमी होत आहे. कोर्टाच्या हुकुमाच्या बजावणीसाठीं ह्मणून कोर्ट फीच्या द्वारानें जो पैसा पक्षकाराकडून घेतात त्याचो एकंदर बेरीज रुपये १,०७,७८५-१० आणे आहे. खर्च थोडा व उत्पन्न पुष्कळ अशी स्थिती आहे. तरी देखील पक्षकाराकडून घेण्याची प्रोसेस कमी करण्यात येत नाहीं. सरकारची गरीब रयतेकडे खरी मेहेर नजर असेल तर कोर्ट फीचा बोजा सरकारानें अवश्य कमी केला पाहिजे. न्यायखातें ह्मणजे सरकाराला उत्पन्नाचीच बाब झाली आहे. हें उत्पन्न कमी झालें तरी हरकत नाहीं इतकेंच नाहीं तर सरकारानें या उत्पन्नाकडे नजरच ठेवूं नये असा आमचा अभिप्राय आहे. सरकार सावकाराकडून जी कोर्ट फी वसूल करिते ती अखेरीला गरीब रयतेला भरावी लागते. कोर्ट फीचा कर शेवटीं गरीब रयतेला द्यावा लागतो. गरिबांची दाद सरकाराला घेणें असेल तर कोर्ट फी माफ करण्यापासूनच सरकारचे मोठे उपकार होतील.

---

## पोलिस खातें

इंडियांतील पोलिसखातें असावें तितकें चांगलें नाहीं. या खात्यांत चांगल्या लोकांस आश्रयच मिळत नाहीं. युरोपिअन लोकांस सर्वच मोठमोठ्या जागा मिळतात. पगार असावेत तितके भरपूर नाहींत. इत्यादि पुष्कळ दोष या खात्यांत आहेत. ही तक्रार फार जुनी आहे. लार्ड कर्झन हे सुधारणा करण्याविषयीं फार झटतात. पुरी चौकशी करून कोणती सुधारणा केली पाहिजे हें ठरविण्यासाठीं लार्ड कर्झन साहेब प्रथमतः कमिशन नेमितात. ही कारकीर्द कमिशनें नेमण्यासंबंधानें प्रसिद्धीला आली आहे. कमिशनांची कामगिरी पुरी होण्या पूर्वींच लार्ड साहेब कदाचित् विलायतेला परत हि जातील. कमिशनांच्या द्वारानें भावी सुधारणेच्या दिशा निर्दिष्ट होतात ही गोष्ट खरी आहे, तथापि युनिव्हरसिटी कमिशनापासून आह्मांस फायदा न होतां मोठें नुकसान होण्याची भिती आहे. शिक्षण महाग करून श्रीमंतांनाच उच्च शिक्षणाचा मक्ता देण्याविषयीं या कमिशनाच्या सूचना आहेत. पोलिस खात्या विषयीं चौकशी करण्यासाठीं जें कमिशन येत्या आक्टोबर महिन्यांत बसणार आहे त्या पासून असा अनिष्ट परिणाम निघूं नये असें आह्मी इच्छितों. पोलिस कमिशनचे प्रेसिडेंट ना. फ्रेजर कमिशनर, मध्यप्रांत हे होतील. त्यांच्या मदतीला दुसरे सहा सभासद दिले आहेत. त्या मध्यें दुर्गाचे महाराज व दिवाण बहादूर श्रीनिवास राघव अयंगर असे दोघे नेटीव आहेत. या कमिशना पुढें मांडलेल्या चौकशीच्या विषयाचे सात भाग केले आहेत.

१ त्या भागांत प्रत्येक जिल्ह्यांतील पोलिस फौजेची रचना, कवाईत, संख्या, पगार इत्यादि गोष्टी विषयीं विचार करण्यांत येईल. शांतता राखणें, आणि गुन्ह्याचा तपास लावून त्याची योग्य चौकशी करणें या दोन्ही गोष्टी प्रत्येक स्थळाच्या जरूरीच्या मानानें नीटपणें अंमलांत आणण्या सारखी पोलिस फौज चांगली व कशी ठेवण्या संबंधानें काय काय नवीन फेरफार केले पाहिजेत याचें विवेचन कमिशनानें करावें.

(२) गुन्ह्याची वर्दी योग्य रितीनें देण्यात येते किंवा नाहीं, आणि खेड्यावरचे जागल्या पोलिस व जिल्ह्याचे पोलिस यांच्या मधील परस्पर दळण वळण सुधरण्या संबंधानें काय काय नवीन तजविजी केल्या पाहिजेत याचा विचार दुसऱ्या भागांत केला जाईल.

(३) प्रत्येक प्रांताचें पोलिस निरनिराळें असावें किंवा सर्व इंडियासाठीं एकच पोलिस खातें असावें अशा विषयीं मत्ति न मत्ति ठरावी. सारांश किरकोळ गोष्टींत प्रजेला त्रास न पोचतां खऱ्या गुन्ह्यांची चौकशी उत्कृष्ठ व्हावी.

(४) हल्लीं पोलिस खात्यांत जे कागद पत्र व तक्ते ठेवण्यांत येतात त्यांच्या संबंधानें फेरफार कोणते करण्यासारखे आहेत.

(५) पोलिसच्या कामगिरीवर माजिस्ट्रेटांची देखरेख योग्य प्रकारें राहते किंवा नाहीं; आणि तसेंच पोलिसांतील कनिष्ट अधिकाऱ्यांकडून रयतेवर जुलूम होऊं नये, इनस्पेक्टरांची देखरेख चांगली राहत असते किंवा कसें या दोन्ही संबंधानें योग्य वाटतील त्या सूचना कमिशनानें कराव्या.

(६) रेल्वे कडील पोलिसा संबंधानें चालू असलेल्या व्यवस्थेंत कोणता फरक करणें जरूर आहे.

व (७) पोलिस खात्यांतील कारकीर्द चांगल्या चांगल्या नेटीव लोकांस ओढून आणण्यासारखी आकर्षक आहे किंवा नाहीं; ती तशी नसल्यास युरोपिअन अंमलदार पुरेसे ठेवून काय काय फरक केले पाहिजेत हें सूचविण्याचें काम कमिशनाकडे दिलें आहे.

आह्मी उमेद बाळगतों कीं या कमिशनापासून पोलिस खात्याचा कलंक कायमचा दूर करण्यांत येईल. मोठी आशा धरावी आणि मनोराज्य करावें इतकेंच काम आपल्या हातीं आहे.

---

## पाऊस पाणी

गेल्या आठवड्याचा पाऊस सर्वत्र झाला दुष्काळाचीं सरकारी माहितें खोटीं ठरतील असा पक्का भरंवसा आला आहे. मोठीच चिंता दूर झाली. गुजराथ, दक्षिण महाराष्ट्र, मद्रास, बंगाला, मध्यप्रांत, रजपुताना, पंजाब इत्यादि सर्व भागातून पाऊस चांगला झाला असून पेरणीचीं कामें जोरानें व जलदीनें चालू आहेत. आणि पूर्वीं जे पेरे झाले होते त्यांसही फार योग्य वेळीं पाऊस पडला आहे. बाजारभाव पुष्कळ मंदावले आहेत. ईश्वर कृपेनें सर्वत्र धनधान्यसमृद्धी होवो !! ईश्वरी कृपेची सावली असली ह्मणजे काय उणें पडणार आहे.

---

## राज्याभिषेक

चक्रवर्ती एडवर्ड बादशहा यांची प्रकृती चांगली दुरुस्त होत आहे आणि त्यांस आतां इतका आराम वाटूं लागला आहे

REGISTERED N. No. 4

| | | | |
|---|---|---|---|
| सहामाही | „ ३ | „ | ८८ |
| साल अखेर | „ ७ | „ १ | ८८ |
| किरकोळ अंकास | ................. | | ६४ |

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........ ८१ ०६

दुसरे खेपेस .... .........८१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as

Six monthly.........3 ............... 8 as

Single copy ................................ 4 as

Advertisement

Below 10 lines...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per lin e...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI — AKOLA MONDAY 21 JULY 1902 — NO 28

वर्ष ३६ — आकोला सोमवार तारीख २१ माहे जुलै सन १९०२ इ० — अंक २८

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याचा बँक

या पेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवाने देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.


एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

### खरेदी करा !
### रास्कोपचीं थेट व खरीं पेटंट वाचेस
### नकली मालास भुलून पैसे खर्चु नका !!!

रेलेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अयंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांत हें वॉच वेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरुरी नाहीं कारण त्याच्या गुणांची प्रचीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस....................४०

१९ „ हंटिंग....................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०

१९ „ हंटिंग, नकशीचे ...........२५०

**मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८

१९ „ सेकंद कांट्यासह...........१०

१९ „ मध्यभागीं सेकंद काटा असलेलें ..............२२

१९ „ हाफ हंटिंगचें..............१०

१९ „ हंटिंगचें ....................२०

१४ „ रिस्ट वॉच ....................१०

**इनामल्मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ओपन फेस............२०

१९ „ हंटिंग........................२०

१४ „ रिस्टवॉच......................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०

१४ „ हंटिंग..........................३५

१८ व १९ „ ओपनफेस............३०

१९ „ सेकंद कांट्यासह ............३२

१९ „ मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ..............३५

१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५

१९ „ हंटिंग .....................४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

सी. हॉनीगर आणि कंपनी,
ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचें सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

### नोटीस

वेशमी सांनय्या गुरु हरी अय्या जंगम आकोला यांस:—

मी या लेखानें कळवितों कीं, तुह्मास आकोला येथील जंगम मठाची व्यवस्था व देखरेख करण्यासाठीं कारभारी नेमिलें होतें. मठाची वहिवाट आह्मी सांगू त्या प्रमाणें चालवूं अशा बद्दल तारीख २७ दिसेंबर सन १८७७ रोजीं तुह्मी करारनामा लिहून दिला आहे. पण मठाच्या इनाम जमिनीची तुमच्या मनास येईल तशी विल्हेवाट लावण्याची तुमची कारवाई आमच्या कानावर आली आहे. तुमचा कारभार आतां आमच्या पसंत नाहीं. आज तारखेस पासून तुमचा कारभाराचा हक्क या लेखानें रद्द केला आहे. तर ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांच्या आंत तुह्मी आमचा मठ सोडून द्यावा. व आज पर्यंतच्या कारभाराचा सर्व हिशोब देऊन मठाचा जमीन जुमला जशाच्या तसाच आमच्या स्वाधीन करावा. यांत अंतर पडेल तर सरकार मार्फत सर्व व्यवस्था करण्यांत येईल, व सर्व खर्च तुमच्या अंगावर पडेल. कळावें तारीख १४ माहे जुलै सन १९०२ इसवी.

सही

पंचाक्षरी अय्या गुरू विरूपाक्ष अय्या जंगम मठाधिपती संस्थान पेठ बाळापूर
दस्तुर खुद.

### नोटीस

मेहेरबान गुलाबखा वा। मैबूबखा मुसलमान व इसमाइलखा वा। मैबुबखा मुसलमान वस्ती कसबे अडगांव ता. आकोट जिल्हा आकोला या उभयतांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे कळंमखेड व मौजे मालपुरा व गोर्धी वगैरे ठिकाणची जमीन तुमचे संबंधानें तारीख २६।६।१९०२ रोजीं कोर्टमार्फत आमचे ताब्यात आली आहे त्या पैकीं मौजे कळमखेड येथील शेत सर्वे नंबर २ एकर ३२ गुंठे १२ आकार रुपये ६१ ह्यांतील ½ हिस्सा व मौजे मालपुरा येथील शेत सर्वे नंबर २ पैकीं एकर ७ गुंठें ८ आकार रुपये १३ ह्या शेतांतील ½ हिस्सा ही दोन शेतें तुमचे संमतीनें तळेगांव येथील रघु वा। जानजी मड व भगु वा। सोनाजी मड व मौजू वा। महमद आब गुपलमान ह्यास सालीम शेतसारा व निमे माल घेणे करारानें दिलीं. त्या वेळीं तुह्मी उभयतांनीं यांस समक्ष सांगितलें कीं, शेतें समाईक वाहूं. वाटून दिल्यास लोक रिती प्रमाणें सरसनिरस वाटून देऊं व आमचे पूर्वींचे बटाईदार महमद रोषन ह्याचा लागलेला लागवड रुपये २४ तुह्मी द्यावा असें यांस सांगितलें वरून तळेगावकर यांनीं महमद रोषनची लागवड चोवीस रुपये तुमचे समक्ष देऊन बटाई चिठ्ठीही स्टांपावर तुमचे देखत तुमचे सल्यानें ता० २९।६।१९०२ रोजीं झाली व त्याच वेळेस दुसरे वाहीकरितां जोड्या बोलाविल्या व प्रमाणें बटाईदारही जोड्या घेऊन वाहीस आले होते. वाही झाल्यावर ता. ३।४ जुलई सन १९०२ रोजीं तुह्मी मौजे कळंमखेड येथील शेतांतील सुमारें चार तिफणची तयार असलेली काळी जमीन पश्चिमेकडून पेरून बटाईदार ह्यास पूर्वेकडील बंजर कुंदेवन झालेले सुमार चार तिफणचे वटून दिले. तेव्हां यांनीं निरुपायास्तव कपाशीची पेरणी केली वगैरे मजकुराची तळेगांव बटाईदार रघु, भगु व मौजू ह्यांनीं ता, ८।७।१९०२ इ० रोजीं नोटीस वर्तमान पत्रद्वारें दिली कीं, आह्मास कबूल केलें प्रमाणें शेतें समाईक वाहण्यास गुलाबखा व इस्माइलखा हे देत नाहींत व सरस निरस जमीनही देत नाहींत, बंजर कुंदेवन देतात. त्यांत आमचा लागणारा लागवडही निघणें मुष्कीलचे आहे; सबब आह्मी सालीम शेतसारा न देतां निवळ निमे माल देऊं तसें कबूल नसल्यास आठ दिवसाचे आंत आमचाही दिलेला लागवड रुपये २४ चोवीस व आह्मी त्या नंतर लाविलेला लागवड जोड्या रुपये २॥, तिफण रुपये १२ व सरकीचें बीं रुपये ७ सात असे ४५॥ रुपये लागवड देऊन शेतें संभाळावीं. मुदतींत तुमचे कडून तसें न झाल्यास शेत सान्याचे आह्मी जबाबदार नसून निवळ निमे मालाने बटाईदार समजून शेतें वाहूं. शिवाय मालपुरा येथील शेत तुह्मी त्यांस वाहूं देत नाहीं असेंही यांनीं नोटिशीत कळविलें आहे. त्या वरून तुह्मास कळविण्यांत येतें कीं, ही नोटीस पावल्या पासून २।४ दिवसाचे आंत तुह्मी वाटेल तो बटाईदार वाटेल त्या शर्तीनें आणल्यास आह्मी सर्व शेताचे ½ हिस्से त्यास वहितीस देऊं. मात्र तळेगांकर बटाईदार ह्याचा व आह्मी दुसरे लोकास दुसरे शेताचा दिलेला व लागलेला लागवड तुह्मी जो बटाईदार आणाल यांनीं दिला पाहिजे व या बटाईदारास तुह्मी जामीन राहिलें पाहिजे.

मालपुरे येथील शेताचा ½ हिस्सा यांस तुह्मी वाहूं देत नाहीं तो वाहूं द्यावा तसेंच मौजे गोर्धी येथील शेतात ही निमे हिस्सा पडीत आहे त्याचाही कोणी वायदा देऊं शकत नाहीं व पडीत असल्यामुळें कोणी बटाईनेही करित नाहीं. सबब तुह्मांस पाहिजे तो बटाईदार वरील शर्ती प्रमाणें आणावा ह्मणजे त्यास पासून बटाई चिठ्ठी करून घेऊं व शेत वाहण्यास देऊं. कळावें. तारीख १८।७।१९०२ इ०

सही

आणाजी दाजी जोशी.
राहणार अडगाव
ता. आकोट.

टीप—तुह्मी तळेगांवकर बटाईदार ह्मास कबूल केले प्रमाणें न चालल्यामुळें ह्या बटाईदारांनीं आह्मास नोटीस दिली तिचे खर्चाचें मागणें केलें आहे तो खर्च व ह्या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें. ता. १८।७।१९०२ इ.

( सही ) अण्णाजी दाजी जोशी.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती आषाढ वद्य १ शके १८२४

---

## दिवाणी न्याय

दिवाणी न्याय कोर्टाच्या कमागिरीचा १९०१ सालचा वार्षिक रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. जुडिशिअल कमिशनर या नात्यानें मे. हेअर साहेब यांनीं हा पहिलाच रिपोर्ट लिहिलेला आहे. रिपोर्ट फार संक्षिप्त असावा अशा विषयीं हुकूम असल्या कारणानें मे. हेअर साहेबांच्या लेखणीची स्वैर गती बंद झाली तथापि त्यांचा हा रिपोर्ट पाहून अलिशान रेसिडेंट सर बार साहेब ह्मणतात कीं हा रिपोर्ट अगदीं नमुन्या दाखल आहे.

वऱ्हाडांत मूळचीं ४० दिवाणी कोर्टें होतीं; परंतु रिपोर्टाच्या वर्षांत नायब तहशिलदारां कडील दिवाणी काम काढून घेतल्यामुळें ५ कोर्टें बंद झालीं, आणि राजा इंद्रकरण, आनररी अव्वाची हे हैदराबादेस परत गेल्यामुळें ६ वें कोर्ट बंद झालें. सध्यां ३४ दिवाणी कोर्टें या प्रांतांत आहेत. गेल्या वर्षीं एकंदर २७६०६ दावे दाखल झाले. ही संख्या गेल्या तीन वर्षा पेक्षां मोठी असून पुष्कळशी वाढलेली आहे. १८९८त दाव्यांची संख्या २८४४१ होती आणि या संख्ये जवळ जवळच गुदस्तांच्या दाव्यांची संख्या आहे. या संबंधानें मे. हेअर साहेब असें अनुमान बांधतात कीं, गेल्या दुष्काळांत लोकांची जी दाणादाण झाली होती व लोकांवर जो दारुण प्रसंग गुदरला होता त्यामुळें दिवाणी कडील काम फार कमी झालें होतें; परंतु जसजशी पीकपाण्यानें अबादानी झाली व लोक पूर्ववत् सुखी झाले तसतसें दिवाणी काम आपल्या पूर्वींच्या स्थितीला येत चाललें आहे.

अलिकडे दिवाणी कोर्टाच्या कामाचें मापन फार बारकाईनें होत असतें. दरमहाच्या दरमहा निकालांत लागलेल्या दाव्यांची संख्या कोर्टवारीनें तपासून पाहण्यांत येते आणि वरिष्ठ कोर्टाचे शेरेदोरे वेळोवेळ कळविण्यांत येतात. न्यायाचें पुष्कळसें काम करावें अशा विषयीं सक्त देखरेख ठेवण्यांत येत आहे. कामाचा बरेवाईटपणा अपील कोर्टाच्या कामा वरून ताडण्यांत येतच असतो. चांगल्या पुष्कळशा कामगिरी बद्दल खालील न्यायमूर्तींचीं नांवें रिपोर्टांत प्रसिद्ध केलीं आहेतः- रा॰ रा॰ जठार, मोइनुद्दीन, क्राफर्ड, दांडेकर, कींग, प्राइस, शेंबेकर, पतकी, व रायसाहेब नारायणसिंग. त्या त्या जिल्ह्याच्या डिपुटी कमिशनरांकडून या गृहस्थांची शिफारस करण्यांत आली आहे. त्या शिवाय मे. हेअर साहेब यांस रा. रा. मुळे व मि. दस्तूर यांचें काम विशेष पसंत पडलें आहे.

१९०१ सालीं एकंदर २९१८९ दावे निकालास लागले. जुनी शिल्लक मिळून ३११०९ दावे कोर्टाच्या रजिस्टरावर होते; त्या पैकीं निकालास लागलेले दावे वजा करितां चालूं सालाकरिता बाकी शिल्लक ९९२४ राहिले. हें काम एकंदरीनें पुष्कळ झालें ह्मणून जुडिशिअल कमिशनर साहेबांनीं संतोष प्रदर्शित केला आहे. गेल्या सालीं छोट्या छोट्या रकमांच्या फिर्यादी पुष्कळ झाल्या आणि तशांत गहाणांच्या फिर्यादीला मोठा ऊत आला होता. दुष्काळांत गहाणा शिवाय कोणी कर्ज देत नव्हतें आणि गहाण मालांच्या किंमती कर्जाच्या रकमेनें होऊन चुकल्या ह्मणून दुष्काळ संपल्या बरोबर गहाणाच्या फिर्यादी फार वाढल्या. गुदस्ताच्या दाव्याची सरासरी किंमत ९६,६३.९४३ रुपये होती आणि त्या मानानें हलके दावे पुष्कळ दाखल करण्यांत आले.

मे. हेअर साहेब लिहितात कीं, न्यायाधिशांनीं केवळ निकालाच्या संख्येकडे नजर ठेवूं नये. जे जे जुने खटले असतील त्यांचें निराळें टिप्पण ठेवावें आणि त्यांचा निकाल अगोदर होईल अशी व्यवस्था करावी. जुने दावे जितके अधीक निकालांत निघतील तितके अवश्य पाहिजे आहेत. तसेंच साक्षीदारांस पुष्कळ वेळां कोर्टांत न आणण्या विषयीं मुख्यतः खबरदारी घेतली पाहिजे. एकंदर १०६८६ साक्षीदार कोर्टांत हजर होते. त्या पैकीं फक्त १७६०९ तपासण्यांत आले. कांहीं साक्षिदारांची जबानीच घ्यावी लागली नाहीं व कांहीं जणांस पुनः पुनः बोलवावें लागलें आहे. जुडिशियल कमिशनर साहेबांच्या असें नजरेस आलें आहे कीं, जन्म कटकटीच्या दाव्यामध्यें पुष्कळदां न्यायाधीश पुढली तारीख देतात आणि कोणत्या तरी सबबीवर कामाची लोटालोटी कारितात. ही गोष्ट बरोबर नाहीं इतकेंच नाहीं तर साक्षिदारांस अशा लांबणीनें विनाकारण फार त्रास सोसावा लागतो.

हप्तेबंदीनें हुकूमनाम्याच्या रकमेची फेड करावी अशा सवलती १९०१ सालीं पुष्कळशा कोर्टांनीं दिल्या. एकंदर १०९२ दाव्यांत कोर्टाकडून हप्तेबंदी बांधून देण्यांत आली. हप्तेबंदीची सवलत देणें दुष्काळा मुळें जरूर झालें होतें परंतु दुष्काळ संपून दोन पिकें चांगलीं आल्या नंतर ही सवलत इतकी देण्याची गरज दिसत नाहीं.

उत्पन्नाच्या दृष्टीनें १९०१ सालीं सरकारचा फायदा मोठा झाला. कोर्ट फीचें उत्पन्न फार वाढलें आहे. दिवाणीच्या कोर्ट फीचें उत्पन्न ४३८१७८ रुपये असून त्यांत फौजदारी कडील उत्पन्न मिळविलें ह्मणजे एकंदर उत्पन्न ४४६४३३ रुपये येतें, कोर्टाचीं समन्सें, वारंटें, जप्त्या वगैरे हुकूम बजावण्याच्या कामाचा खर्च गुदस्ता ६३१४९ रुपये आला. हा खर्च उत्तरोत्तर कमी होत आहे. कोर्टाच्या हुकुमाच्या बजावणीसाठीं ह्मणून कोर्ट फीच्या द्वारानें जो पैसा पक्षकाराकडून घेतात त्याची एकंदर बेरीज रुपये १,०७,७८५- १० आणे आहे. खर्च थोडा व उत्पन्न पुष्कळ अशी स्थिती आहे. तरी देखील पक्षकाराकडून घेण्याची प्रोसेस कमी करण्यांत येत नाहीं. सरकारची गरीब रयतेकडे खरी मेहेर नजर असेल तर कोर्ट फीचा बोजा सरकारानें अवश्य कमी केला पाहिजे. न्यायखातें ह्मणजे सरकाराला उत्पन्नाचीच बाब झाली आहे. हें उत्पन्न कमी झालें तरी हरकत नाहीं इतकेंच नाहीं तर सरकारानें या उत्पन्नाकडे नजरच ठेवूं नये असा आमचा अभिप्राय आहे. सरकार सावकाराकडून जी कोर्ट फी वसूल करिते ती अखेरीला गरीब रयतेला भरावी लागते. कोर्ट फीचा कर शेवटीं गरीब रयतेला द्यावा लागतो. गरिबांची दाद सरकाराला घेणें असेल तर कोर्ट फी माफ करण्यापासूनच सरकारचे मोठे उपकार होतील.

## पोलिस खातें

इंडियांतील पोलिसखातें असावें तितकें चांगलें नाहीं. या खात्यांत चांगल्या लोकांस आश्रयच मिळत नाहीं. युरोपिअन लोकांस सर्वच मोठमोठ्या जागा मिळतात. पगार असावेत तितके भरपूर नाहींत. इत्यादि पुष्कळ दोष या खात्यांत आहेत. ही तक्रार फार जुनी आहे. लार्ड कर्झन हे सुधारणा करण्याविषयीं फार झटतात. पुरी चौकशी करून कोणती सुधारणा केली पाहिजे हें ठरविण्यासाठीं लार्ड कर्झन साहेब प्रथमतः कमिशन नेमितात. ही कारकीर्द कमिशनें नेमण्यासंबंधानें प्रसिद्धीला आली आहे. कमिशनांची कामगिरी पुरी होण्या पूर्वींच लार्ड साहेब कदाचित् विलायतेला परत हि जातील. कमिशनांच्या द्वारानें भावी सुधारणेच्या दिशा निर्दिष्ट होतात ही गोष्ट खरी आहे, तथापि युनिव्हरसिटी कमिशना पासून आह्मांस फायदा न होतां मोठें नुकसान होण्याची भिती आहे. शिक्षण महाग करून श्रीमंतांनाच उच्च शिक्षणाचा मक्ता देण्याविषयीं या कमिशनाच्या सूचना आहेत. पोलिस खात्या विषयीं चौकशी करण्यासाठीं जें कमिशन येत्या आक्टोबर महिन्यांत बसणार आहे त्या पासून असा अनिष्ट परिणाम निघूं नये असें आह्मी इच्छितों. पोलिस कमिशनचे प्रेसिडेंट ना. फ्रेजर कमिशनर, मध्यप्रांत हे होतील. त्यांच्या मदतीला दुसरे सहा समासद दिले आहेत. त्या मध्यें दुर्भगाचे महाराज व दिवाण बहादूर श्रीनिवास राघव अयंगर असे दोघे नेटीव आहेत. या कमिशना पुढें मांडलेल्या चौकशीच्या विषयाचे सात भाग केले आहेत.

१ त्या भागांत प्रत्येक जिल्ह्यांतील पोलिस फौजेची रचना, कवाईत, संख्या, पगार इत्यादि गोष्टी विषयीं विचार करण्यांत येईल. शांतता राखणें, आणि गुन्ह्याचा तपास लावून त्याची योग्य चौकशी करणें या दोन्ही गोष्टी प्रत्येक स्थळाच्या गरजेच्या मानानें नीटपणें अंमलात आणण्या साठी पोलिस फौज चांगली व पुरेशी ठेवण्या संबंधानें काय काय नवीन फेरफार केले पाहिजेत याचें विवेचन कमिशनानें करावें.

( २ ) गुन्ह्यांची वर्दी योग्य रितीनें देण्यांत येते किंवा नाहीं, आणि खेडेगांवचे जागल्या पोलिस व जिल्ह्याचे पोलिस यांच्या मधील परस्पर दळण वळण सुधारण्या संबंधानें काय काय नवीन तजविजी केल्या पाहिजेत याचा विचार दुसऱ्या भागांत केला जाईल.

( ३ ) प्रत्येक प्रांताचें पोलिस निरनिराळें असावें किंवा सर्व इंडियासाठीं एकच पोलिस खातें असावें अशा विषयीं मत्रति न मत्रति व्हावी. सारांश किरकोळ गोष्टींत प्रजेला त्रास न पोचतां खऱ्या गुन्ह्यांची चौकशी उत्कृष्ठ व्हावी.

( ४ ) हल्लीं पोलिस खात्यांत जे कागद पत्र व तक्ते ठेवण्यांत येतात त्यांच्या संबंधानें फेरफार कोणते करण्यासारखे आहेत.

( ५ ) पोलिसच्या कामगिरीवर माजिस्ट्रेटांची देखरेख योग्य प्रकारें राहते किंवा नाहीं; आणि तसेंच पोलिसांतील कनिष्ट अधिकाऱ्यांकडून रयतेवर जुलूम होऊं नये, इनस्पेक्टरांची देखरेख चांगली राहत असते किंवा कसें या दोन्ही संबंधानें योग्य वाटतील त्या सूचना कमिशनानें कराव्या.

( ६ ) रेल्वे कडील पोलिसा संबंधानें चालूं असलेल्या व्यवस्थेंत कोणता फरक करणें जरूर आहे.

व ( ७ ) पोलिस खात्यांतील कारकीर्द चांगल्या चांगल्या नेटीव लोकांस ओढून आणण्यासारखी आकर्षक आहे किंवा नाहीं; ती तशी नसल्यास युरोपिअन अंमलदार पुरेसे ठेवून काय काय फरक केले पाहिजेत हें सूचविण्याचें काम कमिशनाकडे दिलें आहे.

आह्मी उमेद बाळगतों कीं या कमिशनापासून पोलिस खात्याचा कलंक कायमचा दूर करण्यांत येईल. मोठी आशा धरावी आणि मनोराज्य करावें इतकेंच काम आमच्या हातीं आहे.

## पाऊस पाणी

गेल्या आठवड्याचा पाऊस सर्वत्र झाला दुष्काळाचीं सरकारी भाकितें खोटीं ठरतील असा पक्का भरंवसा आला आहे. मोठीच चिंता दूर झाली. गुजराथ, दक्षिण महाराष्ट्र, मद्रास, बंगाला, मध्यप्रांत, रजपुताना, पंजाब इत्यादि सर्व भागांतून पाऊस चांगला झाला असून पेरणींचीं कामें जोरानें व जलदीनें चालूं आहेत. आणि पूर्वीं जे पेरे झाले होते त्यांसही फार योग्य वेळीं पाऊस पडला आहे. बाजारभाव पुष्कळ मंदावले आहेत. ईश्वर कृपेनें सर्वत्र धनधान्यसमृद्धी होवो !! ईश्वरी कृपेची सावली असली ह्मणजे काय उणें पडणार आहे.

## राज्याभिषेक

चक्रवर्ती एडवर्ड बादशहा यांची प्रकृती चांगली दुरुस्त होत आहे आणि त्यांस आतां इतका आराम वाटूं लागला आहे

कीं ते बरेचसे हिंदू फिरून लागले आहेत. यांची प्रकृती बिघडली ह्मणून जो राज्याभिषेक लांबणीवर टाकण्यात आला तो आतां पुढील महिन्याच्या ८ वे तारखे पासुन १२ वे तारखेच्या आंत निःसंशय होईल. राज्याभिषेकाचा संकेत ९ व्या तारखेचा निश्चित केला आहे आणि हा उत्सव चांगला लाभावा एवढीच आमची परमेश्वरा पाशीं प्रार्थना आहे.

## लघुता

आमचे देशी राजेरजवाडे विलायतेस बादशहाचे पाहुणे ह्मणून गेले आहेत, तेव्हां त्यांचा इतमाम व मानमरातब योग्य प्रकारें राखण्यात येईल असा आह्मांस भरंवसा होता. पण तो आतां व्यर्थ ठरला. इंडियाच्या पाहुण्यांसाठीं इंडिया आफिस मध्यें जो उत्कृष्ट जलसा करण्यात आला त्याचा दीड दोन लक्ष रुपयाचा खर्च इंडियावर लादण्यांत येईल असें स्टेट सेक्रेटरी लार्ड हामिल्टन यानीं फर्माविलें आहे. हा जलसा चालतांना त्या स्थळाला चांदण्याची दिव्य शोभा आणिली होती; पण ही शोभा पाहतांना लार्ड हामिल्टन यांचें वाक्य आठवलें ह्मणजे आमच्या इंडियन राजांच्या प्रसन्न चित्तवृत्ती विषनें कालविल्या प्रमाणें क्षोभ पावतील यांत शंका नाहीं. पाहुणचारास बोलाविलेल्या मंडळींची कोण ही अवहेलना! इंडियाच्या पाहुण्यास जो नियम लागू केला आहे तो कालनीच्या पाहुण्यास लागू नाहीं. विलायत सरकार त्यांचा मात्र खर्च सोसण्यास तयार आहे पण इंडियन राजांचा खर्च सोसणार नाहीं. ही गोष्ट सरकारची लघुता दर्शविते आणि त्यांत जो पक्षपात केला आहे तो त्या लघुतेस एका थोर पातकाच्या संगतीला नेऊन बसवितो. सरकारी पक्षपातामुळें तिकडील रेलवे कंपन्यांही नीच गोष्टी करूं लागल्या. कालनीवाल्यांस रेलवेचा फुकट पास देण्यांत आला आहे पण तो पास इंडियन पाहुण्यास नाहीं. लघु वर्तनाचें अनुकरण चटकन होतें! ही लघुता विलायत सरकार दूर करील तर त्यांचा लौकिक केवढा बरें वाढेल!

## क्रांती

विलायतच्या मंडळीचे मुख्य अध्वर्यु लार्ड सालिसबरी हे घरीं बसले. वार्धक्यांतील नाजूक प्रकृतीमुळें राज्याचा कार्यभार उचलवत नाहीं. ह्मणून लार्ड सालसबरींनीं महाराज एडवर्ड यांचा निरोप घेतला आणि महाराजाला ती गोष्ट कबूल करणें भाग झालें. लार्ड सालिसबरी हे मोठ मुत्सद्दी होऊन गेले. त्यांच्या इतके वयोवृद्ध मुत्सद्दी क्वचितच आढळतील. यांचा फायदा इंडियास मिळाला नाहीं ह्मणून खेद वाटतो. त्यांच्या विश्रांतीचा काल सुखानें जावो! त्यांच्या पश्चात दिवाणगिरी मि. बालफोर यांच्याकडे आली आहे. या प्रधान मंडळीच्या गडबडींत लार्ड हामिल्टन आमच्या देशाला सोडतील तर एक प्रस्तुत आपदा दूर झाल्या सारखी होईल. भावी गोष्ट कांहींही असो!

लार्ड सालिसबरी यांचें वय ७२ वर्षांचें आहे. मि. ग्लाडस्टन यानीं ८५ वें वर्षां पर्यंत काम केलें. लार्ड बिकन्सफिल्ड हे ७६ वे वर्षांपर्यंत काम करीत होते. लार्ड पामरस्टन हे ८१ वर्षे पर्यंत मुख्य प्रधान होते. या मानानें लार्ड सालिसबरी हे फार वयोवृद्ध नाहींत. ही मुत्सद्दी मंडळी पाहिली ह्मणजे आमच्या देशांतील आयुर्वयांदिचें मान फार कमी आहे असें आढळतें. मुत्सद्दीपणा आमच्या देशांत लागतच नाहीं! सर्व मुत्सद्दीपणा रडकथेंत आहे. राज्यकर्त्यांची वैभवगीता गाण्यांतच मुत्सद्दीपणा अवशिष्ट आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY JULY 21 1902

We have got here at Akola one excellent institution. Its main purpose is to promote various industries and agriculture in particular; and thus to improve the general lot of the people. For this purpose it is proposed to raise a very big fund. With a great capital at command it is intended to give ample help to the craftsmen who are still faithful to the industries of their forefathers. The old industries that had once a firm holding in the markets of this province but have been dying out for want of adequate support, will be revived with the utmost circumspection. They will further be improved with the help of modern appliances of approved pattern. Thus all facilities will be accorded to the business-people who make their living out of their time-honoured industries. The class of weavers, and potter-men will receive as much assistance as those who interest themselves in the manufacture of metalic things.

An Industrial Association is formed under the auspicies of our popular Deputy Commissioner, Kumar Shri Harbhamji Ravaji. Its work is at present confined to the collection of funds. Large sums have been subscribed and, when time comes, they will be collected according to the demands of the business. The articles of the Association are being framed and in the course of a few months we hope to see a practical shape given to the working of this Industrial Association It is also within the view of this Association to supply a nucleus fund to the village co—operative societies that will be formed in this district under the auspicies of the Local Government. The village co—operative banking will gain an additional strength from the control which an association composed of men of wealth, dignity and high social position is likely to exercise in the most salutary manner. The programme of the Association is a very comprehensive one. It is a tentative method of meeting the question of poverty that faces us in the midst of the decay of our old industries, the abnormal over—crowding in agriculture and the want of employment for the multitudes of our people. We hope all success to this institution.

Success or no—success is an event of a long time, and experience alone is to determine it. At present the work of the Association is at the experimental stage. The scheme promises to be a workable one; and the more we proceed with the actual working the clearer will be our future path. The mere beginning in such a case is the sure stepping—stone to its ultimate success and the complete mastery over the first difficulty infuses into the work the spark of life which is seldom destined to subside. Partial failures at times cannot be avoided as they are inseparable from the nature of such undertakings. We must overcome them and put the scheme on stronger basis. There is the least chance of a failure and we think that the Industrial Association deserves a full and hearty support of the rich and wealthy people. We are sure that when so many people meet together, raise a capital of a lac and a half in the less and throw heart and soul in the noble work of ameliorating the sinking state of the masses to some perceptible extent—it will not be a mistake to auger a spendid success for the efforts of these people. Let us begin in earnest as a good work is worth a good begining. We must work and wait with patience and must not rest content unless and until we ensure success for the programme of the Association. The work of the Association will be conducted on commercial principles and we shall certainly expect our people to be truly patriotic in lending a hearty support to it, though sometimes be it to their cost. We need not further add that it is incumbent on the nature people to use things of *native* manufacture to the total exclusion of foreign articles.

---

## वऱ्हाड

हवामान— पाऊस फार चांगला झाला. पेरणीच्या कामाला पाऊस पुष्कळसा झाला. तीन चार दिवस एकसारखा पाऊस पडत होता. एकंदर पर्जन्याचें मापन १० इंचावर झालें आहे. सध्यां शनिवारापासून उघाडी आहे. हवा स्वच्छ व निरोगी आहे. रोगराई कांहीं नाहीं.

रा. रा. दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए तहशिलदार चिखली यांस माजिस्ट्रेट वर्ग २ चे अधिकार देण्यात आले.

मि० आरदेसर दिनसाजी विनाय ए० असि० कमिशनर व सेन्सस सुपरिन्टेंडंट यांस पुढील महिन्यांपासून तीन महिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली.

मि. ने. सि. मालोनी असि. सुपरिन्टेंडंट यांस आजारीपणाची ६ महिन्यांची फर्लो रजा देण्यात आली.

मि० मीर अलम हे मोर्शीला आक्टिंग तहशिलदार होते तेव्हा त्यानीं कांहीं अपशब्द उच्चारून तेथील पाटलाची बेअब्रू केली ह्मणून ह्यांच्यावर फौजदारी खटला उमरावतीस चालू होता, त्याचा अखेर निकाल होऊन त्यास ५१ रुपये दंड करण्यांत आला. अपशब्द ज्यांच्या तोंडीं पक्के बसले आहेत आणि जे अपशब्दांला आपल्या दुष्ट मनोभावानें पुष्कळसा अर्थ आणितात त्यानीं वरील उदाहरण ध्यानात धरण्या सारखें आहे.

आकोल्याच्या कॉटन मार्केट कमिटीचे सभासदांच्या जागीं खालील गृहस्थांस निवडण्यांत आलें.

रा. रा गबूसिंग यशवंतराव

" गुलाब हसन.

" काशिनाथ वामन कुळकर्णी.

मि. करी, असिस्टंट कमिशनर, आकोला हे पुढील महिन्यांत सहा महिन्यांच्या रजेवर जाणार असल्या विषयीं कळतें.

बायलर इनस्पेक्टर यांच्या कामाच्या माहितीसाठीं निराळे नियम करण्यात आले असून ते गेल्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झाले आहेत.

पोंच— मुंबईच्या 'मनोरंजनाच्या' धर्तीवर 'सरस्वती प्रकाश' नांवाचें एक मासिक पुस्तक अमरावतीस आज ७ महिने निघत आहे. त्याचे संपादक रा. रा. के. डी. चौहान हे आहेत. त्यानीं आह्माकडे एक प्रत पाठविली आहे. त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितो. एकंदरीनें हें मासिक पुस्तक बरें असतें व हें उत्तरोत्तर चांगलें प्रसिद्धीस येईल असें त्याच्या बड्या लेखकांच्या नामावळी वरून अनुमान करणें गैर होणार नाहीं.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००। |
| सोनें | २४॥ |
| चांदी | ६६ |
| जवस | १४५ |
| जवारी | ५६ |
| गहू | १००-१२० |
| चणे | ७५ |
| मीठ | ३॥ रु. मण |
| बाजरी | ३८= रु. मण |
| तूप | ७॥ रु. मण |
| तेल | ६॥ रु. मण |

---

## नोटीस

दतु वा। उदेभान झाले कुणबी वस्ती आलेगांव तालुके बाळापूर यांसः—

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजकडून मुखत्यारपत्र घेतलें आहे. तुह्मी माझे नांवचा दोन रुपयांचा स्टांप कागद तुमचे जवळ ठेविलेला आहे तो गेला असे बोलले. शिवाय जमीनचे पट्टे माझे नावचें असलेले त्यांतही तुह्मी कांहीं रद्द बदली करण्याचे ऐकिले. तुमचे सदई प्रमाणें वागणें विश्वास ठेवण्या लायक नाहीं. सबब तुह्मास दिलेलें कुलमुखत्यारपत्र ह्या नोटिशीनें रद्द केलें आहे. कळावें तारीख १९ जुलै सन १९०२ इ०

सही
आंबाबाई मर्द गणूजी पाटील
निशाणी बांगडी ०

---

## वर्तमानसार

बाल वीर—व्हिएना येथील लीओपोल्ड विक्लर नांवें तेरा वर्षांचे विद्यार्थ्यानें बोर लोकांचें शरण जाण्याचें वर्तमान ऐकून आपणास गोळी मारून घेऊन आत्महत्या केली! गुदस्तांच या मुलानें आपल्या शाळेंतल्या मुलांची एक मंडळी स्थापन करून बोरपक्षाचा कैवार घेतला व ट्रॅन्सवॉलकडे जाण्यास निघाला. तो वीस कोस गेल्यावर त्यास त्याचे आईबापांकडे पोंचते करण्यांत आले. या तरुणानें मरणापूर्वी—आपण बोर लोकांचे वाली आहोंत—हें वचन कायम ठेवून मृत्यु पत्करितों—असें लिहून ठेवलें होतें! अवघ्या तेरा वर्षांच्या या मुलाचा हा वृत्तांत मनावर स्वातंत्र्याच्या नैसर्गिक प्रेमाबद्दलच्या ह्याच्या आवडीचें किती स्पष्ट चित्र उठवितो बरें!

चमत्कारिक गोष्ट—इतर राजे रजवाड्यांबरोबर भावलपूरच्या नबाबांसही राज्यारोहणास आमंत्रण होतें. भावलपूरच्या नबाबास तिकडे जातांना लागणारीं सगळीं बंदरें पहावयाची इच्छा उत्पन्न झाल्यावरून ते कराचीहून सुटणाऱ्या सगळ्या बंदरी थांबणाऱ्या आगबोटींत बसले. पण दुर्दैवानें ते ज्या आगबोटींत बसले होते ती आगबोट तुफानांत सांपडली व ह्यांचे फार हाल होऊन ते मुंबईस मोठ्या कष्टानें दाखल झाले. ते वयानें लहान असल्यामुळें रेसिडेंटाच्या ताब्यांत आहेत. ह्यांस विलायतेस नेण्याकरितां हे रेसिडेंट साहेब मुंबईस येतात तों विलक्षणच प्रकार त्यांच्या दृष्टीस पडला. जो छोकरा आपण सांगू तें निमूटपणें ऐकत असे तो आपण पुष्कळ सांगितलें असतां विलायतेस येण्यास तयार नाहीं असें त्यांस आढळून आलें. त्यांनी ह्याला के. सी. आय. चा साखरेचा खडा देऊं केला, जी. सी. आय. ई. चा पेढा देतों म्हणून सांगितलें पण तो कांहीं ऐकेना. तूं विलायतेस गेला नाहींस तर राजेसाहेबांस काय वाटेल, व्हाइसराय साहेबास काय वाटेल, ते काय म्हणतील इत्यादी तऱ्हेनें त्याला धाकहि दाखविला. पण तो कांहीं कबूल होईना. त्याला जी एकदां समुद्राचें भयंकर स्वरूप पाहून धडकी बसली ती कांहीं केल्या जाईना. त्याच्या मनानें पक्कें घेतलें होतें कीं मी जर आतां पुन्हां समुद्रांत गेलों तर माझ्या जिवावर बेतेल. आणि या जिवाच्या भीती पुढें त्याला जी. सी. आय. ई. जी. एस. आय. व बादशहाचा राग इत्यादि गोष्टींचें कांहींच वाटलें नाहीं. या सर्वांचें मूळ 'सबसे जीव प्यारा' हें होय.

अनिवार थंडी—दक्षिण आफ्रिकेमध्यें केप कालनींत थंडी अतिशय पडली असून आगगाड्या व तारायंत्र बंद पडली आहेत; व हजारो जनावरें आणि मेंढ्या गारठून मरण पावल्या आहेत.

गाई नेहमीं डाव्या कुशीवर निजतात. उजवीवर कधीं निजत नाहींत. याचें कारण काय?

कृत्रिम डोळे—मनुष्याचा डोळा गेला असतां त्याच्या जागीं सशाचा डोळा बसवितां येतो, असें एका जर्मन डाक्टरानें सिद्ध करून दाखविलें आहे. दांत पडले असतां जसा नवीन दातांचा संच बसवितां येतो तसेंच डोळे फुटल्यास नवीन संच करितां येईल.

मुदत वाढणार—लॉर्ड कर्झन साहेबांनीं मनांत आणलेल्या सुधारणा घडवून आणण्यास ह्यांस नेहमींची ५ वर्षांची मुदत पुरी होणार नाहीं; यासाठीं त्यांच्या व्हाइसरायीची मुदत पुढेंही वाढविण्यांत येईल, असें 'स्काट्स्मन' पत्राचा लंडन येथील बातमीदार म्हणतो. फार चांगलें होईल.

राज्यारोहणाच्या उत्सवाशीं कसलाही संबंध ठेवावयाचा नाहीं, असा पार्लमेंटांतील आयरिश सभासदांनीं निश्चय केला आहे. व्यक्तिशः एडवर्ड राजा अथवा राणी यांचे संबंधानें आरेलें कांहीं म्हणणें नाहीं; पण राज्यारोहणाच्या विधींत जें तत्व आहे तें आपणांस पसंत नाहीं, म्हणून आपण हा मार्ग पत्करला, असें ह्यांचें म्हणणें आहे!

सूचना—एडवर्ड बादशहाच्या प्रत्यक्ष तोंडचे शब्द ऐकण्याची त्यांच्या पुष्कळ प्रजाजनांस इच्छा आहे; तेव्हां कोणी तरी त्यांचे शब्द फोनोग्राफ यंत्रांत धरून व तें यंत्र हिंदुस्थानांत गांवोगांव हिंडवून व लोकांपासून पैसे घेऊन बादशहाचे शब्द ह्यांस ऐकवावे, अशी एकाची 'एक्स्प्रेस' पत्रांत सूचना आहे!

भविष्य—बादशहाचा आजार १८ आगष्ट रोजीं पूर्ण बरा होऊन राज्यारोहणोत्सव ता० २६ सप्तंबरला होईल. असें कलकत्त्याचा एक ज्योतिषी इंडियन मिररमध्यें भविष्य प्रसिद्ध करतो.

क्लेरेमोरीस परगण्यापैकीं मेयो शहरांतील जिल्हा म्युनिसिपालिटीनें असा ठराव केला होता कीं, ज्या इंग्लंडच्या राज्यामुळें आमच्या देशास दारिद्य, दुष्काळ व जुलूम सोसावा लागत आहे, त्या देशाचे सिंहासनावर एडवर्ड राजा बसणार, म्हणून त्या दिवसाचे स्मरणार्थ ता० २६ व २७ जून रोजीं आपल्या इमारतीवर काळें निशाण लावावें! के०

महा दुःखी कष्टी—प्रे. क्रूगर सारखा दुःखी मनुष्य जगांत कोणीही नसेल. त्याची पत्नी तर मरण पावलीच. शिवाय लढाईंत त्याचा एक मुलगा जखम होऊन मरण पावला, व एक मुलगा सिलोनांत कैदी आहे. दोघे शेवटपर्यंत लढत होते. त्यांच्या नातवाचा एक पाय व एक हात तुटला आहे! दुसरा नातू डिलारीबरोबर होता तोही जखमी झाला होता. तीन नातू लढाईंत मरण पावले! एक जावईही लढाईंत ठार झाला! व इतकेंही करून स्वातंत्र्य गेलें तें गेलेंच!!

क्रांजीची मुक्तता—सेंटहेलिना येथें अटकेंत असलेले बोर लोकांचे झुंजार वीर जनरल क्रांजी ह्यांनीं इंग्रेज सरकाराशीं प्रजाधर्मानें वागण्याची लेखी शपथ घेतली. अर्थातच त्यांची बंधमुक्ति लवकर होईल.

फार उंच वृक्ष—जगामध्यें सर्वांत मोठें झाड म्हणजे नेरी ओसिटीस नांवाचें आहे. ते समुद्रांत वाढतें. ह्याची उंची तीनशें फुटांवर भरते.

बायबल न शिकण्याबद्दल शिक्षा—नाफना येथील मिशनरी शाळेंतील रविवारच्या बायबलच्या वर्गांस हजर न राहणाऱ्या हिंदु विद्यार्थ्यांना शाळेच्या अधिकाऱ्यांनीं फटके मारल्यामुळें हिंदूनीं तेथून आपलीं मुलें काढून निराळी शाळा स्थापन केली आहे. स्तुत्य व अनुकरणीय उदाहरण! अशीच चीड असूं द्या.

घोड्याचें धूम्रपान—जशी कित्येक जनावरें नादप्रिय असतात तशींच कांहीं धूम्रपानप्रिय असतात. श्रीमंत करातीकर देसाई यांचा घोडा धूम्रपान करतो. विडी पेटवून त्याचे नाकपुडींत दिली असतां तो आम्हां मानवां प्रमाणेंच दम मारतो व दुसऱ्या नाकपुडीनें धूर सोडितो. हा घोडा कितीही जरी तुफान सुटला असला तरी जर कोणी रस्त्यांत धूम्रपान करीत असतां आढळला तर तो आपली तापट वृत्ती सोडून ह्याचे सन्निध अगदीं गोगलगाई प्रमाणें उभा राहतो. धूम्रपानानें सिंह देखील माणसाळतो, असें म्हणतात. तंबाखू बडी चीज आहे!

अनुभव पहा—विजेचे दिवे मुंबईस विकत मिळतात. यांस राकेलपेक्षां खर्च कमी येऊन विजेसारखा प्रकाश पडतो. किंमत साडे तीन रुपये ह्या एका दिव्यानें मनास वाटेल तितके दिवे लावितां येतात. मग हेंच दिवे सर्वांनीं घ्यावेत हें चांगलें.

सृष्टीतील गोष्टींच्या नमुन्यावर केलेले अनेक शोध आहेत. अलीकडे विमानें हवींत ह्या ठिकाणीं नेतां येण्याकरितां जे प्रयत्न चालू आहेत, ते बहुतेक पक्ष्यांच्या अवयवांच्या नमुन्यांवर आहेत. त्याच प्रमाणें बोगदे पाडण्याकरितां जमिनींतून पोखरीत जाणारे एक यंत्र काढलें आहे, तें, भुंगा ज्या अवयवांच्या योगानें लांकूड पोखरीत जातो, ह्यांच्या नमुन्यावर आहे. म्हणजे, सृष्ट्यवलोकनानें हजारों नवीन शोधांची कल्पना मनांत बसते.

---

## नोटीस

कृष्णाजी वल्लद दावलजी आमले फुलमाळी राहणार कसबे बारसीटाकळी तालुके आकोला यांसः—

सखाराम वल्लद नऱ्ही तेली राहणार मौजे व्याळ तालुके बाळापूर याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, खालीं लिहिल्या प्रमाणें मौजे रिधोर तालुके बाळापूर येथील शेत सर्वे नंबर १०४ याचें खातें उकर्डा वल्लद राघो माळी मौजे व्याळ तालुके बाळापूर याचे नांवानीं असून सदरील शेतांतील ८६ सहा आण्याचा हिस्सा तुमचेपासून रकम रुपये २५० यास मी खरिदी घेतल्याबद्दल रुपये ५ विसार ही दिला आहे. विसार घेऊन तुम्ही मला थाप देऊन वरील नंबर रंभू वल्लद संभाजी काळेवांच्या व बाबुला वल्लद भिवा माळी या उभयतांस सालमजकुरी वहितीस दिले. ह्याबद्दल एक तर तुम्ही तुमचे रुपये २४५ घेऊन खरिदीखत माझे नांवानीं करून द्यावें अगर नाहीं तर मी तुम्हांपासून दिवाणी दाव्याचे व नोटिशीचे खर्चा समेत शेतांतील ८६ चा हिस्साही घेण्यांत येईल ह्या प्रमाणें कळविल्या वरून सदरील नोटिशीचा जबाब ही नोटीस पावल्या पासून ७ दिवसाचे आंत द्यावा व सदरील हिश्शाचे खरिदीखत करून व नोंदून द्यावें अगर कायदेशीर तजवीज केली जाईल. हे कळावें तारीख १८ माहे जुलै सन १९०२ इसवी.

सही

सखाराम वल्लद नऱ्ही तेली वस्ती व्याळ तालुके बाळापूर निशाणी खुद्द हातची.

---

## नोटीस

शिवराम वल्लद बापूजी आखरे राहणार शिरसोली तालुके आकोट पोस्ट अडगांव यांसः—

खालीं सही करणार हनोती वल्लद सूर्यभान पाटील राहणार चांदखेड तालुके दर्यापूर पोस्ट दहिहंडा याजकडून नोटिशीचे उत्तर देण्यांत येते कीं माझी मुलगी तुम्हाला दिली, तिजला पाठवा अशी नोटीस दिली, तर पाठवावं कोणत्या रितीनीं? पूर्वीं तुमचे घरीं होती त्या वेळेस तिचा जीव घेण्याचा तुम्ही धंदा केला होता त्यावरून आतां तिचें धैर्य तुमचे घरीं येण्यास पहोचत नाहीं. चार वर्षे होतात ती कर्ज काढून निर्वाह करित आहे. तें देणें फेडण्यासाठीं चारशे रुपये द्यावे. पुढें तिजला दरसाल रुपये १०० खावटी देत जावें व याजबद्दल खात्रीलायक जामीन देऊन करारनामा लिहून द्यावा व खोटे तुफान तिचे आंगावर डागिनी दोनशे २०० रुपयाचे होते असें घेतां. तिचे आंगावर तर मुळींच कांहीं दागिनी नव्हते. आयुष्य तिचें होतें म्हणून आमचे घरीं परत आली. आतां तरी पूर्वींची वेळा आणू नये. मागील देण्याचा व खावटीचाही निकाल करून खर्च नगदी द्यावा. नाहीं तर निकाल सरकार मार्फत करण्यांत येईल. कळावें तारीख १४ जुलाई सन १९०२ इसवी.

सही

हनोती वल्लद सूर्यभान पाटील राहणार चांदखेड तालुके दर्यापूर. पोस्ट दहिहंडा.

---


## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या

आम्ही येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या व पिठोरी किंवा पाठोडा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फार सुरेख व पहिल्यांपेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असता सदहू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला


---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. N 4

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ..........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ रु१
दुसरे खेपेस .... ......८१

Six monthly.........3 ............... 8 as
Single copy ........................... 4 as

Advertisement
Below 10 lines...... 2 Rs
Per line over 10......4 as
Repetition Per line...8 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI — AKOLA MONDAY 28 JULY 1902 — NO 29

वर्ष ३६ — आकोला सोमवार तारिख २८ माहे जुलै सन १९०२ इ० — अंक २९

### नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या

आह्मी येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या व पिठोरी किंवा पाठोडा व त्यां। बुध व बृहस्पती हीं चित्रें टेविलीं आहेत. चित्रें फार सुरेख व पहिल्यांपक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदहू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.


एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेव ठेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh एजंट

### खरेदी करा !
रास्कोपचीं थेट व खरीं
पेटेंट वॉ[illegible]
नकली म[illegible] भुलून
पैसे ख[illegible] नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचुक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्याच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस......................४०
१९ „ हंटिंग......................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ............२५०

**मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेकंद कांट्यासह............१०
१९ „ मध्यभागी सेकंद काटा असलेलें ................१२
१९ „ हाफ हंटिंगचें..................२०
१९ „ हंटिंगचें ......................२०
१४ „ रिस्ट वॉच ..................२०

**इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ओंपन फेस............२०
१९ „ हंटिंग......................२०
१४ „ रिस्टवॉच......................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग..........................३५
१८ व १९ „ ओपनफेस............३०
१९ „ सेकंद कांट्यासह ............३२
१९ „ मध्यभागीं सेकंद काटा असलेलें ................३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग ........................४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हीनीगर आणि कंपनी,
ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचें सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य ८ शके १८२४

## परिणत विचार

(ऐहिक सुखाची लघुता)

तत्ववेत्ते हे अद्वितीय अवतारी पुरुष होत. हेच सर्व जगाचे खरे शास्ते व नियंते आणि हेच खरे लोकनायक होत. हे महाजन ज्या मार्गाचा अवलंब करितील तोच सर्वमान्य सन्मार्ग ह्मणून नाणवला जातो. आणि ह्यांच्याच ज्ञानदीपप्रकाशांत सर्व अंध जनसमूह चालत असतो. गेल्या शतकांत पश्चिमेकडे जे महान् महान् ज्ञानी पुरुष होऊन गेले त्यांनीं युरोपियन राष्ट्रास ऐहिक सुखसंपत्तीच्या तुफान भोंवऱ्यांत नेऊन सोडलें त्यामुळें ऐहिक गोष्टींच्या पलीकडे त्यांची विचारदृष्टीच पोंचली नाहीं. ह्या ऐहिक सौख्यसागराच्या उचंबळलेल्या लाटांच्या मारांतच त्यांची तन्मय वृत्ती झाली व त्या तंद्रीमुळें परमार्थाच्या पैल तीराची त्यांस ओळखीहि झाली नाहीं. जे कांहीं आहे तें सर्व ह्या जगांतच आहे, ह्यापक्षां निराळी दिव्य चालक शक्ती कोणचीहि नाहीं हेंच त्यांचें ठाम मत. मानवी शक्तीच्या, दृष्टीच्या व युक्तीच्या सहाय्यसिद्धतेनें सर्व गोष्टींची सिद्धी करून देता येते हाच त्यांचा अभिमान. पण नुसत्या मानवी पराक्रमाच्या व ज्ञानाच्या जोरावर आणि शांततेनें मारलेल्या भूमीवर सर्व लोकांची एकी करूं आणि त्याच्यावर सौख्यानंदाचा वर्षाव करूं ही कल्पना व गर्वोक्ति वृथा होय ! परमार्थाच्या संमेलनाशिवाय व अंतर्गत ईश्वरी शक्ती शिवाय हा महत् कायमच लंगडाच पडणार आहे. ईश्वरी तेजापुढें मानवी तेज फिकें आहे. आपण परमार्थ भक्तीचा सांगडा सोडून दिल्यामुळें ऐहिक विषयाच्या आसक्तींतच खोल खोल पाण्यांत आपला पाय आढ घेत आहे. ही जी आपण आडवाट धरली ती चुकली आणि आपण आपल्या भौतिक विषयांच्या नांवेस पारमार्थिक सुकाणू लावलें नाहीं ही मोठी चुकी केली. ज्या राष्ट्राची ईश्वरावर भक्ती नाहीं, ज्या राष्ट्रास न्यायान्यायाचा फारसा विचार नाहीं, व जें राष्ट्र ऐहिक विषय वासनांत गढून गेलें आहे त्या राष्ट्राची वेळ भरत आलीच पाहिजे. त्या राष्ट्राचा उत्कर्ष फार दिवस टिकणारा नव्हे.

अशा प्रकारचे दुःखोद्गार जगप्रसिद्ध इंग्लिश तत्ववेत्ता हरबर्ट स्पेन्सर यांनीं काढले आहेत. ह्या विचारांचें दिग्दर्शन यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत आहे. हरबर्ट स्पेन्सर ह्यांचें वय ऐंशी वर्षांवर आहे. हेच एकटे गेल्या शतकांतील बड्या तत्ववेत्यां पैकीं उरले आहेत. आतां ह्या वृद्धापकाळांत यांची व पारमार्थिक तत्वाची दृष्टादृष्ट झाली असावीसें दिसतें. ह्यांचा हा अमृततुल्य अनुभवाचा उपयोग सर्वांनीं करून घेतला पाहिजे. पाश्चिमात्य राष्ट्राप्रमाणें आपल्या पूर्वेकडील राष्ट्रांनीं एकट्या भौतिक सुखसुधारणांची आकांक्षा धरूं नये. आपल्या हिंदुधर्मानें सर्व जगास खरा परमार्थ दाखविला आहे. हींच परमार्थाचीं अनुपम तत्वें ऐन समयीं राष्ट्रास सावरून धरणार आहेत. ह्याच्याच प्रसादानें निर्गुण निराकार परमेश्वराचा, व त्याच्या अवतारांची आपली ओळखी होणार आहे. हीच गोष्ट सर्व नूतन शास्त्रें व जुनीं पुराणें मोठमोठ्या अक्षरांनीं डोळ्यापुढें मांडीत आहेत. आणि हीच गोष्ट महा पंडित तत्वज्ञानी पुरुष सांगत आहेत हें ध्यानांत आणा आणि आपली पूर्वापार लाभलेली पारमार्थिक जोड सांडूं नका.

## नोंदणी खातें

नोंदणी खात्याचा त्रैवार्षिक रिपोर्ट नुकतांच प्रसिद्ध झाला आहे; ३१ मार्च १९०२ पर्यंतच्या तीन वर्षांची संक्षिप्त माहिती या रिपोर्टांत आहे. या खात्याचा खर्च सालिना ९१।९२ हजार रुपयांचा आहे. गेल्या तीन वर्षांच्या उत्पन्नाचे आंकडे अनुक्रमें ९९ हजार, ८० हजार व १ लक्ष असे आहेत. दुष्काळाच्या सालीं नोंदणीचें उत्पन्न पुष्कळ वाढलें होतें. या सालीं स्थावर मालाची विक्री पुष्कळशी झाली आणि शंभर रुपया वरच्या किंमतीचे असे स्थावर माल पुष्कळच विकले गेले. हा दुष्काळाचा परिणाम झाला. परंतु नोंदणीचें काम दुष्काळाच्या साला पेक्षांही गुदस्ता फार वाढलें नाहीं. तथापि उत्पन्नाच्या मानानें गुदस्ताचें वर्ष फार उत्कृष्ठ गेलें. दुष्काळाच्या सालीं ४०१८६ दस्ताऐवज नोंदण्यांत आले आणि गुदस्ता ही संख्या ३७३७१ होती. उत्पन्नाच्या वाढी संबंधानें लिहितांना लेफटेनंट–कर्नल वारन हेस्तिंगस ह्मणतात कीं, दुष्काळामुळें नोंदणीचें काम वाढतें तसें व्यापारधंदा चांगला वाढला ह्मणजे नोंदणीच्या कामाला विशेष भरती येत असते. आमच्या मतानें नोंदणीचें काम गुदस्ता वाढलें याचें कारण निराळेंच आहे. दुष्काळांत लोकांनीं आपली स्थावर जिनगी भराभर विकून टाकली व धान्याच्या व्यापाराला मोठी तेजी आली होती. या दोन्ही कारणांनीं इस्टेटीची अदलाबदल पुष्कळच झाली आणि अर्थात् नोंदणी खात्याचें काम फार वाढलें. दुष्काळाचे दुष्ट परिणाम एका साला बरोबर संपले असें कांहीं अधिकारी समजतात; पण ती गोष्ट चुकीची आहे. स्थावर मालाच्या विक्रीला दुष्काळानें जी मोठी गती दिली ती गती बंद पडण्याचा काल अजून आला नाहीं. कांहीं कुटुंबांचा दुष्काळांतच फन्ना उडाला. ह्यांच्या इस्टेटीची सर्व प्रकारें वाताहत झाली. कांहीं कुटुम्बें दुष्काळांतून कशी तरी पार पडलीं खरी, परंतु तीं इतकीं घसरलीं व खालावली कीं त्यांचा पाय उत्तरोत्तर खोलांतच जात आहे. गेल्या दोन सालांच्या पिकांनीं कित्येकांची स्थिती बरीच सुधारली, परंतु पुष्कळ कुटुम्बांची दुर्दशा अद्याप संपली नाहीं; आणि त्यामुळें नोंदणीचें काम तेजीवरच आहे. सुकाळ आला व व्यापार वाढला ह्मणून नोंदणीचें काम वाढल्याच प्रमाणावर चालूं आहे असा मात्र चुकीचा ग्रह होण्याचा संभव आहे, आणि तो संभव या रिपोर्टांतील कांहीं अभिप्राया वरून खराहि ठरतो. व्यापाराला तेजी आल्यानें नोंदणीचें काम वाढेल असें ग्रहित धरलें तरी व्यापार अतोनात वाढला आहे असें मात्र कोठेंही प्रमाणसिद्ध झालेलें दिसत नाहीं. आमच्या मतानें नोंदणीच्या कामाची वाढ व लोकस्थिती यांचा निकट संबंध आहे. दुष्काळाचा परिणाम लयास जाण्याला निदान पांच सात आबादानीचीं वर्षे पाहिजेत. आमच्या मताचें समर्थन मे. इलियट साहेब यांनीं आपल्या अभिप्रायांत थोड्याबहुत अंशांनीं केलें आहे. वाशिम व बुलढाणा या दोन जिल्ह्यांत गेल्या चार वर्षांत जे दस्तऐवज [illegible]रले गेले त्यांच्या संख्येशीं तुलना केली [illegible]से दिसून येतें कीं दुष्काळा नंतर वाशिम जिल्हा जितका लवकर सुधरला तितका बुलढाणा जिल्हा सुधरला नाहीं. नोंदणीच्या कामाच्या वाढी संबंधानें मे. कमिशनर साहेबांनीं आणखी एक निराळेंच कारण दर्शविलें आहे. हल्लीं जमिनीची किंमत फार वाढली आहे. जे पैसेवाले आहेत त्यांस शेती विकत घेण्याकडे पैसा लावावा असें विशेष वाटतें. हे पैसेकरी लोक फारसा व्याजबट्टा करूं इच्छित नाहीं. व्याजबट्टा करणारे सावकार शेती विकत घेण्याच्या भानगडींत फारसे पडत नाहीं. शेतीपेक्षां ह्यांस व्याजबट्टा विशेष लाभकारक होत असतो. अलिकडे जे शेतींत पैसा घालतात ते असें पाहतात कीं व्यांकेंत कमी व्याजानें रक्कम गुंतविण्यापेक्षां शेतींत भांडवल घालणें बरें आहे. शेती नफ्यानें लावून काढली तर दर महा दर शेंकडा ८ आण्याची मिळकत पडेल. साहुकारीचें धोरण व्याजाकडे विशेष असतें आणि सरकार दरबारांतील सव्यापसव्याचे मंत्रांस ते फारसे डगत नाहीत. जे पैसेकरी अलिकडे शेती विकत घेण्याकडे विशेष वळले त्यांच्या भूतृष्णेनेंही नोंदणीच्या कामाला चांगलीच भर पडण्यासारखी आहे. ही भूतृष्णा कमी करण्याचा उपाय सरकारानें योजला आणि मुंबईकडील जमिनीचा कायदा या प्रांताला लागूं केला तर आह्मास मोठेंसें आश्चर्य वाटणार नाहीं.

नोंदणीच्या कामासंबंधानें एक विशेष सुधारणा करण्यांत येणार आहे. दरसाल शंभर सव्वाशे दस्तऐवज कमी स्टांपावर लिहिल्यामुळें किंवा तशाच इतर कारणामुळें जप्त करण्यांत येतात आणि त्या दस्ताऐवजाचा स्टांप दंडासह पुरा करून घेई पर्यंत तो नोंदण्यांत येत नाहीं. स्टांप पुरा करून घेईप र्यंत किंवा स्टांप पुरा आहे असें सरटिफिकीट देई पर्यंत कलेक्टराच्या कचेरींत पुष्कळ वेळां उशीर लागतो आणि त्यामुळें नोंदणीची मुदतही राहत नाहीं. यासाठीं कोणताही दस्ताऐवज जप्त करण्या पूर्वी दस्ताऐवज करून देणाऱ्याची जबाबी वगैरे घेऊन ठेवावी व त्या नंतर जप्तीची पुढील अंमलवारी करावी ह्मणजे नोंदणीच्या मुदतीची हरकत राहणार नाहीं. ही सुधारणा फार चांगली आहे आणि ती लवकरच होईल असा मे० कमिशनर साहेबांचा अभिप्राय आहे.

## स्टांप खातें

नोंदणी खात्या प्रमाणें स्टांप खात्याचाहि त्रैवार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. नोंदणीचें उत्पन्न वाढलें आहे असें आह्मी वर लिहिलें आहे; त्याच्या वरूनच अनुमान होईल कीं, स्टांप खात्याचेंही उत्पन्न वाढलें असावें. आणि हें अनुमान अगदीं बरोबर आहे. कोर्ट फी व जनरल स्टांप मिळून एकंदर उत्पन्न ९,९६,२७३ रुपये आहे. इतकें उत्पन्न पूर्वी कधींच आलें नव्हतें. या उत्पन्नाच्या आंकड्यावरून सरकारी अनुमान असें निघालें आहे कीं हा प्रांत चांगल्या सुस्थितीला व भरभराटीला आला आहे. हें सरकारी अनुमान खरें मानलें तर याचा अर्थ असा होईल कीं गुदस्त साला सारखी उत्कृष्ठ स्थिती पूर्वी कधींच नव्हती. ही गोष्ट वस्तुस्थितीला सोडून आहे हें सांगण्याला निदान फारसा प्रयास कोणासच पडणार नाहीं. स्टांपाचें उत्पन्न वाढण्याला चांगली लोकस्थिती जशी कारणीभूत होते तशी वाईट स्थितीही कारणीभूत होत असते. या शिवाय व्यापारधंदा वाढतो व देवघेव जशा अधीक अधीक होत जातात तसें स्टांपाचें उत्पन्न वाढें, पण या वाढीपासून लोकस्थिती सुधरत आहे असें मात्र निश्चयात्मक अनुमान निघत नाहीं. जनरल स्टांपा संबंधानें कोणतीही स्थिती असली तरी स्टांपाची विक्री कमी जास्त होईल; पण या लघुश्रेष्ठपणा वरून लोकांच्या स्थितीचें अनुमान करणें चुकीचें होणार आहे.

कोर्ट फीचें उत्पन्न गुदस्ता ९,९६,१४९ रुपये झालें. हें उत्पन्न पुष्कळ दांडगें झालें. कोर्टांतल्या फिर्यादी आर्यादी पुष्कळ वाढल्या. दुष्काळामुळें दावे तुंबले होते ते भराभर कोर्टांत येऊं लागले; पण त्यावरून लोक फार सुखी झाले असा मात्र गैरसमज होऊं देऊं नये. खरोखरच जनसमूह सुखी होत गेला तर दिवाणी कोर्टाचें काम वाढण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. जो सुखी असेल तो सावकाराच्या कर्जाची भगभग मागेंच राहूं देणार नाहीं.

अर्जाच्या कागदाचें उत्पन्न कमी कमी होत चाललें आहे ह्मणून मोठी तक्रार आहे. ही तक्रार दूर होण्याचा संभव कांहींच दिसत नाहीं. या कागदाला एक पैसा घेतात पण तो कागद इतका भिकार आहे कीं याच्या मध्यें चिवटपणा तो कसलाही नाहीं. या कागदाला एकदां घडी पाडली कीं जितक्या घड्या तितके निरनिराळे तुकडे पडतात. आमच्या मतें या कागदाची विक्री होते ही देखील फार मोठी आहे. सरकारी दडपशा नसतां तर या कागदाला कोणी हातांतही धरलें नसतें.

जनरल स्टांपाच्या विक्री संबंधानें एक मोठी विलक्षण गोष्ट नजरेला येते. १८९३–९४ सालीं ३,३०,१५४ रुपयांची विक्री झाली होती. एवढी रक्कम अजून गेल्या आठ वर्षांतही आली नाहीं. गुदस्ताचा आंकडा, ह्मणजे ३,१९,३८१ रुपये, त्या साला जवळ जवळ आहे. या गोष्टीचें स्पष्टीकरण समाधानकारक असें अद्याप कोणीच दिलें नाहीं.

स्टांप विकण्याचा परवाना ४९९ इसमांस आहे आणि त्यांस जें कमिशन देण्यांत येतें त्याची सरासरी काढली असतां प्रत्येक व्हेंडराला दरसाल ४८ रुपये वेतन मिळतें. हे वेतन फार कमी आहे आणि तें शिपायीगिरीच्या धंद्याहूनही कमी आहे. धंदा स्वतंत्र खरा पण तो अगदींच निकृष्ठ स्थितीला पोंचलेला आहे.

## आश्वासन

आह्मी इंग्रजांनीं बोअर लोकांचें स्वातंत्र्य हिरावलें ह्मणून ज्यांनीं ज्यांनीं दुःखोद्गार काढले असतील त्यांना ट्रान्सव्हालच्या भावी इतिहासांत, आह्मी बोअर लोकांस शिकविलेल्या स्वतंत्रतेच्या उच्च कल्पना, कालोनिअल स्थानिक स्वराज्याचें रहस्य आणि शुद्ध राज्यकारभार पद्धती हीं स्पष्ट दिसून पडतील, असें बालफोर साहेबांनीं परवा बोलतांना आश्वासन दिलें आहे. पण आमचा हिंदुस्थानच्या लोकांचा अनुभव निराळीच कथा सांगतो. हिंदुस्थानच्या लोकांस पारतंत्र्यानें इतकें गुरफटलें आहे कीं, खऱ्या स्वतंत्रतेचा त्यांस अगदीं तिरस्कार वाटतो व आपण आपल्या पारतंत्र्याचे सुखाप आंचवूं ह्मणून भीति वाटते; राज्यकारभाराची चिंता व दगदग करण्यापेक्षां सांगतील ती बंदी नोकरी बजावून, देतील तितक्या अन्नवस्त्रावर समाधींत निश्चिंत राहणें फार सौख्याचें आहे अशी आमची खात्री झाली आहे. अशाच उच्च कल्पना बोअर लोकांच्या मनावर उमटलेल्या दिसणार असतील! गुलामगिरीच्या काव्याची वींच चांगली सलत राहिल्या खेरीज स्वतंत्र्याचें खरें रहस्य कळणें क्वचित कठीण आहे. अंधःकाराची ज्यांस ओळख नाहीं त्यांस उजेडाची खरी कल्पना होणें अशक्य होय. आमच्या इंग्रज सरकारास सर्वत्र स्वातंत्र्यच आहे. मग त्यास पारतंत्र्य कोठून माहित असणार! या वरून स्वातंत्र्याचें खरें रहस्य आह्मा सारख्या सहृदयांनाच कळणारें आहे. असो. हिंदुस्थानासही असेंच आश्वासन तरी मिळेल काय?

## The Berar Samachar

MONDAY JULY 28 1902

In the last issue of 'India' we read with interest an instructive forecast about the future of the Indian empire. Two great authorities happen to speak on the same subject with an unmistakable insight into the current of the present events. Mr. Dadabhai Navaroji and Sir H. Cotton both are familiar names to the Indian public. One is as great and good as the other. Their experiences run over the longest period of the last century and their opinions always claim a dignified welcome at the hands of the Government as well as the people. Sir H. Cotton advocates a *fraternal footing* for India. Federation of India is his noble ideal; and we hope that this ideal will, in course of time be a matter of fact. The spread of western ideas and civilization have brought forth a nationalizing tendency. It is the most sublime function of Imperial Government to unite the different races and nationalities of India into one empire. The fraternal footing of the future will lie in the re—organization of the political independence of India. Such a relationship between England and India will constitute India a colony of that parental nation. Sir Cotton is not so hopeful about the fruition of this ideal but he however hopes that the growth of a national spirit and the larger scope for the political aspirations of the people will pave the way for an excellent future for India. In his eloquent words. "India demands [illegible] British statesmen a capacity for [illegible]onstruction, for guidance and for s[illegible]thy during a period of transition, fo[illegible] [illegible]nergy and action when it is advancin[illegible] and for masterly inactivity and watchful repose when it is more necessary to look to the encouragement of spontaneous development." The spontaneous de-

ve'opment refers to the social, moral and religious side, of the Indian nationality. The religion of India has in it a real vivifying tendency and will mould the future moral progress of the Indian society in the light of the modern requirements of a new political life which revolutionizing western ideas have brought home to India. God willing, we shall hope to realize the ideal of Sir H. Cotton provided we get a firm hold of the sympathetic guidance of the ruling people. The present Imperialism is hostile to the faithful and loyal aspirations of the Indian people. Sir H. Cotton certifies that the people of India are loyal to the core in so far as they gratefully appreciate the advantages of British rule. He goes further to ridicule the term of disloyalty when it is applied to those people who approach the Government with a prayer for further concessions and privileges. Such is the noble ideal which Sir H. Cotton puts forth for the dignifying acceptance of the British statesmen. Let us hope that a day will dawn upon India when this ideal will be a solid fact of a future day. The earlier it comes the better.

A similar vision of a republic and self—government in India is present to the mind of Mr. Dadabhai also. He takes stock of the past and tries to forecast the future on the past experiences. His retrospect does not land him into the region of a hopeful future. He has an implicit faith in the British conscience. His is the faith of a prophet when he observes that "the past has been in economic and political condition destructive and dishonorable. What is to the future." We shall join with him in his doubtings and questioning about the future and will put before the righteous English people a hope against hope.

"Will the new century and new Coronation bring with them this blessing of prosperity to both England and India, and of contentment and gratitude to India? Let us hope so."

## वऱ्हाड

हवामान— पाऊस मधून मधून पडत असतो. शेतीचीं कामें उघाडीमुळें चांगलीं चाललीं आहेत. एकंदर पाऊस १२ इंचा जवळ जवळ झाला. हवेंत थंडाई नाहीं. रोगराई कोणतीच नसून सार्वजनिक आरोग्य समाधान कारक आहे. बाजारभाव आहेत तसेच आहेत.

रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांस दिल्ली दरबारा करितां आमंत्रण आलें आहे असें 'प्रमोदसिंधु' कर्ते लिहितात. रावसाहेब, रावबहादूर इत्यादि उपपदा प्रमाणेंच आमंत्रणाचाहि बहुमानच आहे.

आकोल्यास गेल्या शनिवारीं क्रिकेट खेळाचा दुसरा सामना झाला. एक बाजूला मेसर्स क्यांडी, करी वगैरे मंडळी होती व दुसऱ्या बाजूला रा. रा. मोडक, पटवर्धन, देशपांडे इत्यादि नेटीव मंडळी होती. खेळ चांगला प्रेक्षणीय झाला.

## जाहिरात.

वऱ्हाड म्युनिसिपाल कायद्यांतील कलम ४४ प्रमाणें:—

ता. २३ माहे जुलै सन १९०२ इसवी रोजीं भरलेल्या स्पेशल सभेंत आकोले म्युनिसिपाल कमेटीनें अकोले म्युनिसिपाल हद्दींत कापूस वटण्याचा अथवा कापूस दाबून गांठी बाधण्याचा धंदा शिवाय करून इतर धंदा केलेलें काम किंवा उद्योग करणारे सर्व इसमावर वऱ्हाड मुनिसिपल कायद्यांतील कलम ४१ (१) अन्वयें खालीं दिलें प्रमाणें कर बसविण्याचें योजिलें आहे.

सदर्हू सूचनेस ज्यांना हरकत करण्याची असेल त्यानीं आपली हरकत कमेटीचे आफिसांत ह्या नोटिसीचे प्रसिद्धीचे तारखेपासून तीस दिवसांचे आंत लेखी दाखल करावी.

1 करास पात्र असलेले इसम किंवा मालमत्ता.

आकोले मुनिसिपाल हद्दींत कापूस वटणें किंवा कापूस दाबून गांठी बांधणेचा धंदा शिवाय करून इतर धंदा केलेलें काम किंवा उद्योग करणारे व ज्यांचें वार्षिक उत्पन्न १०० रुपयाहून जास्त आहे असे सर्व इसम ह्या करात पात्र आहेत.

11 कराची रकम अथवा दर.

ह्या कराची आकरणी दर शेंकडा एक रुपया प्रमाणें केली जाईल.

111 कर आकारण्याची रीत:—

१ जनरल कमेटीचे मंजुरीवर सदहू कराची आकारणी कमेटीनें नेमिलेली एक सब–कमिटी करील.

२ कराचे आकारणीच्या याद्या तयार झाल्या झणजे दवंडी देऊन स्थानिक वर्तमान पत्रांतून जाहिरात दिली जाइल. व याद्या मुनिसिपाल आफिसांत पाहण्यास सांपडतील.

३ सदर्हू कराचे आकारणीस कोणाची हरकत असल्यास ती हरकत त्यानीं कमेटीस नोटीस प्रसिद्ध झाले दिवसा पासून एक महिन्याचे आंत लेखी कळवावी. ह्या हरकतीचा निकाल वर दर्शविलेली सब कमिटी करील.

४ सदर्हू कर एक हप्त्यानें तारीख १ एप्रिल रोजीं दिला पाहिजे.

ता. २१ जुलै १९०२ } V. M. Mahajani व्हाईस चेअरमन म्यु० कमेटी आकोला.

## जाहिरात

वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचे कलम ४४ प्रमाणें.

तारीख २३ माहे जुलै सन १९०२ इसवी रोजीं भरलेल्या स्पेशल सभेंत आकोले म्युनिसिपल कमेटीनें आकोले म्युनिसिपल हद्दींत वाफेचे यंत्रानें किंवा इतर रीतीनें कापूस वटण्याचा अथवा कापूस दाबून गांठी करण्याचा धंदा करणारे सर्व इसमांवर वऱ्हाड म्यु० कायद्यांतील कलम ४४ (१) (अ) (ब) अन्वयें खालीं दिल्या प्रमाणें कर बसविण्याचें योजिलें आहे.

सदर्हू सूचनेस ज्यांना हरकत करण्याची असेल त्यानीं आपली हरकत कमेटीचे आफिसांत ह्या नोटिसीचे प्रसिद्धीचे तारखे पासुन तीस दिवसांचे आंत लेखी दाखल करावी.

*I* करास पात्र असलेले इसम किंवा मालमता.

आकोले म्युनिसिपल हद्दींत वाफेचें यंत्रानें किंवा इतर रीतीनें कापूस वटण्याचा अथवा कापूस दाबण्याचा धंदा करणारे सर्व इसम ह्या करास पात्र आहेत.

*II* कराची रक्कम अथवा दर

हा कर खालीं दाखविले दरा प्रमाणें आकारला जाईल.

वटलेला प्रत्येक बोजा. वजन मण १० } दर ०।१।६

दाबलेली प्रत्येक गांठ वजन मण १४ } दर ०।२।०.

*III* कर आकारण्याची रीत.

१ जनरल कमेटाचे मंजुरातीनी सदर्हू कराची आकारणी, कमेटीनें नेमलेली एक सब कमेटी करील.

२ कराचे आकारणीच्या याद्या तयार झाल्या झणजे दवंडी देऊन स्थानिक वर्तमान पत्रांतून जाहिरात दिली जाईल व याद्या मुनिसिपल आफिसात पाहण्यास सांपडतील.

३ सदर्हू कराचे आकारणीस कोणाची हरकत असल्यास ती हरकत त्यांनीं कमेटीस नोटीस प्रसिद्ध झाले दिवसां पासून एक महिन्याचे आंत लेखी कळवावी. ह्या हरकतीचा निकाल वर दर्शविलेली सब. कमेटी करील.

४ सदर्हू कर एक हप्त्यानें तारीख १ आगष्ट रोजीं दिला पाहिजे.

ता० २९।७।०२ } V. M. Mabajani व्हाईस चेअरमन, म्युनसिपाल कमेटी आकोला.

## NOTICE

Notice under section 44 of the Berar Municipal Law.

The Municipal Committee of Akola have, at their Special General Meeting held on the 23rd of July 1902 passed a resolution proposing the imposition of the Town—fund tax under section 41 of the Berar Municipal Law as set forth below:

Any inhabitant objecting to the proposal should submit his objections in writing, within thirty days from the publciation of this notice.

Dated Akola 25th July 1902 } V. M. Mahajani Vice—Chairman M. Committee Akola.

I Class of person or description of property proposed to be taxed.

Every person or persons practising within the limits of the Akola Municipality any profession other than that of ginning and pressing cotton, or art or carrying on any trade whose annual income is in excess of Rs. 100

II Amount or rate of tax.

The tax shall be levied at one percent of the total annual income of the assessee.

III System of assessment.

1 The tax shall be assessed by a Sub-Committee appointed for the purpose subject to the sanction of the General Committee.

2. When the list of assessment is ready a notice by tom—tom and in the local newspaper shall be given to the public and the list shall be open to inspection at the Municipal Office.

3 Objections to the assessment shall be received and considered by the Sub—Committee aforesaid if presented in writing within one month from the publication of the list of assessment.

4. The tax shall be payable in one instalment on 1st of April of each year.

Vishnu M. Mahajani
Vice—Chairman
Municipal Committee
Akola.

## NOTICE

Notice under section 44 of the Berar Municipal Law.

The Municipal Committee of Akola have, at their Special General Meeting held on the 23th of July passed a resolution proposing the imposition of a tax under section 41 *(1)* A (b) as set forth below:—

Any inhabitant objecting to the proposal should submit his objection in writing, within thirty days from the publication of this notice.

Dated Akola 25th July 1902 } V. M. Mahajani M. Committee Akola.

1 Class of person or description of property proposed to be taxed:—

Every person who practises within the limits of the Akola Municipality the profession of ginning cotton and pressing the same into bales by means of steam or a mechanical process, shall be assessable to this tax.

II. Amount or rate of the tax.

The tax shall be levied at the following rotes.

| | R. a. p. |
|---|---|
| Per every boja of ten maunds ginned... | ... 0—1—6 |
| Per every bale of 14 maunds pressed ... | ... 0—2—0 |

III. System of assessment.

*(1)* The tax shall be assessed by a Sub-Committee of the Committee appointed for the purpose subject to the sanction of the general Committee.

*(2)* When the list of assessment is ready a notice by tom—tom and in the local newspapers shall be given to the public and the list shall be open for inspection at the Municipal Office.

(3) Objection to the assessment shall be received and considered by the Sub-Committee aforesaid if presented in writing within one month from the publiction of the list of assessments.

*(4)* The tax shall be payable in one instalment on 1st August of every year.

Vishnu M. Mahajanj
Vice-Chairman
Municipal Committee
25-7-02 Akola.

## वर्तमानसार

मद्रासकडे पाऊस पुष्कळ झाला आणि त्यामुळें भवानी नदी, पायकरा नदी व इतर दोन तीन ठिकाणच्या नदीवरील रेलवेचे पूल वाहून गेले. मेल गाडीचा रस्ता पुष्कळ तास पर्यंत बंद पडला होता. मलबार बाजूला अती वृष्टी होऊन कलीकत कडील रेलवेचें दळण वळण बंद पडलें होतें.

सुरतेला एवढें भयंकर तुफान झालें कीं तेथें एकदम १७॥ इंच पाऊस पडला. जिकडे तिकडे महापूर आले व इमारतींची मोठी नुकसानी झाली.

भडोच येथें ८।१० इंच पाऊस एकदम पडला. रस्त्यावर पाणी तुंडुंब भरलें व शेवटीं दुकानांतूनही पाणी शिरलें व २९।३० हजार रुपयांचा माल खराब झाला. कांहीं आजूबाजूच्या रेलवेच्या फांट्यावर कांहीं तास पर्यंत दळणवळण बंद होतें.

पळण्याची शर्यत— अलिकडे या शर्यती फार कमी झाल्या. पळण्यानें सर्व अवयव चलन पावतात व सतेज होतात. एक डफी नांवाचा अमेरिकन विद्यार्थी १ सेकंदांत १०० यार्डांचें अंतर पळाला. ही मरधांव किती मोठी आहे हें कळण्याला घड्याळ पाहून स्वतां पळावें ह्मणजे चांगलें कळेल.

अती मोठा क्यामेरा— फोटोग्राफ घेण्याचें एक अति मोठें यंत्र कलकत्त्यास सरकारानें आणिलें आहे. त्याचें वजन एक टन आहे. ह्याची लांबी १० फूट असून रुंदी ५।६ फूट आहे. याच्या योगानें ८ फूट लांब व ४॥ फूट रुंद अशा लांबरुंद प्लेटीवर फोटो घेतां येतो. जगांत एवढा मोठा क्यामेरा दुसरा नाहीं.

मृत्यु—हैदराबाद दरबारचे प्रसिद्ध नबाब सर खुर्शेद जहा बहादूर के. सी. आय. ई. शमसूल उमराव अमीर इ. कबीर हे गेल्या १७ तारखेला मरण पावले. यांचें घराणें फार मोठें आहे. यांचे चिरंजीव नबाब सफरजंग बहादूर यांच्यावर हा मोठा प्रसंगच आला. त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ शाळा व कचेऱ्या एक दिवस बंद होत्या.

मांजराची किंमत— नार्थ युकोण देशांत उंदरांचा व घुशींचा अतिशय त्रास असल्यानें त्या देशांत मांजराची किंमत ७५ रुपये पडते! आपल्या कडचीं मांजरें तिकडे पाठविण्याचें कोणी धाडस करील तर एक मोठा व्यापार वाढणार आहे.

जपानमध्यें जेवतांना अगदीं गप्प बसणें ह्मणजे सभ्य पणाचें लक्षण आहे असें समजतात. पण खरें पाहतां भोजन वेळा ह्मणजे अमृत वेळा होय व त्या वेळीं मुखासमाधानांत आनंदाच्या व मौजेच्या गप्पा गोष्टी करण्यांतच विशेष गोडी आहे.

दिल्ली दरबारासाठीं बांधलेल्या सर्व क्यांपांची मर्यादा नुकतीच आंखण्यात आली. त्याची एकंदर लांबी ७ मैल व रुंदी ५ मैल झाली आहे!

खडगपूर स्टेशन येथील ज्या ब्राह्मणाचे पाठीवर बेली साहेबांनीं जोडा ठेविला होता, त्याची न्यायाचे फौजदारी कोर्टांत व बंगालसरकारांतही दाद न लागल्यामुळें त्यानें बेली साहेबांवर दिवाणी कोर्टांत १०५० रुपयांचा नुकसानीचा दावा लावला आहे. पिच्छा सोडतां कामा नये.

बरेच बोअर लोक एडवर्ड बादशाहाचें वर्चस्व कबूल करीत आहेत, परंतु राजनिष्ठेची शपथ घेण्यास मात्र तयार नाहींत! पुन्हां स्वातंत्र्य मिळविण्याची ईर्षा असेल!

भुतासंबंधीं एक विलक्षण गोष्ट प्रसिद्ध झाली आहे. अजमीरच्या बाजारांत एका घरांत एक बाई रहात असे. तिला एके दिवशीं पलिकडच्या खोलींतून कोणी सांगितलें कीं तूं या घरांतून निघून जा. हें ऐकून ती आपली आवरासावर करूं लागली व आपले दागदागिने जमा करूं लागली, तेव्हां पुन्हा तिला सांगण्यांत आलें कीं तूं आहेस तशीच चालती हो, नाहींतर हाल हाल होऊन मरशील. हें ऐकून ती बाई तेथून निघाली ही बातमी चोहोंकडे पसरली व लोक घाबरले. ही लोकांची भीती दूर करण्याकरितां त्या ठिकाणीं पोलिस अमलदार आले. त्यासही त्या भुतानें तसाच दम मरला. मी कोणी अमानुष प्राणी आहें हें सिद्ध करण्याकरतां ह्यानें एक कपडा आगीशिवाय जाळून दाखविला. तो विशविण्यास एक मनुष्य पुढें गेला असतां त्याच्या डोक्यांत एक वीट पडली. असें सांगतात कीं अमलदारही मोठ्या फिकीरींत पडले आहेत! हें भूत ह्मणजे कोणी तरी पक्का लुच्चा असावा.

एका नेटिव राजानें आपल्या घरीं प्रसिद्ध अनिबेझंट बाईचें व्याख्यान करण्याची सज्ज तयारी केली. पण एकाएकी व्याख्यान न करण्या बद्दल पो. एजंट साहेबांचा लखोटा राजे साहेबांच्या हातीं येऊन पडला; राजे साहेबांनीं अनेक तऱ्हेनें समजावले पण ह्यांची कांहींच समजूत पटेना. शेवटीं धैर्य करून राजानें एजंट साहेबांची मनधरणी बाजूस ठेवून व्याख्यान प्रसंग साजरा केला. अर्थात् एजंटांची मर्जी गेली व तेव्हां पासून राजाविरुद्ध अनेक फिर्यादी सरकारच्या कानावर येऊन लागल्या. व त्याचा जाब विचारतां राजानें ही अंतस्थ गुरुकिल्ली सरकार पुढें ठेविली व सर्व गोष्टींचा निकाल लागला. या वरून आमचे राजे राजे आहेत कां बंदिवान आहेत बरें! हेंच कां आमचें स्वातंत्र्य! पण आपण जागे केव्हां होणार?

## उपदेश

आयर्लंडचे पुढारी— डि— विट साहेब यांचा ऐरिश लोकांस उपदेशः—

"आरंभीं बोर लोक अडीच लक्षा जवळ जवळ इतकेच होते आणि आपण आयर्लंडचे लोक ४० लक्ष तर आयर्लंडांत आहों पण सर्व जगांत आपले आयरिश बंधु २ कोटीहूनही अधिक आहेत. असें असूनहि आह्मांस आमचे देशाचा कारभार करूं दिला जात नाहीं. नीच इंग्रज सरकारनें आह्मांस तुडविलें आहे. बोर लोकांचें मितव्यवहाराचें आपण अनुकरण केलें पाहिजे; आपलें बांधव आणि स्वभाषा याबद्दलची निष्ठाही त्यांच्या प्रमाणें आपणांत असली पाहिजे आणि शारीरिक व मानसिक अशी जी शक्ति आपणांस मिळालेली आहे ती पार नाहींशी होई तों पर्यंत स्वातंत्र्य हा जो एक प्रत्येक राष्ट्राचा हक्क आहे तो संभाळण्याविषयींची बोअर लोकांची जी प्रवृत्ति तिचेंही आपण अनुकरण केलें पाहिजे."

बोर लोकांची लढाई चालूं असतां इंग्लंडचे कांहीं पत्रांनीं त्यांवर शिव्याश्रापांचा जो वर्षाव चालविला होता त्यांनीं आतां आपली पगडी बदललेली आहे हें पाहून मोठा आनंद व आश्चर्य वाटतें. जे बोर लोक पूर्वीं, "पशुतुल्य आचरण करणारे" दिसले ते आतां "संभावित गृहस्थ" वाटत आहेत, जे पूर्वीं "गळेकापूं" होते असें ह्मणण्यांत येई तेच "थोरपणानें झुंजणारे लढवय्ये" दिसत आहेत आणि रणांगणांत ज्यांनीं नामर्दपणानें दुराचरण केल्याचें पूर्वीं सांगण्यांत येई त्यांचीच आज रणांगणांतील थोरवी गाण्यांत येत आहे!

फ्रान्समधील एक राज्यारोहण लांबणीवर पडण्याचें कारण बरेंच विलक्षण आहे सहाव्या हेनरीची बायको मार्गारेट हिचा फ्रान्सच्या गादीवर राज्याभिषेक व्हावयाचा होता. परंतु त्या संबंधानें असें एक भविष्य प्रसिद्ध झालेलें होतें कीं, राणीला राज्याभिषेक झाल्या नंतर तिचा नवरा फक्त एकच दिवस जगेल. ह्यामुळें तें राज्यारोहण हेनरी आपण होऊनच पुढें पुढें ढकलीत होता. अखेरीस १६१० सालीं मे महिन्याच्या १३ व्या तारखेला मार्गारेटला राज्याभिषेक झाला. आणि १४ व्या तारखेला हेनरीच्या छातीमध्यें कट्यार खुपसून कोणी त्याचा प्राण घेतला.

पंढरपूरच्या श्री पांडुरंगाची पूजा १० दिवस पर्यंत बडवे व पुजारी यांचे मधील तंट्यासंबंधानें बंद होती व पुष्कळ भाविक लोक पांडुरंगाची पूजा न झाल्या कारणानें उपोषित राहिले होते. ही ओरड मे० कलेक्टर साहेब यांचे कानावर जाऊन ह्यांचे हुकूमावरून पूजा अर्चा सुरू झाली. सोनारानें कान टोचल्याशिवाय बरें वाटतच नाहीं पण ही खोडी फार घातुक होय.

शूर नबाब— मोंगलाईंत कल्याण आहा गीरच्या इलाख्यांत २ महिन्यापासून ६।७ वाघांनीं गांवांत शिरून सु० १०० मनुष्यें खाऊन टाकलीं. ह्यामुळें लोक फार भिऊन गेले व तिकडील बहुतेक रस्ते बंद होण्याची पाळी आली होती. ही बातमी तेथील तरुण नबाब साहेबांस कळतांच त्यांनीं लगेच दारू गोळ्याची तयारी केली व शिकारीस गेले. आणि ३ वाघ गोळीनें ठार करून दोन वाघ जिवंत धरून आणिले, नबाब साहेबाचें अल्प वयांतील हें शौर्य अवर्णनीय आहे यांत शंका नाहीं.

पाऊस पाडणें— या संबंधानें एक प्रयोग अमेरिकेंतील शेतकी खात्यानें मि० मायर्स या विमानारोहण पटु गृहस्था कडून नुक्ताच करविल्याची बातमी आली आहे. हा प्रयोग, टेक्सास प्रांतांत भर उन्हाळ्यात, पाऊस पडण्याचा बिलकूल संभव नाहीं अशा, वेळीं आकाश निरभ्र असतांना करण्यात आला. ह्याचा प्रकार असा,— हायड्रोजन व आक्सिजन भरलेलें एक भलें मोठें विमान एक मैल उंचीवर नेल्यावर विद्युत्साहाय्यानें त्यांत भडका उत्पन्न केला. विमानाचा व्यास १२ फूट होता व त्यांत ९,००० घन फूट ग्यास भरलेला होता या भडक्याच्या धक्यानें एक मोठी थोरली इमारत जमीनदोस्त झाली. जवळच्या नदींतील हजारो मासे मरण पावले; परंतु थोड्याच वेळांत एक मोठी सर आली व पाऊस सुमारें पाऊण तास पडत होता. दुष्काळग्रस्त जनांस ही अमृत वृष्टी होईल.

सर्प वृष्टी— मागनर वगैरे गांवीं पावसाच्या पाण्यांत साप पडूं लागल्यामुळें लोक फारच घाबरले आहेत. हे पडणारे साप एकाच आकाराचे अगर रंगाचे नमून ते पडण्याचें कारण व ह्याचा परिणाम अद्याप कोणाचे लक्षांत आला नाहीं.

दुग्धाहारी बोवा— मुंबई येथें बाबुलनाथाचे देवळात एक दुग्धाहारी बोवा आले आहेत. त्यांची उंची पांच हात आहे. ह्यांच्या हातावर शंख, चक्र वगैरे चिन्हें आहेत. कोणाशीं फारसे बोलत नाहींत. भाविक लोकांची दर्शनास गर्दी जमते.

४०० विद्यार्थ्यांस दंड— डाका कालेजांतील तीन चार खुर्च्यांवर विद्यार्थ्यांनीं शाई सांडली व ती मी सांडली असें कोणीच कबूल करीना ह्मणून प्रिन्सिपाल साहेबांनीं सर्व विद्यार्थ्यांनां दंड केला.

उत्तम नवे फिल्टर्स— डाक्टर नाई मेयर नांवाच्या एका जर्मन मनुष्यानें नवीन फिल्टर्स काढले आहेत हे केसलगर नांवाच्या मातीचे तयार केलेले असतात. ह्या मातीचे अंगीं असा विलक्षण गुण आहे कीं, यांतून निथळलेलें पाणी थंडगार व स्फटिका प्रमाणें स्वच्छ निर्मळ होतें. आपल्या इकडे कोळसा, व वाळू मृत्तिकेच्या मांड्यांत घालून पाणी गाळून घेत असतात. परंतु वरील माती अतीशय सच्छिद्र असल्यामुळें जीवजंतू व कृमीकीटक त्यांच्यांतून पाण्याबरोबर जऊंच शकत नाहींत. हे फिल्टर्स आपल्या सद्गुणानें सर्वांसच प्रिय होतील.

माजी प्रधान लार्ड सालिसबरी— जन्म १८३० मध्यें झाला. १८५४ मध्यें यांचें प्रथमचें भाषण झालें त्या वेळीं ग्लाडस्टन साहेबांनीं त्यांची पाठ थोपटली. हे ग्लाडस्टन साहेबाचे प्रतिस्पर्धी खरे पण त्यांचे सारखे अद्वितिय पुरुष आहेत असें नाहीं. 'हिंदुस्थानास जितकें शोषून टाकतां येईल तितकें शोषावें' हे त्यांचें राज्यधोरण, व नामदार दादाभाई हा 'काळा मनुष्य' अशी तिरस्काराची उक्ती ह्या त्यांच्या दोन गोष्टी हिंदुस्थान संबंधानें संस्मरणीय होत.

नवे प्रधान सर बाल्फोर— हे लार्ड सालिसबरीचे भाचे होत. जन्म १८४८ मध्यें झाला. हे १८७४ त पार्लमेंटांत शिरले. हे चांगले विद्वान वक्ते आहेत. ह्यांच्या संबंधानें लॉर्ड बीकन्स फील्ड ह्मणाले होते कीं, हा मनुष्य दुसऱ्या पिट प्रमाणें हुषारी दाखवील. हें भविष्य खरें करून दाखविण्याची वेळ जवळ आली आहे. यांचें कर्तृत्व आयर्लंडच्या सेक्रेटरीचें काम करितांना चांगलें दिसून आलें. १८९१ मध्ये हे कॉमन्स सभेचे पुढारी झाले. आतां तर ते मुख्य प्रधान झाले आहेत. व यांस सर्व लोक अनुकूल आहेत. यांची भावी कारकिर्द हिंदुस्थानास चांगली लाभो!

अद्भुत शोध— कर्नेल हर्बट नांवाच्या एका फ्रेंच मनुष्यानें एक नवीन युक्ति काढली आहे. ह्या मुळें वाटेल तेव्हां वाटेल ती बंदूक अगर तोफ उडविली तर ह्याचा आवाज जाळ, किंवा धूर या पैकीं कांहीं एक न निघतां गुपचूप सर्व काम करितां येतें. ही युक्ति फार साधी, लवकर समजण्याजोगी व अगदीं थोड्या खर्चाची आहे. ही युक्ती सर्व राष्ट्रें घेणार हें उघड आहे.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.